म. ग्र. सं. ठाणे
९२३
९९५०
REFBK-0007477

# मराठी कविता

## १९२० - १९५०

[redacted] गोखले, माडखोलकर,
[redacted] ोरडे, अनिल, सरंजामे,
[redacted] श्री. पंडित, गोपीनाथ,
[redacted] दत्तप्रसन्न कारखानीस,
[redacted] पां. श्री. गोऱ्हे, कांत,
[redacted] . द. भावे, श्रीनिवास
संत [redacted] दकिर, प्रफुल्ल-दत्त, र. लु. जोशी, द. चिं.
[redacted] गी, अनंत आठल्ये, सूर्यकांत खांडेकर.

हित्य संघाच्या विद्यमानें

# मराठी कविता

## [१९२०-१९५०]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७४७७

REFBK-0007477
REFBK-0007477

मूल्य पांच रुपये

मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमानें

प्रकाशक :
वा. रा. ढवळे,
कार्यवाह,
मुंबई मराठी साहित्य संघ,
'सरस्वति',
आंबेवाडी पोस्टासमीप,
मुंबई ४

प्रथमावृत्ति
प्रती : २५००
मे, १९५०

मुद्रक :
वि. पु. भागवत,
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई ४

म. ग्रं. सं. ठाणे
आ. नं. १२५५६
११-३

अर्वाचीन मराठी कवितेचा प्रातिनिधिक संग्रह तयार करण्याचे प्रयत्न आतांपर्यंत बरेच झालेले असले तरी १९२० नंतरच्या कवींना त्यांत गौण स्थान देण्यांत आलेलें आहे. आज गेल्या तीस वर्षांतील मराठी काव्याचा एक प्रातिनिधिक संग्रह होणें उचित आहे असें वाटल्यावरूनच मुंबई मराठी साहित्य संघानें महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या ३३ व्या अधिवेशनाच्या निमित्तानें हा संग्रह तयार करण्याचें ठरविलें.

१९२० साल हें मराठी काव्याच्या इतिहासांत अनेक दृष्टींनीं महत्त्वाचें ठरतें. आधुनिक कविपंचकापैकीं बालकवि १९१८ मध्यें, रे. टिळक आणि गोविंदाग्रज १९१९ मध्यें व रेंदाळकर १९२० मध्यें वारले. मराठी काव्यप्रांतांत एकाएकीं एक चमत्कारिक पोकळी निर्माण झाली. परंतु १९२० मध्येंच भास्करराव तांबे ह्यांचा काव्यसंग्रह रसिकांच्या हातांत पडला; १९२० नंतरच त्यांच्या प्रतिभेचा एक एक पैलू रसिकांच्या नजरेंत भरूं लागला. १९२२–२३ च्या सुमारास रविकिरणमंडळांतील कवि एकामागून एक प्रकाशूं लागले व थोडक्याच वेळांत मराठी कवितेच्या प्रांतांत फिरून एकदां उत्साहाचें वारें खेळूं लागलें. १९२० साल ह्या दृष्टीनेंच आधुनिक मराठी कवितेचा एक महत्त्वाचा टप्पा ठरतें; व ह्या टप्प्यावरील कविवर्य तांबे ह्यांचें स्थान फार महत्त्वाचें ठरतें. ह्या संग्रहाचा प्रारंभ कै. भा. रा. तांबे ह्यांच्या कवितांनीं होत आहे तो ह्याच कारणासाठीं.

१९२० ते १९५० ह्या कालखंडांतील कवींची व त्यांच्या कवितांची निवड करितांना संपादकमंडळानें मुख्यतः ऐतिहासिक दृष्टीचा अवलंब केला आहे. ह्या कालखंडांत जसे अनेक काव्यप्रकार जन्माला आले व वाढीस लागले त्याचप्रमाणें अनेक काव्यप्रवृत्तींचा उदय आणि विकास झाला. संग्रहासाठीं निवडलेल्या कवितांतून ह्या कालखंडांतील प्रमुख काव्यप्रवृत्तींचें निदर्शन व्हावें आणि त्या त्या

कवींच्या काव्याच्याहि त्या प्रातिनिधिक ठराव्यात अशी दक्षता संपादकमंडळानें घेतली आहे. ह्याबरोबरच शक्य तों ह्या कालखंडांतील उत्तम मराठी कविताहि रसिकांना एकत्रित मिळावी ह्या हेतूकडेहि लक्ष पुरविलें आहे.

कवींचा अनुक्रम ठरवितांना कवि ज्या क्रमानें उदयाला आले तो क्रम निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. हा क्रम ठरविणें सोपें जावें एवढ्यासाठीं ज्या ज्या नियतकालिकांतून ह्या कवींचें काव्य प्रथम प्रसिद्ध झालें त्या त्या नियतकालिकांच्या दृष्टीनें ह्या कालखंडाचे स्थूलमानानें विभाग करून त्या त्या विभागांत उदयास आलेल्या कवींचा अनुक्रम ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. 'काव्यरत्नावलि' व 'मासिक मनोरंजना' चा काळ, 'रत्नाकर' व 'यशवंता'-चा काळ, 'प्रतिभा', 'पारिजात', 'विहंगम' चा काळ, 'ज्योत्स्ना' व 'समीक्षक' यांचा काळ आणि आजचा 'अभिरुचि', 'सत्यकथा', 'साहित्य' ह्यांचा काळ अशा प्रकारचे कालखंड स्थूलमानानें लक्षांत घेतले आहेत.

हा कालखंड साधारण १९४२ पर्यंतच न घेतां तो १९५० पर्यंत ठेवण्यांत हेतु एवढाच आहे कीं आज जी मराठी कविता उदयास येऊं पाहते आहे, तिचेंहि अंधुक कां होईना परंतु ह्या संग्रहांत दर्शन व्हावें. आजची कविता व कालची कविता ह्या शेजारीं शेजारीं ठेविल्या असतांना दोन्हीहि कवितांचीं वैशिष्ट्यें लक्षांत यावयाला सोपें जाईल ह्या हेतूनें आधुनिकांना व कांहीं अत्याधुनिकांनाहि काव्यसंग्रहांत स्थान दिलें आहे.

एका कालखंडांतील काव्याचा प्रातिनिधिक संग्रह करण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे. ह्यांत अवलंबिलेल्या दृष्टिकोणापेक्षां सर्वस्वीं वेगळ्या दृष्टिकोणाचा–उदाहरणार्थ, केवळ काव्यदृष्टीचा–अवलंब करून उत्तम कवितांची निवड करितां येणें शक्य आहे; व तशाहि स्वरूपाचे प्रयत्न व्हावयाला हवेत असेंच आम्हाला वाटतें. वैयक्तिक आवडीनिवडींतून निर्माण झालेल्या अशा अनेक संग्रहांनंतरच एखाद्या कालखंडांतील काव्याचें सम्यक् स्वरूप लक्षांत येणें शक्य असतें.

ह्या संग्रहांतील कवितांच्या निवडीची जबाबदारी सर्वस्वीं संपादकमंडळाची आहे. दिवंगत कवींच्या आप्तेष्टांनीं व सर्व विद्यमान कवींनीं आम्हांला जें तत्परतेनें सर्वतोपरी सहकार्य दिलें त्याबद्दल संपादकमंडळ त्यांचें आभारी आहे. अत्यल्प कालावधींत ह्या संग्रहाचें मुद्रण करावें लागलें आहे. व ह्या कामीं मौज मुद्रणालयाचे चालक भागवत बंधु ह्यांची बहुमोल मदत झाली आहे. संपादकमंडळ ह्याबद्दल त्यांचें आभारी आहे.

१ भास्कर रामचंद्र तांबे १
१ रुणुझुणु ये ! २ नववधु प्रिया, मी ३ राजकन्या आणि तिची दासी ४ आलों, थांब्व शिंग ! ५ रिकामे मधुघट ६ दृष्ट हिला लागली !
२ जयकृष्ण केशव उपाध्ये ७
१ कविते ! करिन तुला मी ठार ! २ चहा-टळपणा
३ आनंदराव कृष्णाजी टेकाडे ८
१ हा हिंद देश माझा २ चला जाऊं चला पाहूं
४ दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी १०
१ संताजीची घोडदौड
५ माधव [ माधव केशव काटदरे ] १३
१ हिरवें तळकोंकण २ मोऱ्यांची मोहना ३ जिवबादादा बक्षी ४ झुंज आमुचें कवीश्वरांचें शब्दमय
६ माधव जूलियन् [ माधव त्रिंबक पटवर्धन ] २१
१ संगमोत्सुक डोह २ कंचनी ३ तेथें चल राणी ! ४ सुनीत ५ मराठबाणा ६ बेगमेचें विरहगीत
७ मनोरमा [ सौ. मनोरमा श्रीधर रानडे ] २९
१ लिहूं कुणावर कविता !
८ श्रीधर बाळकृष्ण रानडे ३१
१ लेझीम
९ विठ्ठल दत्तात्रेय घाटे ३२
१ माझा अभिसार
१० दत्तात्रेय लक्ष्मण गोखले ३४
१ गालबोट ?
११ गजानन त्र्यंबक माडखोलकर ३४
१ शुक्रतारा
१२ गिरीश [ शंकर केशव कानेटकर ] ३५
१ भलेरी २ शूर्पणखा ३ सुंदर हिरवे माळ

१३ यशवंत [ यशवंत दिनकर पेंढरकर ] ३८
१ दैवतें माय-तात २ हा काय माझा गुन्हा ? ३ गोलघुमटांत
४ गुलामाचें गाऱ्हाणें ५ द्या आम्हाला सुळीं ६ जगरहाटी

१४ वासुदेव गोविंद मायदेव ४५
१ भास २ इरलेंवाली

१५ काव्यविहारी [ धोंडो वासुदेव गद्रे ] ४७
१ मंजुळा

१६ हरि सखाराम गोखले ४९
१ पागोळ्या

१७ केशवकुमार [ प्रल्हाद केशव अत्रे ] ५०
१ श्यामले २ प्रेमाचा गुलकंद ३ फत्तर आणि फुलें
४ एक काव्यप्रकार

१८ अज्ञातवासी [ दिनकर गंगाधर केळकर ] ५५
१ पुणें दरबारीं

१९ सदाशिव अनंत शुक्ल ५७
१ प्रेमाचा प्रभाव

२० गुणवंत हणमंत देशपांडे ५८
१ उबग २ सुखद संभ्रम

२१ श्रीनिवास रामचंद्र बोवडे ६०
१ लावणी

२२ अनिल [ आत्माराम रावजी देशपांडे ] ६२
१ प्रेमाचें ममत्व २ पेर्तेव्हा ३ मानवता ४ वाट
५ पावसाळा ६ प्रीति तुझी माझी

२३ रघुनाथ दत्तात्रय सरंजामे ७०
१ झिम्मा

२४ वामन नारायण देशपांडे ७१
१ नंदनवन मुकल्यावर २ वेड ग खपुष्पाचें

२५ आनंद [ विनायक लक्ष्मण बरवे ] ७६
१ मजुरांची सांज २ चकवा

२६ निशिगंध [ रामचंद्र श्रीपाद जोग ] ७८
१ पहिलें प्रेम

२७ नागोराव घनश्याम देशपांडे ८०
१ ती कळी आणि ती साखळी २ जाणीव ३ नदीकिनारीं

२८ वामन भार्गव पाठक ८२
१ ओढणी

२९ विष्णु भिकाजी कोलते ८४
१ गालबोट २ पेरणीसाठीं

३० नारायण नागोराव हूड ८५
१ अकारण

३१ केशव नारायण काळे ८६
१ दोन फुलें २ या येथें पुलिनावरी

३२ अनंत काणेकर ८७
१ चांदरातीं खाडीच्या किनाऱ्यावर २ ‘ प्रीतिची हूल फुकट ना तरी !’ ३ सावल्यांचें गाणें ४ दोन देवभक्त ५ चालली मिरवणुक

३३ भवानीशंकर श्रीधर पंडित ९२
१ सुप्त ज्वालामुखीस २ युगान्त

३४ गोपीनाथ [ गोपीनाथ गणेश तळवलकर ] ९४
१ रानपांखरा २ कणिका

३५ गणेश हरि पाटील ९६
१ पाटील २ पांखरांची शाळा ३ तिथें

३६ गजानन लक्ष्मण ठोकळ ९९
१ जात्यावरलें गाणें २ सुनीता

३७ सोपानदेव चौधरी १०१
१ देवाच्या दारीं २ सृष्ट-चमत्कार

३८ दामोदर अच्युत कारे १०४
१ भाताचें रोप २ संगीत-परिणति

३९ बाळकृष्ण भगवंत बोरकर १०७
१ जपानी रमलाची रात्र २ बांगड्या ३ स्पर्श ४ भिडली रात्र पहांटे ५ जल्द भरुनि आले

४० **गोविंद झोकरकर** ११२
१ श्रांत पथिक

४१ **पंडित सप्रे** ११३
१ जग

४२ **रामचंद्र अनंत काळेले** ११४
१ वणव्यापूर्वी २ माळरान ३ उद्धार ४ आपली प्रीत

४३ **भालचंद्र रा. लोवलेकर** १२१
१ शुभ्र पांढरीं कापुसवोंडें २ चोरलकांठ

४४ **दत्तप्रसन्न कारखानीस** १२३
१ वंदिवान पोपटा

४५ **नारायण माधव संत** १२४
१ वीज

४६ **वामन रावजी ढवळे** १२५
१ तुझ्या खुणा २ आलीस तूं

४७ **कुसुमाग्रज [ वि. वा. शिरवाडकर ]** १२७
१ स्वप्नाची समाप्ति २ पृथ्वीचें प्रेमगीत ३ एकदां ऐकलें ४ निळा पक्षी ५ अहि-नकुल ६ उषास्वप्न

४८ **अशोक [ दत्तात्रय केशव भट ]** १३७
१ तुझी आठवण २ पोट उपाशी

४९ **वसंतराव चिंधडे** १३९
१ दारीं येशी आज अकल्पित २ कणिका

५० **संजीवनी [ सौ. संजीवनी मराठे ]** १४१
१ प्रतीक्षा २ आज घरास यायची ३ शांत सागरीं कशास

५१ **पद्मा [ सौ. पद्मावती गोळे ]** १४३
१ याच कांहीं क्षणांसाठीं

५२ **इंदिरा [ इंदिरा संत ]** १४५
१ खुणा २ वाटे मला ३ शेला ४ चिमुकलें डबकें ५ अडखळे ६ केव्हांपासून ही

५३ **राजा बढे** १५१
१ करवंदीमागें २ माझिया माहेरा जा

५४ **वसंत वैद्य** १५३

१ शांतिपूजन २ वजन-यंत्र

५५ **पांडुरंग श्रावण गोऱ्हे** १५९

१ पाटलाची पोर

५६ **वा. रा. कांत** १६०

१ अग्निपंख नभिं फडफडुं दे २ रमणी उदविशि निज कचभार

३ घाटावर ४ रुबाया

५७ **पुरुषोत्तम शिवराम रेगे** १६२

१ मस्तानी २ लंपट ओलें वस्त्र होउनी ३ उर्वशी ४ शेवगा

५ पाहिलेंस तूं

५८ **बाळ सीताराम मर्ढेकर** १६९

१ बडवित टिर्‍र्या २ फलाटदादा, फलाटदादा ३ पिपांत मेले ओल्या उंदिर ४ दण्कट दंडस्नायू जैसे ५ न्हालेल्या जणुं गर्भवतीच्या

६ मनास पडलीं जर खिंडारें

५९ **कृष्ण बलवंत निकुंब** १७६

१ कशी येशील ? २ हळूहळू येई रात ३ जीवन-रेषा ४ वर्षा

६० **शांता ज. शेळके** १८२

१ रे चुकलेल्या वाटसरा २ बारव

६१ **श्रीकृष्ण पोवळे** १८५

१ बुत्शिकन् २ वारूळ ३ रुबाया

६२ **वि. म. कुलकर्णी** १८९

१ नवें पाणी ! २ लमाणांचा तांडा ३ अपशकुनी

६३ **माधव कृष्ण पारधी** १९३

१ तुले पाहून

६४ **गणेश दिगंबर माडगूळकर** १९४

१ जोगिया २ जत्रेच्या रात्रीं

६५ **यशवंत दत्तात्रय भावे** १९७

१ विवस्त्र पांचाली २ रेशमी मोहोर ३ आर्द्रा

६६ **श्रीनिवास पाटणकर** २०१

१ विसरलेली ओळख

६७ सौ. शालिनी सोमण २०२
१ पाणी ओढतांना

६८ मनमोहन [ मनमोहन नातू ] २०३
१ फरारी

६९ शरच्चंद्र मुक्तिबोध २०४
१ आज कशानेंशी मला येईनाशी झाली झोप

७० वसंत वापट २०९
१ सोनापुरच्या भिंतीवरतीं

७१ विंदा करंदीकर [ गोविंद वि. करंदीकर ] २१२
१ साक्षात्कार २ वागुलवोवा ३ माझ्या मना वन दगड

७२ प्रफुल्ल-दत्त [ दत्तात्रय विष्णु तेंडुलकर ] २१७
१ तुझें विशाल जीवन

७३ रघुवेल लुकस जोशी २१८
१ माझी रांगडी आई

७४ दत्तात्रय चिंतामण सोमण २१९
१ झिमझिम पडे

७५ नारायण गजानन जोशी २१९
१ तीन अभंग

७६ मंगेश पाडगांवकर २२१
१ मीलनरात

७७ मंगेश भगवंत पदकी २२२
१ रूळ

७८ शंकर रामाणी २२३
१ तुझ्याकडे

७९ अनंत आठले २२४
१ मला वाटतें

८० सूर्यकांत खांडेकर २२५

परिचय २२६

# मराठी कविता

[१९२० - १९५०]

संपादक - मंडळ

वि. ह. कुळकर्णी
अनंत काणेकर
रा. भि. जोशी
प्रभाकर पाध्ये
पु. शि. रेगे
वा. ल. कुलकर्णी
वा. रा. ढवळे (कार्यवाह)

# भास्कर रामचंद्र तांबे

( १८७४–१९४१ )

## रुणुझुणु ये !

[ जाति शुभवदना ]

रुणुझुणु ये, रुणुझुणु ये झणकारित बाळा !
लुटलुटलुट दुडुदुडुदुडु ठुमकत ये बाळा ! ध्रु०

धुंदि अजुनि रजनिनयनिं;
सावरूनि पदर धरुनि
शुभवदना उडुरदना देइ जांभयांला.

दिग्ललना धौतमुखी
रत्नदीप कनकतबकिं
घेउनिया बाहति या बालभास्कराला.

काकड-आरति करिती
देवगृहीं नवयुवती,
आळविती जागविती नंदनंदनाला.

रजनितनय मारुतगण
नृत्य करिति चपलचरण,
तोम् तननन झुम् झननन करिति गायनाला.

जागति बघ चिउकाऊ
लागति घरट्यांत गाउं;
डोलति तरु, लागति करुं ते हरिभजनाला.

जागति गोठ्यांत गाइ,
पाजति वत्सांस पाहिं;
ये रांगे ! कळ लागे माझिया स्तनांला !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७४७७

## नववधू प्रिया, मी

[ जाति नववधू, राग ललत ]

नववधू प्रिया, मी बावरतें;
लाजतें, पुढें सरतें, फिरतें. ध्रु०

कळे मला तूं प्राण-सखा जरि,
कळे तूंच आधार सुखा जरि,
तुजवांचुनि संसार फुका जरि,
मन जवळ यावया गांगरतें.

मला येथला लागला ळळा,
सासरिं निघतां दाटतो गळा,
बागबगीचा, येथला मळा,
सोडितां कसें मन चरचरतें !

जीव मनींच्या मनीं तळमळे
वाटे बंधन करुनि मोकळें
पळत निघावें तुजजवळ पळें—
परि काय करूं? उरिं भरभरतें.

चित्र तुझें घेऊनि उरावरि
हारतुरे घालितें परोपरि,
छायेवरि संतोष खुळी करिं,
तूं बोलवितां परि थरथरतें.

अतां तूंच भयलाज हरी रे !
धीर देउनी ने नवरी रे :
भरोत भरतिल नेत्र जरी रे !
कळ पळभर मात्र ! खरें घर तें !

## राजकन्या आणि तिची दासी

[ जाति पतितपावन ]

" प्रेम तयावर होतं तर मग तुमचं ना भारी ? "
" छे छे ! कसलं ? लेक नृपाची मी, तो व्यापारी ! "

" कुंवरजीस दावितां जवाहिर तो, तुम्हि त्यावरती
दृष्टि रोखिली स्नेहें वरचेवर हळु कां तर ती ? "
" छे छे ! भलतं ! खुळे, तयावर का रत्नावर ग ? "
" खुळीच मी, मज कशीं कळावीं मनांतलीं बिंगं ?
बोलुं लागतां कान दिला जरि चपापलां स्वांतीं,
डोळयावरुनी गालीं कितिदा क्षणिं झळके कांती ! "
" कळेच ना मज, तुझ्याच मनिंचे हे सारे चाळे ! "
" खुळीस का मज शक्य नृपाच्या लेकिस जें जाळे ?
तुम्हांस दावावया जवाहिर येतां कां त्याला
जा जा ! वदलां मुखें, न नयनें ? लालि खुले गालां ?
कां ओशाळया झालां ? लज्जित जणुं कवणा झालां ?
का पाण्याला रत्नाच्या का डोळयांच्या बोला. "
" कधिं ग लाजलें ? कधीं पाहिलं मीं तेव्हां खालीं ?
नको जवाहिर म्हणुनि म्हणालें. जा ! कसली लाली ? "
" काय अतांशा झालं तर मग तुमच्या जीवाला ?
कोमेजू का गाल लागले ?–तो येथुनि गेला !
उगिच बसोनी कां वाऱ्याला कान कधीं देतां ?
उगिच कुणाचा भास होउनीं किति फुगतां फुलतां ?
हात ठेवुनी दारावर किति वेळ उभ्या असतां ?
जणुं उघडिल कुणि दार ! गवाक्षीं कां डुंकित बसतां ? "
" कधिं ग दिला कुणि कान ? कुणाला कधिं ग भास झाला ? "
" कळेल कैसं देउनि चुकतां हृदयचि दुसऱ्याला ? "
" घे घे सटवे, आळ घेशि तर भलता मजवरती
जा म्हण, बसलं मन त्यांवर, चल, निघ येथुनि परती ! "
" कंवराणीजी, कां रागवतां ? ही लोचट दासी—
क्षीण अवयवीं किति तरि खुलते छबि ही आतांशी !
संचरलं तें वारं, स्मर कीं काय म्हणति ज्याला,
बहार उसळे किती चहुंकडे शरीरवेलीला !
खैरपूरच्या गुणवयरूपें योग्य कुमाराला
राणाजी ते देतां म्हणतां ' ना ' कां मग त्याला ? "
" खैरपूर किति धनाढ्य ! त्यांना योग्य अम्ही का ग ? "
" कंवराणीजी, किती लपवितां मन ? किति हीं सोंगं ?

किति भोळया तुम्हि ! खैरपुरेशचि ते, न व्यापारी,
वेष पालटुनि आले इकडिल बघण्या ही स्वारी. "
" काय पुन्हा ते खैर-तेच-व्या-का-कूवरजी ते ? "
" मी खोटी, मी सटवी लुच्ची ? उर का धडधडतें ? "

## आलों, थांबव शिंग !

[ जाति अंजनी, राग हिंदोल ]

आलों, थांबव शिंग दूता, आलों ! थांबव शिंग !
किति निकडीनें फुंकिशि वरिवरि ! कळला मला प्रसंग   ध्रु०

जरि सखे जन हाटा निघती,
आर्जवुनी मजला बोलविती,
परोपरी येती काकुळती,
पहा सोडिला संग.

जरि नाटकगृह हें गजबजलें,
जरि नानाविध जन हे सजले,
मजविण त्यांचें कितीहि अडलें,
पहा सोडिला रंग.

जरी खवळलें तुफान सागरिं,
मार्ग भरे हा जरि घन तिमिरीं,
पहा टाकिली होडी मीं तरि,
नमुनि तुला साष्टांग.

अतां पुकारो फेरीवाला,
गवळी नेवो गाइ वनाला,
कारकून जावो हपिसाला,
झालों मी निस्संग.

विसर्जिलीं मी स्वप्नें सारीं,
आशा लाविल्या माघारी,
दुनियेच्या आतां बाजारीं,
माझा न घडे संग.

## रिकामे मधुघट

[ जाति नववधू, राग बागेश्री ]

मधु मागशि माझ्या सख्या, परी
मधुघटचि रिकामे पडति घरीं ! ध्रु०

आजवरी कमळाच्या द्रोणीं
मधू पाजिला तुला भरोनी,
सेवा ही पूर्विंची स्मरोनी,
करिं रोष न सखया, दया करीं.

नैवेद्याची एकच वाटी
अतां दुधाची माझ्या गांठीं;
देवपुजेस्तव ही कोरांटी
वाळगीं अंगणीं कशी तरी.

तरुण-तरुणिंची सलज्ज कुजबुज,
वृक्षझऱ्यांचें गूढ मधुर गुज,
संसाराचें मर्म हवें तुज,
मधु पिळण्या परि रे बळ न करीं !

ढळला रे ढळला दिन सखया
संध्याछाया भिवविति हृदया,
अतां मधूचें नांव कासया ?
लागले नेत्र रे पैलतिरीं.

## दृष्ट हिला लागली !

[ जाति सुष्टिलता, राग यमनकल्याण ]

दृष्ट हिला लागली पडे कुणा पाप्याची साउली ! ध्रु०

लिंबलोण ग कोणी उतरा,
जगदंबेचा ग अंगारा
लावा, बांधा गंडादोरा.
काळजि घ्या चांगली !

चाफ्यापरि गोरेपण पिवळं,
काकडीपरी अंग कोवळं
मैद्यापरि लुसलुशीत सगळं,
दृष्ट पडुनि करपली!

ज्यांच्या पोटीं उदंड माया
लेकुरवाळ्या आयाबाया
पोक्त शहाण्या आणा दाया,
दावा चाफेकळी.

चिमणिसारखं तोंड जाहलं,
डोळ्यावरचं तेज चाललं,
नाक उंच वर येउं लागलं,
गत कशि ग जाहली!

विशाल डोळे लावुनि वरती
चित्रें पाही जाशि काकुळती,
मधेंच दचकुनि कान देइ ती,
पोर बाइ बहकली!

करकरीत तीनी सांजा ही
देवदर्शना एकलि जाइ,
वाऱ्यापरि ही अचपळ बाई
दुष्टें कुणि पाहिली!

गरिब भोळसर आयाबाया,
खऱ्या दृष्टिची वार्ताहि न यां!
अनुभव घेउनि सारें वाया!
माया खरि अंधळी!

# जयकृष्ण केशव उपाध्ये

(१८८३–१९३५)

## कविते ! करिन तुला मी ठार !

राग केदारा ]

कविते ! करिन तुला मी ठार ! ध्रु०
पू वंकर्वीनीं तुज रस पाजुनि मस्त बनविलें फार
रसबिस आतां मम साम्राज्यीं कांहिं न तुज मिळणार
लंकारमद-मत्त जहालिस धुंदि उतरितों पार
मोडुनि तोडुनि फेकुनि त्यांना दृष्टि न दिसुं देणार
पदोपदीं अवसानीं तुझिया करुनी घातक वार
सुवृत्त अथवा सुपदा काशि तूं हेंचि अतां बघणार
पदलालित्यें जनां भुलविलें केले नानाचार
भावाची बहु हाव तुला परि अभाव तुज करणार
नादांतचि रंगुनी गुंगविसि रसिकां करिसी गार
नाद तुझा तो नष्ट कराया समर्थ मी साचार
समृद्ध अर्थें असा मिरविला आजवरी बडिवार
अर्थाचा परि लश यापुढें तुजला नच मिळणार
कोशावरि तव भार सर्व परि लाविन त्याचें दार
शब्दांच्याचि न कृतिच्या दैन्यें मळविन तव संसार
व्याकरणाच्या अंकीं बसुनी शुद्ध म्हणविशी फार
ठार करुनि परि तया तुझ्यावर ओतिन अशुद्ध धार
अपशब्दांचा असा तुझ्यावर करितों बघ भडिमार
जरी न मेलिस तरि मेल्यापरि होशिल मग बेजार
देश धर्म वा वीर विभूती तुज न अतां दिसणार
आतां वणवण घुबडासंगें करविन तव संचार
मजलागीं तूं कोण समजशी मी तों कवि कलदार
कलदारचि कां ? शाहीरांचा फर्स्टक्लास सरदार

## चहा-टळपणा

[ चाल : नृपममता रामावरती ]

लाविला गुलाबी रंग । किती सुंदर आमुच्या बंग- । ल्याप्रती
शोभती कसे हे खांब । त्यांवरी वेलही लांब- । ती किती
मोगरी चमेली कुंद । लाविली चहुकडे सुंद- । राकृती
अंगणीं छानसा कुंज । वृंदावनिं तुळशी मंज- । न्या अती
गुंजतात गुं गुं भृंग । तो नाद तयांचा गुंग- । वी मती
कवितेंत जरी यतिभंग । जुळविलें यमक परि चांग- । लें किती

# आ नं द रा व कृ ष्णा जी टे का डे

( १८८८- )

## हा हिंददेश माझा

आनंदकंद ऐसा । हा हिंददेश माझा.
सत्यासि ठाव देई,
वृत्तीस ठेवि न्यायी,
सत्त्वास मानि राजा । हा हिंददेश माझा.
जगदीश जन्म घेई,
पदवीस थोर नेई,
चढवी स्वधर्म साजा । हा हिंददेश माझा.
जनकादि राजयोगी,
शुक, वामदेव त्यागी
घुमवीति कीर्ति वाजा । हा हिंददेश माझा.
दमयंति, जानकी ती
शीलास भूषवीती
नटली नटेश गिरिजा; । हा हिंददेश माझा.
विश्वास मोह घाली
ऐशी मुकुंदमुरली
रमवी जिथें निकुंजा । हा हिंददेश माझा.

प्र. ग्रं. स. ठाणे
९२८

आ. कृ. टेकाडे

गंगा हिमाचलाची
वसती जिथें सदाची
ऊनि राहि कलिजा । हा हिंददेश माझा.
पृथुराज, सिंह, शिवजी,
स्वातंत्र्यवीर गाजी
करिती रणांत मौजा; । हा हिंददेश माझा.
तिलकादि जीव देही
प्रसवूनि धन्य होई,
मरती स्व-लोककाजा. । हा हिंददेश माझा.
जगिं त्याविना कुणीही
स्मरणीय अन्य नाहीं,
थोरांत थोर समजा, हा हिंददेश माझा.
पूजोनि त्यास जीवें
वंदोनि प्रेमभावें,
जयनाद हाचि गर्जा, । 'हा हिंददेश माझा.'

## चला जाऊं चला पाहूं

कुंजवनीं या । चला जाऊं
काळी कांबळी पांघरलेली
तो वनमाली । चला पाहूं

पीत वसन कटिं कालिंदी-तटिं
विरहत नट तो । चला पाहूं
धेनु सकौतुक देखिति यन्मुख
यदुनायक तो । चला पाहूं
विश्वबांसरी खेळवि अधरीं
असा मुरारी । चला पाहूं
पंकजलोचन विधुसम आनन
मनमोहन तो । चला पाहूं
मधुवनमाला धरि कंठाला
वज्रप्रियाला । चला पाहूं

राधा-स्कंधीं भुज-तट बांधी
तो जगजेठी । चला पाहूं
दाउनि लीला तोषवि सकलां
त्या गोपाला । चला पाहूं
जगदाधारा करुणागारा
नंदकिशोरा । चला पाहूं
चिद्ब्रह्माची पूर्णांशाची
मूर्ति हरीची । चला पाहूं

## दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी

(१८८७–१९३९)

### संताजीची घोडदौड

तळहातीं शिर घेउनिया दख्खनची सेना लढली
तरि विजयी मोंगल सेना ना नामोहरम जहाली
पडली मिठि रायगडाला सोडवितां नाहीं सुटली
राजरत्न राजाराम
कंठास त्यास लावून
जिंजीवरती ठेवून
परते सरसेनापतिची घोडदौड संताजीची.

मिरजेवर पातशहाचीं शहाजणें वाजत होतीं
हाणिल्या तयांवर टापा फोडून टाकिलीं पुरतीं
मारिली टांच तेथून घेतला पन्हाळा हातीं
तों कळलें त्या वीराला
जिंजीला वेढा पडला
पागा घेवोनी वळला
चौखूर निघे त्वेषाची घोडदौड संताजीची.

झुल्फिकरखान लढवय्या कातरला झुल्फें त्याचीं
धूळधाण केली तेथें किति अमीर-उमरावांची
उसळली तिथोनी मांड मग त्या कर्दनकाळाची

जिंजीचा धुरळा मिटला
जालना प्रांतिं तो उठला
चोळितो शत्रु नेत्राला
गेली हां हां म्हणतांची घोडदौड संताजीची.

वाजल्या कुठें जरि टापा धुरळ्याची दिसली छाया
छावणींत गोंधळ व्हावा 'संताजी आया! आया!'
शस्त्रांची शुद्धी नाहीं धडपडती ढाला व्याघ्या
रक्तानें शरिरें लाल
झोपेनें डोळे लाल
जीवाचे होती हाल
ऐशी शत्रूला जाची घोडदौड संताजीची.

'धों धों' वाहे गिरसप्पा त्याला प्रतिसारिल कोण ?
'सों सों' शिशिराचा वारा रोधील तयाला कोण ?
हिमशैल-खंड कोसळतां त्याला प्रतिरोधिल कोण ?
होता जो गंगथडीला
आला तो भीमथडीला
एका दिवसांत उडाला
करि दैना परसेनेची घोडदौड संताजीची.

पुरताच बांधिला चंग घोड्यास चढविला तंग
सोडी न हयाचें अंग भालाबरचीचा संग
नौरंगाचा नवरंग उतरला जहाला दंग
तुरगावर जेवण जेवी
तुरगावर निद्रा घेई
अंग ना धरेला लावी
भूमीस खूण टापांची घोडदौड संताजीची.

न कळे संचरलें होतें तुरगांसहि कैसें स्फुरण
उफळाया बघती वेगें रिकिबींत ठेवितां चरण
जणुं त्यांसहि ठावें होतें युद्धीं 'जय किंवा मरण'
शत्रूचे पडतां वेढे
पाण्याचे भरतां ओढे
अडती न उधळती घोडे

ऐशी चाले शर्थीची घोडदौड संताजीची.

नेमानें रसद लुटावी नेमाजी शिंदे यांनीं
हयगज सांपडती तितुके न्यावे हैबतरावांनीं
वाटोळें सर्व करावें आटोळे सरदारांनीं
' खाड खाड ' उठती टापा
झेंपावर घालित झेंपा
गोटावर पडला छापा
आली म्हणती काळाची घोडदौड संताजीची.

चढत्या घोड्यानिशिं गेला बेफाम धनाजी स्वार
करि कहर बागलाणांत ओली न पुशी समशेर
बसवितो जरब यवनांना बेजरब रिसालेदार
वेगवान उडवित वाजी
तोंडावर लढतो गाजी
धावुन आला संताजी
पळती मोंगल बघतांची घोडदौड संताजीची.

नांवाचा होता ' संत ' जातीचा होता शूर !
शीलाचा होता ' साधू ' संग्रामीं होता धीर !
हृदयाचा ' सज्जन ' होता रणकंदनिं होता क्रूर !
दुर्गति ती संभाजीची
दैना राजारामाची
अंतरीं सर्वदा जाची
उसळे रणशार्दूलाची घोडदौड संताजीची.

मर्दानी लढवय्यांनीं केलेल्या मर्दुमकीचीं
मर्दानी गीतें गातां मर्दानी चालीवरचीं
कडकडे डफावर थाप मर्दानी शाहीरांची
देशाच्या आपत्कालीं
शर्थीचीं युद्धें झालीं
गा शाहीरा ! या कालीं
ऐकूं दे विजयश्रीची घोडदौड संताजीची.

# माधव [माधव केशव काटदरे]

(१८९२-    )

## हिरवें तळकोंकण

सह्याद्रीच्या तळीं शोभतें हिरवें तळकोंकण
राष्ट्रदेविचें निसर्गनिर्मित केवळ नंदनवन !
झुळझुळ गाणें मंजुळवाणें गात वाहती झरे
शिलोच्चयांतुनि झुरुझुरु जेथें गंगाजळ पाझरे;
खेळत खिदळत नद्या चालल्या गुणगंभीराकडे
दरिखोऱ्यांतुनि माणिकमोतीं फुलुनि झांकले खडे;
नील नभीं घननील बघुनि करि सुमनीं स्वागत कुडा,
गोमेदांच्या नटे फुलांनीं बरसातिंत तेरडा !
कडेपठारीं खेळ मारुतासह खेळे हिरवळ,
उधळित सोनें हंस नाचरें बालिश सोनावळ !
शारदसमयीं कमलवनाच्या तरल्या शय्येवरी
मदालसा स्वच्छंद लोळती जलदेवी सुंदरी !
कविकाव्यांतुनि तशी जींतुनी स्रवते माध्वी झरी
आमोदा उधळीत फुले ती बकुळीची मंजिरी.
हिरव्या पिवळ्या मृदुल दलांच्या रम्य गालिच्यावरी
स्वप्नीं गुंगति गोकर्णीचीं फुलें निळीं पांढरीं !
वृक्षांच्या राईंत रंगती शकुंत मधु गायनीं
तरंगिणीच्या तटीं डोलती नाग केतकीवनीं
फूलपांखरांवरुनि विहरती पुष्पवनांतिल परी
प्रसन्नता पसरीत वाजवुनि जादूची पांवरी !
शिताबाइच्या गोड हातचे पोहे जे काननीं
रागानें दे बाइलवेडा कवडा भिरकावुनी,
रोपें त्यांचीं बनुनि पसरलीं नाचत चोहींकडे
अजुनि पहा या ! मंडित त्यांनीं कोंकणचे हे सडे !
इतिहासाला वार्ता ज्याची श्रुत नाहीं जाहली,
दंतकथांसहि विस्मृति ज्याची होउनियां राहिली;

" झिम्मा खेळे कोंकणचा तो नृपाळ " म्हणती मुली
" गळे वसंतीं टपटप जेव्हां आंब्याची डाहळी !"
कुठें आढळे फळभारानें लवलेली आंवळी,
कुठें गाळिती भुळभुळ अपुलीं पक्व फळें जांभळी,
कुठें हलवितो पिंपळपानें पिंपळ पारावर,
कुठें वडाच्या पारंबीवर झोंके घे वानर !
कुठें बेहड्यावरि रावूस्तव विरही मैना झुरे,
प्राणविसांवा परत न आला म्हणुनि चित्त बावरे !
मधमाशांचीं लोंबति पोळीं कुठें सात्विणावरी
रंग खेळती कुठें प्रमोदें पांगारे, शेवरी !
पोटीं साखरगोटे परि धरि कंटक बाहेरुनी
झुले कुठें तो फणस पुरातन रहिवासी कोंकणी !
कोठें चिंचेवर शठ आंबा करि शीतळ सांउली
म्हणुनि कोपुनी नदीकिनारीं रातंबी राहिली !
निर्झरतीरीं रानजाइच्या फुलल्या कुंजांतुनी
उठे मोहमय संगीताचा अस्फुट कोठ ध्वनी !
कुठें थाट घनदाट कळकिचा, त्यांत संचरे कुणी
पुंगि बजावित फंदि मुशाफर दर्यापुर सोडुनी !
कुठें सुरंगीमुकुलकुलाच्या सस्मित वदनांतुनी
दरवळलेला परिमळ सेवित फिरति अप्सरा वनीं !
कोरांटीचीं, नादवटीचीं, नेवाळीचीं फुलें
फुलुनि कुठें फुलबाग तयांनीं अवघे शृंगारिलें !
नीललोचना कोंकणगौरी घालुनि चैत्रांगणीं
हिंदोळ्यावरि बसविति जेव्हां अंबा शुभदायिनी,
हळदीकुंकूं तदा वांटितां नसो प्रसादा उणें
पिकलीं म्हणुनी रानोरानीं करवंदें तोरणें.
औदुंबर तरु अवधूताचा छाया दे शीतळ,
शिवयोग्याचा बेल वाढवी भावभक्तिचें बळ;
बघुनि पांढरी भूतपाळ वेताळ काढितो पळ
आइन किंजळ करिती मांत्रिकमंत्रबळा दुर्बळ !
गडागडावर निवास जेथें माय भवानी करी,
रांहे उधळित फुलें तिथें खुरचांफा चरणावरी!

पानफुलांच्या वाहुनि माळा अंजनिच्या नंदना,
तिजवर वरुनी वैधव्याच्या रुइ चुकवी यातना !
' चिंव चिंव ' शब्दा करित लिंबावर खार भराभर पळे,
भेंडि-उंडिणींवरी बैसुनी करकरती कावळे.
लज्जारंजित नवयुवतीच्या कोमल गालांसम
रंगुनि काजू, भरले त्यांनीं गिरिडोंगर दुर्गम !
तिथें मंडलाकार मनोहर नर्तन आरंभुनी
रुसल्या सखिची घुमत पारवा करितो समजावणी !
हसे उपवनीं अर्धोन्मीलित सुवर्णचंपककळी
पाडुनि तुळशींवरी चिमुकली हलती निज सांउली !
केसर पिवळे धवल पाकळ्या, परिमळ अंवर भरी
वालित रुंजी भ्रमति भृंग त्या नागचंपकावरी !
सौगंधिक उच्छ्वास सोडिती प्राजक्ताच्या कळ्या
लाजत लाजत हळुच उघडितां निज नाजुक पाकळ्या,
त्या उच्छ्वासां पिउनि विजेचा चांद हर्षनिर्भरीं
होउनियां वेभान नाचतो निळावंतिच्या घरीं !
धुंद सिंधुला मारवेलिची मर्यादा घालुन
उभी सैकतीं कोंकणदेवी राखित तळकोंकण.
निकट माजलीं निवडुंगांचीं बेटें कंटकमय
आश्रय ज्यांचा करुनि नांदती कोंचिंदे निर्भय;
मागें त्यांच्या डुले नारळी-पोफळिचें आगर
पुढे विराजे निळावंतिचें निळेंच जळमंदिर !
राष्ट्रदेविचें निसर्गनिर्मित ऐसें नंदनवन
सह्याद्रीच्या तळीं शोभतें हिरवें तळकोंकण !

## मोऱ्यांची मोहना

ज्यावरि अपुलें रूप पहाया ओथंबे जांभुळ
घालुनि कुटरू थकला कवडा प्राशी ज्यांचें जळ,
त्या डोहाच्या दक्षिणतीरीं उभी लोललोचना
शीरगांवच्या मानकऱ्यांची मोऱ्यांची मोहना !

डाव्या बाजुस वाघजाइचें हांकेवर देउळ,
उजव्या बाजुस हांकेवरतीं खेमाचें राउळ;
मागें ‘ पोंकी धोंड ’ विस्मयें पसरी निज आनना !
कवडेकोंडावरी सांवळी मोऱ्यांची मोहना !

जिला पाहतां चित्त आपुलें कष्टानें आवरी,
शरिगांवचा सत्ताधारी कृष्णाजी आवरी.
पंचक्रोशींतला जियेच्या तरुण न आला मना,
कवडेकोंडावरी आज ती मोऱ्यांची मोहना !

न कळे होती काय निरीक्षित डोहापैलीकडे,
जेथें हांसत उभीं पांढऱ्या पानांचीं खावडें;
तिकडुनि वालेभोंक पांखरूं करी तियेला खुणा !
अर्थ तयांचा परंतु नेणे मोऱ्यांची मोहना !

निरखित होती आतुरतेनें तथापि पैलीकडे,
भेणें वालेभोंक पांखरूं एकाएकीं उडे !
दुरुनी आली ‘ टीं ! टीं ! ’ ऐशी टिटव्यांची सूचना,
अधिकचि तेणें उत्सुक झाली मोऱ्यांची मोहना !

शब्द जांभळीमागुनि आले अवचित दुसऱ्या क्षणीं,
मोहनेस अनुलक्षुन बोल वृक्षाआडुन कुणी
“ पंचक्रोशींतला जियेच्या तरुण न आला मना
कुणाकारणें आज इथें ती मोऱ्यांची मोहना ? ”

पाहुं लागली जांभळीकडे बाला न्याहाळुनी,
आला पुढती युवा एक तो त्या वृक्षामागुनी !
वदे, “ तुझा मी मोहन, माझ्या ओळखुनी घे खुणा ! ”
ओळख पटली; आणि कांपली मोऱ्यांची माहना !

“ भयें कांपसी ! ” म्हणे तिला तो, “ पिशाच मज मानुनी !
मरणाची मम परंतु वार्ता सत्य नव्हे साजणी !
असती ज्यांच्या जित्या वासना मरणें त्यांना मना !
कशी न जाणे चतुर शहाणी मोऱ्यांची मोहना ?

“ जिला माणकें म्हणुनि ओपिलीं वाळीचीं मीं फुलें,
‘ घे तानिवडें ! ’ म्हणुनि घातलीं कानीं सोनावळे;

करमत नव्हतें घडी एकही जिला माझियाविना,
जिती वासना, ती मज व्हावी मोऱ्यांची मोहना !

बारा वांवा सुंभ सोडिलें तरि न गावला तळ,
साळकाइंतिल काळडोहिंचें अथांग काळें जळ !
झटती जेथें सात आसरा रिझवाया मन्मना,
रिझे न मन परि जिथ न माझी मोऱ्यांची मोहना !

इथें पातलों तुला न्यावया अपुल्या जलमंदिरीं,
फणशीखालीं वारु उभा मम, चल तिकडे सुंदरी !
कशास अथवा चालायाच्या तुज द्याव्या यातना ? "
बोलुनि त्यानें उचलुनि नेली मोऱ्यांची मोहना !

फणशीपाशीं नेऊनि बसवी वारूवरतीं तिला,
धरुनि करीं तिज तिचियामागें आपणही बैसला.
सुटला वारू वेगामध्यें टाकित मागें मना !
क्षणांत पाहे साळकाइला मोऱ्यांची मोहना !

बारा वांवा सुंभ सोडिलें तरि न गावला तळ,
साळकाइंतिल काळडोहिंचें अस्थिर गहिरें जळ,
वारु शिरे त्या जळीं धन्याची पुरवाया कामना !
जळीं बुडालीं मोहन आणिक मोऱ्यांची मोहना !

काळडोहिंच्या जळीं बुडालीं वारूसह तीं तिथें,
दुसऱ्या दिवशीं दिसूं लागलें जुवें मनोहर जिथें !
अजुनि तयावर विहरे रात्रीं घेउनि निज मोहना
शीरगांवच्या मानकऱ्यांची मोऱ्यांची मोहना !

## जिवबादादा बक्षी

समशेरीला समशेर गनिमाची अजुनि न भिडली,
गर्जना न एकहि अजुनी गगनाला फाडित उठली,
राजांची मैदानाच्या पहिलीच सलामी झडली !

सैन्याचें काळिज मूर्त
जरिपटका ध्वज विख्यात
घेउनी रणांतुनि पळत
नादान तोंच हा कोण ?

यदुवंशविलासनृपांनीं आसेतु करुनि थैमान
लाविलें द्रविडराजांना ज्यापुढें कराया नमन,
जो मिरवित भाऊरायें हालविलें हिंदुस्तान,
हालत्या घड्यांवर ज्याच्या
मसनदी हलति यवनांच्या,
त्या ध्वजास निज राष्ट्राच्या
काळिमा कोण हा लावी ?

पळपुट्या राउताला या गांठुनी ओढुनी खालीं
दावील जरीपटक्याला रण पुन्हा असा वलशाली
सुत एक महाराष्ट्रींची माय काय नाहीं व्याली ?
दासींचे सगळे पोर
दास्यची जयांना प्यार
काय हे असे झुंजार
झुंजाया जमले समरीं ?

निर्जीव परी राष्ट्राचा जीव तें निशाण निघालें !
एकाहि तरी धमनींत नाहींच रक्त सळसळलें !
थंडेच जागच्या जागीं सर्वही मराठी भाले !
विस्मरण न हें स्वत्वाचें,
हें मरण राष्ट्रधर्माचें !
हे भावि गुलामगिरीचे
डोहाळे समजा पहिले !

पण नको अशुभ ही वाणी आल्याच दुरुनि या हांका !
ये दौडत दौडत वेगें भालाइत कोणी बांका !
कोण हा महाराष्ट्राच्या इभ्रतिचा पाठीराखा ?
रोधिलें पुढुनि मार्गाला
अडविला पलायनवाला !

हिसकिलें जरीपटक्याला,
थुंकुनी मुखावर बोले :

" नेशील कुठें नादाना  चेतना महाराष्ट्राची ?
जोंवरी जागती ज्योत  जीवाची या जिवबाची;
जा खुशाल आतां पळुनी  परवा न कुणाला त्याची !
नवतिचा न हा हंगाम,
हा नव्हे सुरतसंग्राम,
हा सर्वस्वाचा होम
राष्ट्रास्तव रणफंद्यांचा !

पळशील किती रे पळुनी  अति नाजुक तूं उमराव !
शिंद्यांच्या तोफांमागें  जा लपुनि बैस ! वांचीव
निज राष्ट्राहुनिही प्यारा  आपुला अमोलिक जीव !
तान्हेल्या शस्त्रां आजी
रिपुरुधिरें पाजुनि ताजीं
एकलाच राखिल बाजी
हा जिवबा शिवशाहीची !

अकलेचें शहर पुण्याच्या  वाजलें दिवाळें खास !
भरितात घरें मुत्सद्दी  दौलतिचा करुनी नाश !
सर्दारी म्हणुनिच असल्या  ये रांड्या राघोजींस !
गुल्जार असे सर्दार
संगरीं काय करणार ?
एकची खांब खंबीर
दौलतिचे दौलतराव ! "

इतुकेच बोलुनी बोल  मारिली टांच अश्वाला,
एकदांहि वळुनी मागें  पाहिलें न त्या भ्याडाला !
रणकेसरि हरिपंताला  रणभीरु कारटा झाला,
म्हणुनियां व्यथित जरि चित्त
फौजेंत परतला त्वरित;
फडकत्या ध्वजासह शिरत
चैतन्य नवें दळभारीं.

फडफडे जवें जरिपटका    तडफडे शत्रु लवलाहीं
तोफांच्या मारगिरीनें    यवनांची फुटली लाही !
तुटुनियां शिरें किति पडलीं    गणतीच तयांना नाहीं !
चेतलें युद्ध घनघोर
लागला निजामा घोर !
स्वाधीन करुन मशूर
श्रीमंतां आला शरण !

धन्य धन्य जिवबा मर्द !    मर्दुमकी त्याची न्यारी !
धन्य ते तयाचे वीर !    धन्य तीहि कर्तबगारी !
हा जरिपटका ध्वज धन्य !    धन्य ही यशस्वी स्वारी !
या महाकालिका धन्य !
हे विजयी भाले धन्य !
समरघोष ‘ हर हर ! ’ धन्य !
धन्य ही धन्य शिवशाही !

सजवुनि दलबादल डेरे    दरबार भव्य भरवोनी
सत्कारुनि जिवबालागीं    गौरविलें श्रीमंतांनीं !
केला मग जयजयकार    दरबारी उमरावांनीं !
“शौर्याचा पारावार,
शिवशाहीचा आधार–”
गर्जले मराठे वीर,
“—हा जिवबादादा गाजी !”

जरि अन्याच्या उत्कर्षी    असहिष्णु आजवरि झाले
चमकले तेहि परि आज    नानाचे हिरवे डोळे !
मारुनी मिठी जिवबाला    फडनवीस नाना बोले—
“ आणोनी परत निशाण
रक्षिला न केवळ मान
परि वांचविला रे प्राण
जिवबा त्वां शिवशाहीचा !”

## झुंज आमुचें कवीश्वरांचें शब्दमय !

गालांतिल तव गोड हशाचा झिम झिम पाउस सदा पडे,
गुलाबमुकुलाहुनी मनोहर लाज गुलाबी तुझी गडे !

रशिक रशेले तुझे रिझाऊ बोल परिसतां भान हरे,
गळती शब्दागणिक मुखांतुनि तुझ्या सुंदरी मोतिंहिरे !

कोमल पाउल तुझें चुरितसे लक्ष लक्ष हृदयें रमणी,
वेड अम्हाला तुझें, तुझ्या ही लीलांची अद्भुत करणी !

झुंड आमुची तुझियामागें आजेंवीत तुजला फिरते,
अजुनि कसें नवनीतकोमले ! चित्त तुझें नच गे द्रवतें ?

परस्परांचा हेवा दावा तुझ्याकारणें करूं जरी,
चढाओढिच्या खुशामतींचीं गीतें गातों तुझ्यावरी !

हावभाव हे पहा आमुचे, गीतें अमुचीं ऐक जरा,
भाग्यवंत जो अम्हामधिल तो निवडुनि कर अपुला नवरा !

इतर तयाशीं झुंजुनि त्याला ठार करूं हें नको भय ;
जरी झुंजलों, झुंज आमुचें कवीश्वरांचें शब्दमय !

# माधव जूलियन् [माधव त्रिंबक पटवर्धन]

( १८९४–१९३९ )

## संगमोत्सुक डोह

[ छंद ]

एकत्र गुंफून जीवित-धागे
प्रीतीचें नर्तन नाचलों मागें

एकटा उभा मी तेथें
भोवतीं शोधीं प्रियेतें ;

न दिसे कोठें; का सोडून गेली ?
लोपते का कधीं प्रीति उदेली !

दृष्टीस पडे हें भयाण मात्र
रेताड कोरडें उथळ पात्र !
प्रिया न जर संगतीं
तर हो कुंठित गति.
प्रीति या हृदयीं अथांग खोल
तुडुंब भरली परंतु फोल.

कोणी ये, हिणवी, " भावना मेली
हांसेना बोलेना करीना केली ! "
खट्याळ वादळी वारा
दाडत येतां भरारा
उठती चंचल बाह्य तरंग,
अंतरीं जडता न पावे भंग.

जीवनज्योत न माझिया गेहीं
म्हणून हें कृष्ण वसन देहीं;
एकली कौमुदी हासे,
ढगांत खिन्नच भासे.
स्तिमित नजर लाविती तारा,
मावळे उत्साह नाचाचा सारा.

खाऊन रवीचा प्रखर ताप,
कष्टून, लागून जीवांस धाप,
प्रदोषसमयीं येती
क्षणैक विसावा घेती,
घरास वळती माणसें गुरें,
अन् माझें अंतर निःशब्द झुरे.

अंबरीं इंद्राची दुंदुभि वाजे
भीषण सुवर्ण-सुंदरी साजे,
मेघांत हासत खेळे,
लवत नाचे ते वेळे
देवांचा भरून येऊन ऊर,
सहस्रनयनीं ओसंडे पूर !

नाचेल मयूर अवनीतलीं,
मंडूक ते द्विज गातील जलीं,
होऊन धुंद त्या क्षणीं
धावून प्रिय साजणी
देशील ना मज कसून खेंव ?
बांधितील वर तोरणं देव.

म्हणत मंगल जंगलगान,
कड्याहून खालीं लोटून प्राण,
होऊन काषायरंग,
संगांत पूर्ण निस्संग,
पावूं गे समाधिसागरीं अंत !
—अजून संपेना वैशाख हंत !

## कंचनी

कंचनी रसरंगाची खाणी,
शेकडों हृदयांची ही राणी
लागली गावया सहज पांखरावाणी.

आधिंच गोड जनानी गळा
कोवळा खुले, चढे मोकळा,
त्यांतून वश हिला संगीताच्या कळा.

साधें गीत किती हृत्संगी !
साथ करि चुरशीनें सारंगी,
घे तान भिंगरीपरी झरें तन्वंगी.

पायीं पैंजण रुम्झुम् छुमती,
बोलहि थकथय थकथय उठती
ध्वनि रम्य अभिनयें विशद करी ही सुदती.

तनू ही सडपातळ गुल्छडी,
घवघवे सुरत पाक फाकडी,
नादांत तरंगे जशी नभीं वावडी.

दावी किति नाचांत चलाखी !
झगमग खेळे मग पोशाखीं,
गिर्कीस विकासे घोळ, झळकती वाकी.

कांति तर सोनें बावनकशी,
कंचुकी नील, साज गुलबशी,
—उल्काच अवतरे ही किंवा उर्वशी !

धीटच परि भलती भरूलेला
न रुचे अशा नृत्यवल्लीला;
या विशाल नयनीं दिसे कलाच सुशीला.

दिव्यांचा लखलखाट मांडवीं,
वायुही गीतगंध साठवी,
रंगली किति सभा नृत्यगानलाघवीं !

हृदयें एकवटुनि या काळीं
हलती शांतपणें वरखालीं,
पण लाट उसळुनी पडे समेवर टाळी.

वाहवा ! ऐकुनि किंचित् लाजे,
गालीं स्मित मधु पुसट विराजे,
किति उजू कुरंगी नजरफेक ही साजे !

वदनीं मुग्ध मधुरता राही,
दावी काय कलाचतुराई
भावडी सावडी सरळ पोरसवदा ही !

अभिनव अविट सुखाची झरी
गुणी तूं सुगर रूपसुंदरी,
कंचनी, खचित तूं श्रेष्ठ काव्यमंजरी !

लोटला शांत रसाचा मजा,
चंद्रिका, गमशी कीं सारजा !
फुलवूनि झुलविशी कोळपल्या काळजां.

कष्टशी अशी हृदयरंजनीं,
हीन तव कला, जात कां जनीं ?
या कृतज्ञास तूं वंद्य सदा कंचनी !

# तेथें चल राणी !

[ वृत्त रात्रिवितान ]

कोठें तरि जाऊं बसुनी शीघ्र विमानीं
अज्ञात ठिकाणीं.
स्वातंत्र्य जिथें, शांति जिथें, प्रेम इमानी
तेथें चल राणी !

सामाजिक संबंध सखे, हे न टिकाऊ;
हे स्नेह दिखाऊ !
मी तूज, मला तूं, प्रभु दोघांस निदानीं,
तेथें चल राणी !

भाळे न इथें प्रीति धनावीण कुणाला,
ना मोल गुणाला;
लावण्य नसे जेथ जणूं चीज किराणी,
तेथें चल राणी !

व्हा बद्ध इथें, प्रेम करा वा न कराही,
नातें दृढ राही;
गे लग्नविधी जेथ न जीवैक्य-निशाणी,
तेथें चल राणी !

नातें पुरुषस्त्रीमधिं तें एकच वाटे,
ऐसें उफराटें
ज्यांचें मत, त्यांचें वच यावें नच कानीं,
तेथें चल राणी !

डोळ्यांत इथें लाडिक जादू परि खोटी,
अन् संशय पोटीं.
साधेपण जेथें न गमे गूण अडाणी,
तेथें चल राणी !

कांहींहि करा ही जनता मारिल नांगी
हांसूनि अपांगीं;

ध्येयास पुरा वाव मिळे, होय न हानी,
तेथें चल राणी !

स्वातंत्र्य न सत्तेविण, संभावितताही
दंभाविण नाहीं,
स्वार्थापुरतें सत्य न जेथें कुणि मानी,
तेथें चल राणी !

अन्याय इथें जोंवर अन्यास जहाला
तों त्रास कशाला ?
जेथें न शिणे केवळ लाभास्तव वाणी
तेथें चल राणी !

ही चैन अविश्रांत, वडेजाव विकाऊ
टाकूनिच जाऊं;
स्वाभाविक कष्टाळु जिथें रम्य रहाणी,
तेथें चल राणी !

ये कोठुनि कष्टाविण विश्रांति दिनान्तीं,
धर्माविण शांती ?
स्वादिष्ट सुधेहूनि जिथें भाकरपाणी,
तेथें चल राणी !

काव्यें नकली नीरस वाचूनि जिवाला
वाटे न जिव्हाळा;
फेंसाळत गाईल जिथें ओहळ गाणीं,
तेथें चल राणी !

कोठूनि गरीबी असतां रानफुलांहीं
शृंगारित राई ?
बेमोल जवाहीर खुले रात्रिवितानीं,
तेथें चल राणी !

कोठें तरि रानांत बसूं या नि हसूं या,
जेथें न असूया;

संतोष पडूं दे न कुठें न्यून निधानीं,
तेथें चल राणी!

बांधूं चिमणें खोपट कीं ऊब जयाची
दैवी प्रणयाची :
आल्या अनिकेतास खुलें स्वागत रानीं ;
तेथें चाल राणी !

अंकावर खेळूनि शिकूं सृष्टिसतीच्या
आत्मप्रगतीच्या
त्या गूढ कथा, ज्या न कुराणीं, न पुराणीं,
तेथें चल राणी !

## सुनीत

हो माझीच असें तुला विनविलें कां मी मनें उद्धट?
घाली तो मजलाच हार म्हणुनी कां घातलें संकट?
राहूं देच अपारदर्शक अतां दोघांत अन्तःपट,
न स्वाभाविक हा, असेंहि म्हण जा, प्रेमांतला पालट.

प्रीतीच्या धनसंपदेंत भरुनी त्यागात्मता राहिली
देतां प्रीति मिळेच ती, स्थिति अशी कोणी कधीं पाहिली?
स्वार्थाची कुसुमांजलि प्रिय हिला ती पाहिजे वाहिली,
कर्तव्याचरणीं मनास मग हो वा शांति वा क़ाहिली.

तूं मैनाच मनांतली म्हणुनि का कोंडूं तुला पंजरीं?
तूं आहेस सदा स्वतंत्र ललिते जा चारुतामंजरी.
मांगल्यप्रद माळ घाल कुणिही श्रेष्ठाचिया कंधरीं
होतां सूख तुला मला परतुनी पावेल तें अंतरीं.

गे तूं आणिक जो तुझा प्रिय असा–तो मित्र माझा जुना–
दोघांची नित पायकी करिन मी, संसार सारा सुना.

## मराठवाणा

महासिंधु याला असे पाठिराखा, तसे साह्य सह्याचळाचे कडे,
खडे दुर्ग साल्हेर, फोंडा, परांडा, अशेरी असे दक्ष चोहींकडे;
महाराष्ट्र हा कृष्णपाषाणदेही, परी लोहपाणीहि अंगांत या,
नद्या न्हाणिती तापि, कृष्णा नि गोदा, भिमा, मांजरा, वैनगंगा तया.

महात्मा खरा जो स्वधर्माभिमानी परी धर्मवेडास थारा न दे,
समत्वें गुणग्राहकत्वेंच योजी स्वकीयांस जो राष्ट्रकार्यामधें,
सदा वंद्य जो क्षात्रकर्मप्रणेता महाराष्ट्रसम्राट् शिवाजी प्रभू
तया पूज्य ती पूज्य तत्सेवकाला न कां संतमाता महाराष्ट्रभू ?

जिचा 'अमृतातेंहि जिंकील पैजा' असा बोल ये प्रत्ययाचा निका,
पहा भिन्नजातीय पुष्पाकरांहीं दिसे गालिचा कीं हिची वाटिका,
मराठी अशी ज्ञानदेवी जयाची असे मायबोली मराठीच तो,
हृदीं रक्त दे साक्ष तो बंधु माझा, कुठेंही असो उच्च वा नीच तो,

मराठीस अन्याय कोठेंहि झाला, स्वदेशीं विदेशीं कुणीं गांजिलें
मराठी कसा मी न संताप माझा धडाडे जरी तीव्र दुःखानि लें ?
मराठी जनांचेंच वर्चस्व राहो स्वतःच्या महाराष्ट्रदेशीं तरी—
प्रसादें तुझ्या कोणती व्यक्त आशा करूं अन्य हे वंद्य वागीश्वरी ?

## बेगमेचें विरहगीत

[ गज्जल ]

जमल्यास आज तारा अथवा खुशाल मारा !
तुमच्याशिवाय थारा मजला कुठें उदारा ?

सुल्तान या जिवाचे, स्वामी शिवाऽशिवाचे,
हृदयीं अखंड वाजे तुमचा छुपा नगारा.

विभवीं तुम्ही लपावें, अपुल्यामधें रमावें,
तुमच्या परंतु नांवें जगीं कारभार सारा.

वनभूमिभाग सारा मयुरी जणूं पिसारा,
परि नाथ दिल्बहारा! हृदयीं पहा सहारा!

त्याही रणांत हल्लीं धरि जीव आसवल्ली,
कीं प्रेम एककल्ली उडवी जिता फवारा.

शयनीं फुलें दमिश्की, न परी सुगंध इश्की,
बगिच्यांतुनी विखारी जणुं ये समूम-वारा

रुसलां जहाँपन्हा का? मारूं कितीक हांका
शशिवीण दीन राका पडली तिला विचारा.

चुकल्यास एक वेळां सदया! करा क्षमेला,
दिल्नूर बेगमेला विरहांत द्या निवारा.

## मनोरमा [सौ. मनोरमा श्रीधर रानडे]

(१८९६-१९२६)

### लिहूं कुणावर कविता!

फूलपांखरा! थांब जरासें
लिहुं दे तुजवर गाणें मधुसें
रंग देइं तव मला रम्यसे
गात तव चरित! फिरुं दे मज सर्वहि जगत

अरे!-उडसि कां?-थांब!-पकडतें!
गेलें!! येइ न कां परि हातें?
कोण सुखवि तुज मृदु संगीतें,
म्हणुनी जाशी वहु वेगें अन्यच देशीं?

लिहूं कुणावर कविता तरि मी
सुंदर सुरेंद्रचाप व्योमीं
लिहुं त्यावर का कविता नामी
हेंहि पण गेलें! काय हें विधीनें केलें!

* * *

नक्षत्रांची मृदु नव माला
रजनि शोभविल शशिकंठाला
बुलबुल फेकिल नभिं तानेला
मी समयीं त्या ! अर्पीन तिला नव कविता

तरल काव्यमय तेजोमूर्ती
काळोखाहुनि भिन्न आकृती
रजनी राज्ञी चित्रित चित्तीं
स्वप्नमय चित्रा अर्पीन मनोहर कविता !

तारा-पणत्या नभिं पाजळल्या
क्षितिजीं धरिलें चंद्रज्योतिला
केतुबाण नभिं सूंसूं गेला
उल्कासुमनें उधळिलीं कुणी मोदानें

विलसे शशि, उडुमाला गगनीं
बुडलें जग मंगलमय गानीं
कां नच येई रजनी अजुनी
स्वप्नराज्ञीला ! अति उत्सुक मी बघण्याला !

* * *

वाट पहातां दमलें ! कळलें—
'खपुष्प धरण्या धांवत सुटलें'
भ्रांतिकाव्यपटतंतू विरले
विषय कवितेला ! कोणीतरि द्या हो मजला !

रसिक म्हणे मज 'विषय कशाचा ?
पाठ बोल तूं निज प्रेमाचा
विचार कर तूं आयुष्याचा
गुंफ त्या कविता ! डोलव मग सगळ्या जगता !

# श्रीधर बाळकृष्ण रानडे

(१८९२-    )

## लेजीम

दिवस सुगीचे सुरू जाहले
ओला चारा, बैल माजले
शेतकरी-मन प्रफुल्ल झालें
छन झुन, खळ झण-झण खळ, झुन झिन, लेजिम चाले जोरांत !

चौवांनीं वर पाय उचलले
सिंहासनिं त्या उभे राहिले
शाहिर दोघे ते डफवाले
टप ढुम, ढुम ढुम, डफ तो बोले, लेजिम चाल जोरांत !

दिवटी फुरफुर करूं लागली
पटक्यांचीं वर टोंकें डुललीं
रांग खेळण्या सज्ज जहाली
छन खळ, ढुम ढुम, छन छन, पट ढुम, लेजिम चाले जोरांत !

भरभर डफ तो बोले घुमुनी
लेजिम चाले मंडल धरुनी
बाजुस, मागें, पुढें वांकुनी
खळ खळ, छन छन, झण छन, खळ झन, लेजिम चाले जोरांत !

डफ तो बोले, लेजिम चाले
वेळाचें त्या भान न उरलें
नादभरानें गुंग नाचले
छननन, ढुम ढुम, खळ छन, ढुम ढुम, लेजिम गुंगे नादांत !

सिंहासन तें डुलूं लागलें
शाहिर वरतीं नाचुं लागले
गरगर फिरले लेजिमवाले
छन छन, खळ खळ, झणणण, छन छन, लेजिम गुंगे नादांत !

दिनभर शेतीं श्रमुनी खपले
रात्रीं साधी लेजिम चाले
गवई नलगे सतारवाले
छन छन, खळ खळ, झणणण, छन झन, रात्र संपली नादांत !

पहांट झाली, तारा थकल्या
डफवाला तो चंद्र उतरला
परी न थकला लेजिममेळा
ढुम झन, खळखळ, लेजिम खालीं : " चला जाउं या शेतांत ! "

## विठ्ठल दत्तात्रेय घाटे

(१८९५-    )

### माझा अभिसार

(वृत्त पंचकल्याणी)

ऋतु वसंताची स्वारी आली, फुलंल बाई मी फुलवेली,
सजणाविण दुनिया सुनी परी वाटली.

साडी अस्मानी मी ल्यालें, नाना साजें मज सजवीलें,
मी नटलें थटलें अभिसारिकाच बनलें.

सजण मम कोण कसा तो होई, कोठें दिसेल ठाउक नाहीं,
परि मी भेटाया तया निघालें बाई !

चाललें बाई मी तांतडी, पालथी केली देशोधडी,
गवसेना कांहीं केल्या माझा गडी.

हुडकिलें किति मीं रानीं वनीं, पुशिलें पाखरांस साजणी,
कुणि सांगेना तो कोठें माझा धनी.

कुंथत होता ओढा कुणी, साथ मीं त्यास दिली असवांनीं,
वैऱ्याची गेली रात्र मला ऐरानीं.

तांबडें फुटलं तों त्यावेळीं, झुळ झुळ झुळुक वायुची आली,
लगभगी बिलगली हळूच माझ्या गालीं.

सखे साजणी! कथूं ग काई, रडत होतें मी धाई धाई,
तों कुणि साद घातली मिठी मारिली बाई.

दचकलें झाल मी बावरी, म्हटलें, 'हो सैताना दुरी!'
म्हणे तें, 'मग का तूं सैतानाची नोवरी?'

मान मीं वळवीली अभिमानें, फेकिली जहर नजर रागानें,
तों शुद्ध बुद्ध हरपली जणूं जादूनें.

झोत झंझ्याचा जैसा आला, झुकविलें नाजुकशा केळीला,
मी झुकलें तैशी कोणाच्या पायाला.

आलें क्षणांत शुद्धीवरी, पाहिलें उघडुनि डोळे वरी,
तों उचलुनि जवळी उभी करी मज स्वारी.

ओठ ओठास येउनी जुळला, देह देहास येउनी मिळला,
भासली धुगधुगी नाड्यांची उभयाला.

झालें इतुकी त्यांच्याजवळी, कीं ती मूर्ती अंधुक दिसली,
परि धुक्यांतुनी नेत्रिंच्याच अद्भुत गमली.

बोलले हळूच कांहीं कांहीं, मीं तें आयकिलेंही नाहीं,
परि गुपित त्यांतलें मला समजलें बाई!

झालें गडे कसेंसें मजला, लाजलें लवलें मी किति वेळां,
उसळलें रक्त तनु रसरसली वेल्हाळा.

वळसा बाहूंचा घातला, जिवाचा राजा बंदी केला,
शोभलें लता गुरफटे जशी वृक्षाला.

बोललें, "नाथा! रडलें कुढलें, अंतीं पायावर या पडलें,
अंतर नच द्यावें प्रिया! शरण मी आलें.

आपण कोण कोठचे राजे, करितां राज्य कसें मुलखाचें,
मज काय तयाचें आपण राजे माझे!"

प्रियकर किंचित सस्मित हंसले, स्मित तें माझ्या हृदयीं ठसलें,
मी नटलें थटलें अभिसारिकाच बनलें.

# दत्तात्रेय लक्ष्मण गोखले

(१८९८–    )

## गालबोट ?

होता पांघरुनी निमूट बसला जो रुक्षता नीरस,
    होते माजुनि राहिले चहुंकडे कांटेकुटे ज्यावरी,
    कांटेरी निवडुंग, तोहि जळका, फैलावलेला जरी,
ज्याची तर्वड, बाभळी खुरटल्या वा, शोभवीती कुस,

ऐसा माळ उजाडसा पसरला; मूर्ती धरी वांझता !
    त्याच्या देहिं कुठेंकुठें विरलशीं हीं मानवी पाउलें
    लागोनी लव पायवाट तुटकी नी नागमोडी वळे,
धोंड्यांचे उघडे थवे विखुरले वैराण निःस्तब्धता !

ओलावा लवही जिथें नच मिळे; त्याच्या न खाणाखुणा·
    पाणी ओघळलें असेल वळवी–गेली स्मृती लोपुनी·
    किंचित् वाळु कुठें, कुठें तण दिसे हें वाळलें कोळुनी,
ऐसा ओहळ,–अश्रुमार्ग गमतो तोंडावरी हा जुना !

निर्मोनी सरस प्रफुल्लवटिका उत्फुल्ल भू सुंदर
लागे दृष्ट म्हणोनि काय रचिलें या गालबोटा वर

# गजानन त्र्यंबक माडखोलकर

(१९००—    )

## शुक्र[illegible]

मी जेव्हां तुज पाहतों तळपतां सूर्यास्त झाल्यावर,
उत्कंठा हृदयांत दाटुनि मला तेव्हां असें वाटतें :
आली घेऊनि रत्नदीप गगनीं कांतास शोधावया
कालाची भगिनी,–प्रभा मधुर ही त्याचीच का फांकली ?

किंवा ज्यांतुनि इंदिरा प्रगटली तें दिव्य हेमांबुज
या गंभीर, अथांग सिंधुवरतीं शून्याचिया शोभतें;
कीं हें कष्ट करून विश्व शिणलें त्याला निशा द्यावया
येते शांति,–सदैव दूतच तिचा तूं काय अग्रेसर ?

तूं प्रातःसमयीं परंतु दिससी पूर्वेकडे जेधवां
तेव्हां हर्षित चित्त होउनि मनीं ही कल्पना येतसे :
ओली लावुनि दृष्टि ज्यावर मुनी ख्रिस्तास शोधीत ते
ज्याच्यामागुनि,–तोच काय असंसी तेजाळ तूं तारक ?
द्वेषाग्नी भडकून विश्व जळतें–हें भोगितें यातना,
तो श्रेयस्कर मार्ग दाविशिल का तूं आज त्याला पुन्हा ?

# गिरीश [शंकर केशव कानेटकर]

(१८९३–    )

## भलरी

(जाति कोकिळा)

भलॆरि घाला चला गड्यांनो, भलॆरिचं गा गीत
गड्यांनो, भलॆरिचं गा गीत        ध्रु०
पाझरला रस ह्यो चंदेरी
डोंगर झालं समूद रपेरी
घुमूं लागलं आनंदाचं शेतांतुन संगीत
गड्यांनो, शेतांतुन संगीत

पाचोळ्यांतुन सळसळणारा
झुळझुळुनी ह्यो शीतळ वारा
स्वच्छंदानं गात चालला आपुल्याच लहरींत

सूर लावुनी येड्यावाणी
वोढा गाई अपुलीं गाणीं
सजण लागला जणूं लावणी गाया खडकाळींत
गड्यांनो, गाया खडकाळींत

लवुन जुंदळा देई डोल
राजा अपुला ह्यो बिनमोल
गाउन् त्येला, घाम जरासा गाळूं या मातींत
गड्यांनो, गाळूं या मातींत

कणखर दावुनि म्हराटबाणा
गोळा करूं या मोतीदाणा
इर्जिक खावूं आनंदानं, बसून मंग् काळींत
गड्यांनो, बसून मंग् काळींत !

## शूर्पणखा

[ जाति शूर्पणखा ]

गेलें तुझ्यावर जडून । रामा, मन गेलें तुझ्यावर जडून ध्रु०
किति नटून् सजून् मी आलें,
किति अलंकार हे ल्यालें,
किति नाजूक गेलें बाइ होऊन !
हीं आभाळि वसनें मला
प्रिय तुझ्यासाठीं घननिळा
किति घेसी आतां जिव ओढून ?
तुझ्या रूपानें मन मोहिलें,
तुझ्या पायाशिं तन वाहिलें,
चल भेटूं आतां कडकडून
मी प्रभावशालिनि सती
कां सीतेवर धरशीं प्रिती ?
जिवलगा, तिला चल सोडून
दृष्टि रामाचि स्तिमितचि झाली,
सीतामाई हसूं लागली;
शूर्पणखा गेली मग चिडून !
धावे खायास मायाविनी
लक्ष्मणानें तों येउनी
परतवीलि नाककान कापून !

# सुंदर हिरवे माळ !

[ जाति कोकिळा ]

सुंदर हिरवे माळ ! चहुंकडे सुंदर हिरवे माळ !
जमली काळी वर घनमाला,
झिम् झिम् पाउस खालीं आला,
ग्रीष्मर्तूचा ताप निवाला,
कोंभ येउनी दूर दूरवर पालवलें खडकाळ !

बोरवनाचीं सुकलीं पानें,
तरतरलीं या नवजलपानें;
विरळ बाभळी चैतन्यानें,
स्वानंदानें डुलूं लागल्या सकाळसायंकाळ.

सुकलीं गवतें गोट्यांखालुन—
हिरवळुनी बघती डोकावुन,
रसरसलेल्या तेजें न्हाउन—
मराठमोळा तरुण कुमारी लाजति कीं लडिवाळ

समोर इकडे तिकडे भंवतीं
हलूं लागली हिरवी नवती,
ओलसरीनें पानें दंवती,
माळावरल्या वनराणीला नजराणाच सुढाळ.

सुकल्या ओढ्यांतुन ही खळखळ
झुरमाडांतुन करी धांवपळ,
गीतमोहिनी घालुन मंजुळ,
हळुच नर्तनीं वाजवि अपुले पायांमधले चाळ !

जोगवलेलीं गुरें कुणाचीं
दूरवरूनी जात सांजचीं
अडवित तेजें मावळतीचीं ?
काळ्या छाया सरती एकामागुन एक विशाल.

क्षितिजिं निळसर वाफाऱ्यांचे
तरंगती ढग नव रंगाचे;
शिखर न कोठें सह्याद्रीचें;
मात्र एकला जवळ उभा हा ऐटिंत राजमहाल !

निवलीं रानें, गुरेंवांसरें;
निवलीं झाडें रानपांखरें;
धनी अंतरीं निवले सारे;
शेतकऱ्यांच्या पोटामधला निवेल कधिं पण जाळ ?

# यशवंत [यशवंत दिनकर पेंढरकर]

(१८९९- )

## दैवतें माय-तात

[जाति दिंडी]

तुम्ही होतां मज पूज्य पूर्वकाळीं
नाहिं आजहि ती पूज्यता निमाली
जधीं तुमचें देहावसान झालें
लोचनांचीं झिरपलीं आलवालें

जन्मदात्यांच्या दुःख वियोगाचें
पालकांच्या वात्सल्यसमाप्तीचें
आणि जगतांतिल एकलेपणाचें
किती दुबळ्या दाखवूं वदुनि वाचे !

मास-वरुषांच्या परी अंतरानें
—नव्हे, काळाच्या गार फुंकरानें
दाह विरहाचा शमुनि अंतरींचा
झरा नयनीं आटला आसवांचा

आणि आतां थाटल्या प्रपंचांत
अहो, झालों आम्हीच माय-तात !
माय-तातांच्या ह्याच भूमिकांनीं
दिली तुमची थोरवी जाणवोनी

पाखरांची किलबील दीनवाणी
बघुनि भंवतीं, हें हृदय होइ पाणी

किडामुंगींची वाण नेहमींची !
क्षुधाव्याकुल तोषवूं केंवि चोंची !

थिट्या अमुच्या पंखांत ऊब कोठें ?
प्राण चिमण्यांचा लोचनांत गोठे !
आणि कळतें सोसतां ताण हाल
किती आम्हांस्तव कष्टलां असाल !

गिरिशृंगांना जेविं मेघमाला
तुम्हीं पोटाशीं घेतलें अम्हांला
जेविं दिग्गज ह्या वसुंधरेसाठीं
तुम्ही अमुच्या राहिलां पुढें-पाठीं

कळा वृश्चिकदंशशा साहुनीयां
अम्हां दिधली शैशवीं अंकशय्या
झोप बाळांची पावुं नये नाश
म्हणुनि अपुले रोधिले तुम्ही श्वास.

दीप तेवावा जेविं अहोरात्र
मन निरलस जागलां श्रांतगात्र
मानहानी पतकरुनि रोष लोकीं
तुम्हीं केली नित पाठराखणी कीं.

शिळेंपाकें सेवून सणावारीं
जुनेंपानें लेवून घरींदारीं
सदा पुरवावें गोड धड मुलांना
असे अवघड संसार, यज्ञ जाणां

आज आचरतां तोच यज्ञधर्म
थोरवीचें आपुल्या कळे मर्म
आणि येति न जरि आंसु लोचनांत
मना झालीं दैवतें माय-तात.

# हा काय माझा गुन्हा ?

[ जाति प्रणयप्रभा ]

तुजकडे पाहतों पुन्हा पुन्हा
हा काय गडे माझाच गुन्हा ?

सतेज सुंदर टपोर डोळे
भावचंद्रिका जयांत खेळे
उचंबळे हृत्सिंधु तीमुळें
विसरेल कसा तो आत्मगुणा ?

छटा ढगांच्या जणुं शशिभवतीं
बटा कचांच्या निटिलावरतीं
मोरपिसासम सदा नाचती
पिसें लावतिल त्या न कुणा ?

नाजुकतेचा मृदुल गालिचा
नाच तयावर आरोग्याच्या
तांबुस कांतिमया लहरींचा
लाजवितेस उषा-अरुणा !

गालीं किंचित गोड फुगवटी
लवलवणारी सुबक हनुवटी
नजरेमधली लकब चोरटी
मदिरेस आणिती धुंदपणा

नयन नासिका अभिनय वाणी
प्रखर परजल्या शस्त्रावाणी
विंधिलेंस तूं मजसी त्यांनीं
काय न या पाहसी व्रणा ?

सन्मुख गमसी तूं राकाशशि
दुरून दिससी ताऱ्याऐशी
उजळशील पथ घन नैराश्यीं
उपजे हा भरवसा मना

भयद न वाटावी ही अटवी
निज वास्तव्यें यास्तव नटवी
जननान्तारिंच्या आणिक पटवी
हृदयाच्या हृदयास खुणा
तुजकडे पाहतों पुन्हा पुन्हा

## गोलघुमटांत

( सुनीत : शार्दूलविक्रीडित )

जैसा एकच टाकिला जरि खडा त्या संथ पाण्यावरी
एकामागुनि एक कैक वलयें उत्पन्न होती तरी
तैसा एकच शब्द गोलघुमटामाजीं जरी बोलसी
त्याचे उद्‌भवती निनाद किति, हें आश्चर्य तूं मानिसी

का आश्चर्य तुला चमत्कृतिमया कारागिरीचेंच ह्या ?
देहाच्या दुनियेमधेंहि तसली कारागिरी माझिया.
बाले ! तो प्रिय शब्द एकच तुवां उच्चारिला जेधवां
माच्चित्तीं घुमुनी अनंत पटिंनीं सामावला तेधवां

जाती येथिल हे निनाद विलया अल्पावकाशें तरी
बोलाचे श्रवतों निनाद तुझिया हा काल मी अंतरीं
येई ऐकुं इथें जरी पुसटही टोकास त्या बोलतां
मौनाचेहि तुझ्या निनाद घुमती ही मन्मनीं सूक्ष्मता.

आलें काय न हें तुझ्या अनुभवा आश्चर्य? कारागिरी?
त्याची आकृति काढिली घुमट हा बांधून कोणी तरी !

## गुलामाचें गाऱ्हाणें

[ वृत्त श्यामला ]

| | |
|---|---|
| जूं बैसलें मानेवरी | चाबूक हा पाठीवरी |
| ह्या कर्दमी मार्गावरी | चौखूर धावावें परि |
| हाकावया जो बैसला | सत्तामदें तो झिंगला |
| माया दयेची आर्द्रता | नाहीं तयाच्या अंतरीं |

मागें रथामाजीं धनी
त्वेषें लगामा खेचुनी
घोंड्यावरी ठेचाळतां
उंचीवरी संथावतां

थुंकी तयाची झेलुनी
आसूड ने खालीं वरी
खांचेंत पायीं मोडतां
ते कोरडे अंगावरी

विश्रामधोनी वांचवा
या हाकणाराच्या नसे
त्या बक्षिसाच्या पोतड्या
माझ्या तनूच्या चिंधड्या

कर्तृत्व सारें दाखवा
पर्वा तयाची अंतरीं
हासून मोतद्दार घे
कोणीहि पाहेना परि

धावूं किती रे मालका ?
किंवा तुझी इच्छाच का—

होसी दयेला पारखा
जावें फुटोनी म्यां उरीं ?

## द्या आम्हांला सुळीं

[ जाति समुदितमदना; भुपाळीसारखी ]

द्या आम्हांला सुळीं, जाहलों आम्ही तुमचे बळी
जगीं चिरंतन नांदतील परि अमुच्या शाण्णव कुळी.

खुडून टाका अम्हांस–आम्ही दुर्वांकुर भूतळीं
पाताळापर्यंत आमुची परंतु रुजली मुळी.

काय हटवुनी हटतो सागर ?–हटेल एकीकडे
उफाळेल तो दुसरीकडुनी गिळून डोंगरकडे.

ज्वालामुखिला बघतां लिंपूं? काय कल्पना खुळी !
तोच अनावर उद्यांस होइल जागृत शाण्णव कुळीं.

भाऊराया ! देवकिचीं हीं वधा सात अर्भकें
किती तोकडे उपाय ? त्यांनीं होणारें का चुके ?

बांधुनियां अंधारकोठड्या, वधस्तंभ रोवुनी
बलोद्धतांनो ! धराल का अवतारकार्य रोधुनी ?

शिळेवरी आपटा आमुचीं अहो, शिरें कोवळीं
सुटून तुमच्या मुठींतुनी परि शक्ति जगीं मोकळी.

द्या आम्हांला सुळीं! जाहलों आम्ही तुमचे बळी.
अमर तत्त्व;—अवतार तयाचा वाढतसे गोकुळीं.

द्या आम्हांला सुळीं आणि व्हा कलेवरांचे धनी
फोडुनि पणत्या ज्योतितत्त्व का जाई जगतांतुनी ?

आम्हांला सुळीं आणखी मूठ-मूठ व्या धुळी
रुंडमालिका अमुची त्या तर ज्योतींवर काजळी.

मरणीं अमुच्या अनेक फुलतिल लोकीं दीपावली
जेत्यांनो व्हा पराभूत हो देउनि आम्हां सुळीं.

खुशाल द्या फांसांत गुंतवा एकेकाचा गळा
पुरा साजरा करा आमुच्या विजयाचा सोहळा.

आजवरी जुळविली यथामति जी जीवितपुस्तिका
फांशीविण तिज नसे समुचिता भरतवाक्यगीतिका.

द्या आम्हांला सुळीं; होउं द्या कृतार्थ जन्मुनि कुळीं
पितर मुक्तिच्या मोदें म्हणतिल, " धन्य पुत्र हे बळी !"

भावि पिढ्यांना मिरवायास्तव अपुल्या वक्षःस्थळीं
तजेल अक्षय चिन्ह द्यावया द्या आम्हांला सुळीं.

## जगराहटी

जगा ! तुझी सारी तऱ्हा सदा उफराटी !

एक तरी बागेंतील
फूल कौतुकें देशील
बाळगिली आशा फोल
अतां पुष्पराशीमाजी बुडे मात्र ताटी !

आपुल्याच जातां पायीं
पाडियलें ठायीं ठायीं;
केव्हढी ही आतां घाई
चालविती द्याया खांदा; मिरविती हाटीं.

फुकटचा शब्द गोड
बोलला न कोणी धड
उठविली निंदा-झोड;
स्मशान हें निनादतें अतां स्तुतिपाठीं.

साद कुठें येईल का,
ह्याच अपेक्षेनें एका
तुडविलें तिन्ही लोकां;
मिथ्या कलेवरा द्याया अतां आप्तदाटी.

हयातींत आगडोंब
विझविण्या एक थेंब
मिळाला न; आतां कुंभ
किती रिकामे हे होती तिळांजलीसाठीं.

उभविला स्नेह-गाथा
पाचोळाच आला हातां
खिळेठोक झाली माथां;
अस्थिवरी देवालयें आतां नदीकाठीं.

मिळावया ऊब कोठें
झिजवितां उंबरठे
बंद दार जेथें तेथें;
धूपारती शेजारती अतां दीनरातीं.

सतावून यावज्जीव
ओलांडतां आतां शीव,
दाखविती प्रेमभाव
परिमार्जनाची धन्य तुझी ही रहाटी !

# वासुदेव गोविंद मायदेव

(१८९४—    )

## भास

मी उठुन सकाळीं कामाला लागतें
पण वेळोवेळीं भासे मम चिमणें मज बाहतें

मी भाजी चिरतां दचकोनी थांबतें
करिं हळुच धरोनी पातें मज गमे बाळ पाहतें

मी थकुन दुपारीं धरणीवर टेकतें
निश्चिंतपणें तइं वाटे मजजवळ बाळ झोंपतें

मी कधा दुपारीं डाळ गहूं निवडितें
खुडबूड कुठें तरि चालू बाळाची मज वाटते

मी कधीं देउळीं प्रदक्षिणा घालितें
भुरभूर माझियामागें पण गमतें कुणि चालतें

मी सायंतनिं जेधवां वात लावितें
मम चिमणें कर जोडोनी मजजवळ उभें भासतें

या भासानें तर ऊर कसें दाटतें
नशिबींचें सुख संपोनी गेलेंसें मज वाटतें.

## इरलेंवाली

वेडिवांकडीं घेउनि वळणें
नागिण धांवे जणुं रोषानें
वाफा टाकित धांपांपरि ही गाडी धडधडते !

वरतीं भिडली घन घनमाला
धूम धांवते दिग्भागांला
रथचक्रांच्या घरघरीपरी गगनीं गडगडते !

कड्यांकड्यांवर गार चारिवर
झडून राहे सरीवरी सर
जिकडे तिकडे जलधारा ही साराखि खळखळते !

बांधावरतीं ऐशा वेळीं
नाजुक बाला काळिसांवळी
हादरणारें शिरिंचें इरलें धरण्या धडपडते !

वेष तिचा तो सुंदर साधा
लपवुनि गोंडस ठुसका बांधा
दावी यौवनकांती किति ती अंगीं मुसमुसते !

आज ना जरी धांवुनि येतिल,
लावणि कसची शेतीं होइल;
सासुसासरा उपाशि देवा !—ऐशी पुटपुटते !

हातिं रोप परि गाडी निरखुनि
बघते अपुलें आलें का कुणि
दिसतां लज्जालहरी शरिरीं निमिषीं थरथरते !

प्रेमदृश्य हें बघण्या चोरुनि
गुपचिप वाहे नदि इंद्रायणि
स्वभालिं न असें भाग्य म्हणुन का मनिं ही हळहळते !

# काव्यविहारी [धोंडो वासुदेव गद्रे]

(१८९४-    )

## मंजुळा

विस्तीर्ण वडाच्या दगडी पारावरी
मी बसें एकदां चिंतित कांहींतरी
कितितरी वडाच्या पारंब्या लोंबती
त्या पारंब्यांची गर्दी झाली किती.

मंजुळा पोरगी कुणबी जातींतली
बांध्यानें नीटस आणि काळिसांवळी
वय तिचें असावें तेरा चवदा तरी
ती पारंबीच्या खेळे झोल्यावरी

जरतारी पातळ नव्हती ती नेसली
नोहता फुलांचा गजरा वेणीवरी
वर्णही नोहता जरी केतकीपरी
निर्व्याज खुलेपण हीच तिची माधुरी.

चरणीला लावुनि पांच चार शेरडें
ती मधुनी मधुनी पाही त्यांच्याकडे
गुणगुणे खेडवळ गाणें कांहींतरी
घे खुशाल झोंके हलत्या झोल्यावरी

तिज माहित नव्हते शहरांतिल चोजले
लाजणें मुरडणें असेल मग कोठलें ?
मी नांव तियेचें पुशिलें जेव्हां तिला
खणखणीत सांगे, " मज म्हणती मंजुळा. "

मग विचारिलें मी, " तुम्हि भावंडं किती ? "
ती झटकन् सांगे, " मी आणी श्रीपती.

शेतांत श्रीपती गेला राखायला.
आणिलीं शेरडें मी हीं चारायला."

बोलुनी एवढें झोके चढवायला
नेटानें लागे; भान नुरे मग तिला
ती खुल्या दिलानें झोके घे मंजुळा
सानंद कौतुकें बघत उभा मी तिला.

तिज काय वाटलें नकळे परि थांबली
निमिषांत उतरली झोल्यावरुनी तळीं
क्षणभरी मजकडे निर्हेतुक पाहुनी
मंजुळा पळाली क्षणार्धांत तेथुनी

मजपुढुनी गेली भरकन् वाऱ्यापरी
शेरडांत मिसळुनी जाई निघुनी दुरी
त्या खुलेपणांतिल आठवीत माधुरी
मी किती वेळ तरि बसलों पारावरी

ती निर्भय वृत्ती, निर्हेतुक पाहणें,
तें गोड खुलेपण अ मुच्यामध्यें उणें
येतसे स्वतःचें कृत्रिम जीवित मनीं
कष्टलों परतलों घरास मग तेथुनी.

हा प्रसंग घडुनी किति वर्षें लोटलीं
भंवतालीं सारी कृत्रिमता माजली
परि मधुनी मधुनी आठवते ती मला
खेड्यांतिल साधी आणि गोड मंजुला

# ह रि स खा रा म गो ख ले

(१८९४—  )

## पा गो ळ्या

[ वृत्त शार्दूलविक्रीडित ]

पागोळ्या पडती झराझर किती या पांढऱ्या गोजिऱ्या
गेहाच्या निटिलावरी विलसल्या मुंडावळ्या साजिऱ्या
आम्ही दीन दरिद्रतेसह जिथें संकोचुनी राहतों
त्या गेहावरुनी प्रवाह रजता, आतां तुझा वाहतो.

मोती आणि हिरे घरांत कुठले, आम्ही दरिद्री किती
आकाशांतुनि ते घरावरुनियां खालीं तरी सांडती
धारेची अति शुभ्र तार निगुती काढून जी ठेविली
तीमाजीं टिपुनी टपाटप जणूं मोत्येंच तीं ओविलीं.

पाहायास महाग आणि सहजीं दुष्प्राप्य जी आमुतें
आतां तीच कलाबतू अमुचिया दारापुढें लोंबते
तीचें अद्‌भुतरम्य जें मखर हें गेहापुढें जाहलें
त्याचे दीर्घ अखंड सर्व सर हे शोभून गेले भले

आली ही प्रभुची कृपा वळवुनी दीनावनीं तत्पर
कीं स्वर्धेनु पयस्विनी वसुमती माताच ये सत्वर
भूमाते, अभिषेक हा करितसे आकाश तूझे शिरीं
होते मंत्र म्हणावयास म्हणुनी स्फूर्ती मला अंतरीं !

शेतांत श्रीपती गेला राखायला.
आणिलीं शेरडें मी हीं चारायला. "

बोलुनी एवढें झोके चढवायला
नेटानें लागे; भान नुरे मग तिला
ती खुल्या दिलानें झोके घे मंजुळा
सानंद कौतुकें बघत उभा मी तिला.

तिज काय वाटलें नकळे परि थांबली
निमिषांत उतरली झोल्यावरुनी तळीं
क्षणभरी मजकडे निर्हेतुक पाहुनी
मंजुळा पळाली क्षणार्धांत तेथुनी

मजपुढुनी गेली भरकन् वाऱ्यापरी
शेरडांत मिसळुनी जाई निघुनी दुरी
त्या खुलेपणांतिल आठवीत माधुरी
मी किती वेळ तरि बसलों पारावरी

ती निर्भय वृत्ती, निर्हेतुक पाहणें,
तें गोड खुलेपण अमुच्यामध्यें उणें
येतसे स्वतःचें कृत्रिम जीवित मनीं
कष्टलों परतलों घरास मग तेथुनी.

हा प्रसंग घडुनी किति वर्षें लोटलीं
भंवतालीं सारी कृत्रिमता माजली
परि मधुनी मधुनी आठवते ती मला
खेड्यांतिल साधी आणि गोड मंजुला

# हरि सखाराम गोखले

(१८९४—    )

## पागोळ्या

[ वृत्त शार्दूलविक्रीडित ]

पागोळ्या पडती झराझर किती या पांढऱ्या गोजिऱ्या
गेहाच्या निटिलावरी विलसल्या मुंडावळ्या साजिऱ्या
आम्ही दीन दरिद्रतेसह जिथें संकोचुनी राहतों
त्या गेहावरुनी प्रवाह रजता, आतां तुझा वाहतो.

मोती आणि हिरे घरांत कुठले, आम्ही दरिद्री किती
आकाशांतुनि ते घरावरुनियां खालीं तरी सांडती
धारेची अति शुभ्र तार निगुती काढून जी ठेविली
तीमाजीं टिपुनी टपाटप जणूं मोत्येंच तीं ओविलीं.

पाहायास महाग आणि सहजीं दुष्प्राप्य जी आमुतें
आतां तीच कलाबतू अमुचिया दारापुढें लोंबते
तीचें अद्भुतरम्य जें मखर हें गेहापुढें जाहलें
त्याचे दीर्घ अखंड सर्व सर हे शोभून गेले भले

आली ही प्रभुची कृपा वळघुनी दीनावनीं तत्पर
कीं स्वर्धेनु पयस्विनी वसुमती माताच ये सत्वर
भूमाते, अभिषेक हा करितसे आकाश तूझे शिरीं
होते मंत्र म्हणावयास म्हणुनी स्फूर्ती मला अंतरीं !

# केशवकुमार [प्रल्हाद केशव अत्रे]

(१८९८-      )

## श्यामले—

[ वृत्त तुङ्गभद्रा, मिथुनराशि, राक्षसगणी. ]

तूं छोकरी, नहि सुन्दरी  मिष्कील बाल चिचुन्दरी,
काळा कडा मी फत्तरी  तूं काश्मिरांतिल गुल-दरी !
पाताळिंचा सैतान मी !  अल्लाघरींची तूं परी !
तूं मद्रदेशिय श्यामला,  मी तों फकीर कलन्दरी !
मैदान मी थरपार्करी,  तूं भूमि पिकाळ[1] गुर्जरी,
अरबी समुद्रहि मी जरी,  तूं कुद्रती[2] रसनिर्झरी !
आषाढिंचा अन्धार मी,  तूं फाल्गुनी मधुशर्वरी !
खग्रास चन्द्र मलीन मी,  तूं कोर ताशिवें[3] सिल्व्हरी !
बेसूर राठ 'सुनीत[4]' मी,  कविता चतुर्दश तूं खरी,
'हैदोस' कर्कश मी जरी,  'अल्लाहु अक्बर' तूं तरी !
माजूम मी, तूं याकुती,  मी हिङ्ग काबुली, तूं मिरी,
अन् भाङ्ग तूं, चण्डोल[5] मी,  गोडेल मी, तूं मोहरी !

---

१. सुपीक. 'अळ' प्रत्ययानें साधिलेलीं नामें युक्तता दर्शवितात; जसें, तप-तपाळ म्हणजे तपोमय, सुत-सुताळ म्हणजे सुती. २. 'नैसर्गिक' अशा अर्थाचा सदरहू गुजराती शब्द वापरल्याबद्दल घेडगुजरीपणाचा आरोप वाचक न करोत ! ३. सदरहू शब्द गांवठी असला तरी बेचूक आहे. इतका परिणामकारक शब्द या ठिकाणीं दुसरा वापरून दाखविल्यास आम्ही आपला शब्द मागें घेऊं ! ४. 'मऱ्हाठी' भाषेचें शाब्दिक दैन्य दूर करण्यासाठीं कांहीं धाडसी शब्दशार्दूलांनीं एक 'हिंदु मिशनरी सोसायटी' काढलेली असून तिच्यामार्फत बाटग्या मऱ्हाठी शब्दांना परत 'कळपां'त तर घेण्यांत येतेंच; एवढेंच नव्हे तर कुठल्याही परदेशी शिखानष्ट शब्दालाही 'व्रात्य-स्तोम' पद्धतीनें विधिपूर्वक 'बाप्तिस्मा' देऊन स्वभाषेंत घेण्यांत येतें. गोऱ्या कातड्याचें हें विलायती पोर देशी आंगड्याकुंचड्यांत 'सॅल्युअम दगडू' अशा नेटिव ख्रिस्ती माणसाच्या नांवाप्रमाणें किंवा मुक्तिफौजेंतील भगव्या धोतरपटक्यां-तील साहेबाप्रमाणें कसेंसेंच दिसलें, तरी वाढत्या परिचयानें त्याविषयीं आपलेपणा वाटूं लागेल, अशी खात्री आहे. ५. हा पक्षिविशेष नसून मादक पदार्थ आहे.

मी तों पिव्यांतील बेवडा,  व्हिस्कींतली तूं माधुरी,
काडेचिराइत मी कडू,  तूं बालिका खडिसाखरी !
पॅटीस तूं, कटलेट मी,  ऑम्लेट मी, तूं सागुती,
कांदे-बटाटे-भात मी,  मुर्गी बिऱ्यानी[६] तूं परी !
अक्रोड मी कन्दाहरी,  तूं साहऱ्यांतिल खर्जुरी,
इस्तम्बुलीय अबीर मी,  नेपाळची तूं कस्तुरी !
मी धोङ्गडें अन् लक्तरीं,  मख्मूल तूं मउ भर्जरी,
बेडौल वक्र त्रिकोण मी,  तूं लम्बवर्तुळ गे परी !
तूं वाढली कितीही जरी  मज वाटसी पण छोकरी,
जरि सूल हें कमरेवरी  तरि तूं मला छकुल्यापरी !
गाम्भीर्य आणि वयस्कता  जरि हीं तुझ्या मुखड्याकरी,
स्मरते मला तव सानुली  मूर्ती मनोहर पर्करी[७] !
लव हांसरी, लव लाजरी,  लव कावरी, लव बावरी,
चिनिमातिची जणुं बाहुली  मउ शुभ्र सफेत नि पाण्ढरी !
चल सोनुले, छकुले, घरीं  वात्सल्य गे दाटे उरीं,
निर्दोष तो देशील का  पापा छुपा[८] फिरुनी तरी ?
तूं दोन इञ्चें[९] जरी दुरी  फर्लाङ्ग भाससि गे परी,
चल श्यामले, म्हणुनी घरीं  बसुं खेटुनी जवळी तरी !
घे माडगें, घे गाडगें,  घे गुलचमन् घे वाडगें,
ताम्बूल घे, आम्बीलें[१०] घे,  घे भाकरी, घे खापरी !
किति थाम्बुं मी? म्हण 'होय' ना,  खचली उमेद बरें उरीं,
झिडकारुनी मजला परी  मत्प्रीतिचा न 'खिमा' करी !

---

६. पॅटिस, कटलेट, ऑम्लेट, सागुती, खिमा, बिऱ्यानी हे 'अभक्ष्य' भक्षणविशेष आहेत. अरेरे, आजकालच्या तरुणांना हेंही सांगावें लागतें ना ! सदर जिन्नस माफक दरानें पुणेंलष्कर येथील दोराबजींच्या दुकानांत मिळूं शकतात. (ही 'दोराबजी'ची जाहिरात नव्हे !) ७. परकर नेसलेली. ८. चोरटा. जसें छुपा कॅमेरा, छुपा नगारा इत्यादि, ९. सदरहू शब्द इंग्रजी असले तरी रोजच्या वापरांतले आहेत. व्यवहारांत मैल, इंच, फर्लांग म्हणावयाचें आणि कवितेंत मात्र अंगुलें, क्रोश, योजनें इत्यादि शब्द वापरावयाचे ! काय हा कृत्रिमपणा ! व्यावहारिक गद्य व काल्पनिक पद्य यांमधील हा सोवळेपणाचा अंतरपट काढून त्यांचा एकजीव करणें हाच काव्याचा उद्देश असून वर आम्ही नि, अन्, व इत्यादि शब्द एवढ्याचसाठीं प्रयोजिलेले आहेत. १०. माशांचें कालवण.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 0840

# प्रेमाचा गुलकंद

बागेंतुनि वा बाजारांतुनि कुठुनि तरी ' त्या 'नें
गुलाबपुष्पें आणुनि द्यावित ' तिज 'ला नियमानें !

कशास सांगूं प्रेम तयाचें तिजवरतीं होतें ?
तुम्हीच उकला बिंग यांतलें काय असावें तें !

गुलाब कसले ? प्रेमपत्रिका लाल गुलाबी त्या
लाल अक्षरें जणुं लिहिलेल्या पाठपोट नुसत्या !

प्रेमदेवता प्रसन्न होई या नैवेद्यानें !
प्रेमाचे हे मार्ग गुलाबी जाणिति नवतरणे !

कधीं न त्याचा ती अवमानी फुलता नजराणा !
परि न सोडला तिनें आपुला कधिंही मुग्धपणा !

या मौनांतच त्यास वाटलें अर्थ असे खोल !
तोहि कशाला प्रगट करी मग मनांतले बोल ?

अशा तऱ्हेनें मास लोटले पुरेपूर सात,
खंड न पडला कधीं तयाच्या नाजुक रतिबांत !

अखेर थकला ! ढळली त्याची प्रेमतपश्चर्या,
रंग दिसेना खुलावयाचा तिची शांत चर्या !

धडा मनाचा करुनि शेवटीं म्हणे तिला " देवी !–"
( दुजीं आणखी विशेषणें तो गोंडस तिज लावी; )

" बांधित आलों पूजा मी तुज आजवरी रोज !
तरि न उमगशी अजुनि कसें तूं भक्ताचें काज ?

गेंद गुलाबी मुसमुसणारे तुला अर्पिलेले
सांग तरी सुंदरी, फुकट का ते सगळे गेले ? "

तोंच ओरडुनि त्यास म्हणे ती, " आळ वृथा हा " कीं !
" एकही न पाकळी दवडली तुम्हीं दिल्यापैकीं ! "

असें बोलुनी त्याच पावलीं आंत जाय रमणी
क्षणांत घेउनि ये बाहेरी कसलीशी बरणी !

केशवकुमार

म्हणे, " पहा मीं यांत टाकले ते तुमचे गेंद,
आणि बनविला तुमच्यासाठीं इतुका गुलकंद !

कशास डोळे असे फिरवितां ? कां आली भोंड ?
बोट यांतलें जरा चाखुनी गोड करा तोंड ! "

क्षणक दिसलें तारांगण त्या-परी शांत झाला !
तसाच बरणी आणि घेउनी खांद्यावरि आला ! !

" प्रेमापायीं भरला " बोले, " भुर्दंड न थोडा !
प्रेमलाभ नच ! गुलकंद तरी कशास हा दवडा ? "

याच औषधावरी पुढें तो कसा तरी जगला !
हृदय थांबुनी कधींच ना तरि तो असता 'खपला' !

तोंड आंबलें असेल ज्यांचें प्रेमनिराशेनें
'प्रेमाचा गुलकंद' तयांनीं चाटुनि हा बघणें !

## फत्तर आणि फुलें

होता डोंगरपायथ्यास पडला धोंडा भला थोरला;
वर्षें कैकहि लोटलीं तरि न तो हाले मुळीं आपुला !
आनंदी फुलवेल एक जवळी होती सुखें राहत;
बाळें सांजसकाळ हांसत तिचीं तेथेंच कोमेजत !

थट्टेखोर फुलें हंसूनि वदलीं धोंड्यास तीं एकदां,
" धोंडा केवळ तूं ! अरे, न जगतीं कांहीं तुझा फायदा !"
संतापून तयांस फत्तर म्हणे, " कां हीं वृथा बोलणीं ?
सारी सुंदरता इथेंच तुमची जाईल रे वाळुनी !"

धोंड्याच्या परि काळजास भिडले ते शब्द जाऊनियां;
काळा ठिक्कर यामुळें हळुहळू तो लागला व्हावया·
पुष्पांच्या कवळ्या मनांतहि सले तें फत्तराचें वच;
गेली तोंडकळा सुकून, पडलीं तीं पांढरीं फारच !

कोणी त्या स्थळिं शिल्पकार मग तो ये हिंडतां हिंडतां,
त्याच्या स्फूर्तिस फत्तरांत दिसली कांहीं तरी दिव्यता;

त्याची दिव्यकलाकरांगुलि न जों त्या फत्तरा लागली,
श्रीसौंदर्यमनोरमा प्रगटुनी साक्षात् उभी राहिली !

वेडा पीर असाच गुंगत कुणी एकाकि ये त्या स्थळा,
ती मूर्ती बघतांच तो तर खुळा नाचावया लागला !
त्यानें तीं खुडुनी फुलें भरभरा पायीं तिच्या वाहिलीं,
तों त्यांची फुलुनी कळी खदखदां सारीं हसूं लागलीं !

* * *

लावण्याकृति ती वनांत अजुनी आहे उभी हांसत
पुष्पेंही बसलींत तीं बिलगुनी पायीं तिच्या खेळत !

## एक काव्यप्रकार

[ एका सरकारी कचेरीचा एक भाग. धोंडो व गुंडो नामक दोघे कारकून शेजारीं शेजारीं बसलेले असून त्यांच्यासमोर कागदांचा व फायलींचा भयंकर ढीग पडलेला आहे. काम करून करून कारकून-द्वय अगदीं मेटाकुटीला आलेलें आहे. ]

धोंडो—( जांभई देत )

काम केव्हां सरे !

गुंडो—( निःश्वास सोडून )

—हाय ! केव्हां तें सरेल ?
वाटतें, कंबर आतांच मोडेल !
काय रे देवा, ही आमुची स्थिती ?
बरें आहे, चालूं द्या ! ना तरी मिळेल
येथून गचांडी ! छे, तें नको रे बाबा !

( अंगावर कांटा आल्यासारखें करतो. इतक्यांत शिपायी आणखी दोन फायली आणून ठेवतो. )

धोंडो—( स्फुंदत )

अंतच न देवा ! कां रे या फायलीलागून ?
काम केव्हां सरे ?

गुंडो—( निःश्वास सोडून )

—हाय ! केव्हां तें सरेल ?

धोंडो—( धीर करून )
  बरें तर गुंडो, काढा एक विडी—
गुंडो—( घाबरून )
  छेः, छेः, नको रे राजसा असें तूं करूं !
धोंडो—( निश्चयानें )
  कांहींही म्हटलें तुम्ही जरी आतां
  शिलगावतोंच—
    ( विडी पेटवतो तोंच आंतून साहेब येतो व धोंडोला विडी ओढतांना पाहून त्याच्या पाठींत गुद्दा मारतो. धोंडो पळून जातो. )
धोंडो—( पळतां पळतां )
  होऊं नये तें झालें !—
गुंडो—( स्वगत हसून )
  व्हावें तेंच झालें !—
  एकटाच विडी ओढतो लेकाचा !

[ वरील वाङ्मयप्रकाराला मुक्तछंदी काव्य म्हणतात. मेहेरबानी करून हें काव्य वाचतांना वाचकांनीं मूर्च्छित पडूं नये ]

## अ ज्ञा त वा सी [ दिनकर गंगाधर केळकर ]

( १८९६–     )

### पुणें दरबारीं

शत्रुच्या खड्या समशेरी
वांकती पुणें दरबारीं
पेशवे मऱ्हाटी स्वारी
तळपती तिखट तल्वारी.

    तो वाघ, वाघ म्हैसुरी
    कांपतो उरीं
    टिपू चौधारी
तळपती तिखट तल्वारी.

चौवडा यशाचा झडे
उचलती विडे
थाट सरदारी
तळपती तिखट तल्वारी.

इंग्रजी बावटा धीट
पहा, थरथरत
ऐकतां भेरी
तळपती तिखट तल्वारी.

रणरंग पुण्यांतिल दंग
बांधुनी चंग
घेति ललकारी
तळपती तिखट तल्वारी.

वांकती थोर सरदार
दिल्लिचे वीर
पुणें दरबारीं
तळपती तिखट तल्वारी.

फुरफुरे लाख भिमथडी
सलामी खडी
झडतसे फेरी
तळपती तिखट तल्वारी

केवढी पुण्याची भिती
पहा, कांपती
चळचळा वैरी
तळपती तिखट तल्वारी.

# स दा शि व   अ नं त   शु क्ल

(१९०२–     )

## प्रेमाचा प्रभाव

[ वृत्त  शार्दूलविक्रीडित ]

मानी तापट वृत्तिचा बहु असें मी स्वावलंबी पुरा
ध्येयामागुन धांवलों त्यजुनियां आप्तेष्ट देशांतरा
आपत्ती किति साहिल्या, करपलें काळीज दुःखानलीं
कोणी नाहिं सहानुभूति लवही तेव्हां मला दाविली
दैन्याच्या वणव्यांत होरपळलों त्याची न चित्ता क्षिती
त्वत्प्रेमामृत लाभलें मज, नवी जादूच मीनाक्षि ! ती

आतां आज परी नवे सुदिन हे दैवें मला दाविले
भाग्यश्री उजळेच पूर्वसुकृतें जें वांछिलें तें मिळे
संसारीं सुखसाधनें पसरलीं माझ्या सभोतीं जरी
आनंदी न हताश खिन्न मन   संन्यासवृत्ती वरी
नित्याचा क्रम चालला मम अतां जीवन्मृतासारखा!
याला कारण एक ! होत तुझिया प्रेमास मी पारखा

स्वर्गीय द्युतिनें स्मशान फुलतें प्रीती मिळाली तर,
स्वर्गाचेंहि बने स्मशान अवघें प्रीती निमाली तर.

# गुणवंत हणमंत देशपांडे

(१८९७-    )

## उबग

विटला ग रंग तुझ्या
भरजरी पैठणीचा
चमचमेना बिलोरी-
लाल तुझ्या मोरणीचा !

डोईवरल्या बिंदीचे
निखळले मोतीदाणे
सैल बाजुबंद झाले
उबग कां ऐसा बाणे ?

किटला ग साज सारा
मेंदी उडाली नखांची
मुखीं तांबुल रंगेना
कळा बेरंग ओठांची !

चोळी मिरादाणी तुझी
उसवली जागोजाग
कुणी लावियेली बाई,
जीवनाला तुझ्या आग ?

कवणा ग परायाची
पडे तुजवरी दृष्ट ?
अतां देहश्रृंगाराचे
वृथा गमती का कष्ट ?

झुरसी ग मोरावाणी
मनांतल्या मनांत तूं
हृदयींच्या हृदयांत
काय धरियेला हेतू ?

स्थिरावला अंतरांत
    कोण अलोकींचा राया
उपेक्षिली जयासाठीं
    तुवां सालंकृत काया ?

## सुखद संभ्रम

कोणता मानूं चंद्रमा–भूवरीचा कीं नभींचा ?

    बघुनी सखिमुख वाटे हृदयीं
    चंद्र कशाला भूवरि येई ?
    बघतां गगनीं चंद्र तिथेंही
वरितें मानस सुखद संभ्रमा    मानूं चंद्रमा

    गगनीं रजनी भुवनीं रजनी
    दिसतो चंद्रहि दोन्हि ठिकाणीं
    एकावरि ये कलंक दिसुनी
दावि दुजा निजनयन-नीलिमा    मानूं चंद्रमा

    एक फुलवितो कमलविशेषा
    दुजा फुलवि मम मानसकोषा
    एक करितसे कीं तमनाशा
नाशी दुसरा मम-विरह-तमा    मानूं चंद्रमा

    अमृत वर्षी एक स्वकरें
    दुसरा पसरी पीयुष अधरें
    एक अंबरीं प्रेमें विहरे
अंतःपुरीं दुजा वितरी प्रेमा    मानूं चंद्रमा

    संधिकाल जंव चुंबी एका
    चढते लाली त्वरित तन्मुखा
    दुज्यास अधरीं अधर जुळवितां
खुले कपोलीं प्रणय-रक्तिमा    मानूं चंद्रमा

नभ-मुकुरीं कीं सखि पाहतसे
बिंब मुखाचें तिथें पडतसे
जननयनां तें चद्र गमतसे
पसरि तेंच का भुवनीं सुषमा          मानूं चंद्रमा

चंद्र कोणता वदन कोणतें
शशांकमुख कीं मुखशशांक तें
निवडतील निवडोत जाणते
मानी परि मन सुखद संभ्रमा          मानूं चंद्रमा

## श्रीनिवास रामचंद्र बोबडे

(१८८९–१९३४)

### लावणी

पिवळी कवळी कळि चाफ्याची राजस अवयव वय चवदा
उघड्या बाजारांत बैसली नगदानगदीचा सवदा
" या या सजना ! या मनमोहना ! साजुक नाजुक मी नार
जाहिर दुनियेला आमंत्रण जाहिर मीनाबाजार
मोकळेंच हें दार, मोकळा महाल, मंचक, दरबार,
मोकळ्याच गुजगोष्टि, मोकळ्या देहाचा पाहुणचार
हिंडत धुंडित राधाराणिस याहो वृंदावनवासी
रास रचूनी बसलें याहो रासविहारी ! क्रीडेसी
अधरसुधेची पाणपोइ ही, या आलिंगनकुंजांत
येइं तृषित पांथस्था ! येथें करितें स्वागत थाटांत
येइं सरळ मजल्यावर मजले चढुनि वेल सोपानाचा
वसंतवैभव खुललें वरती फुलला झेला पुष्पांचा
ऐन्याच्या चांदण्या जडविल्या इथें बादली छतातळीं
याहो मेघश्यामा ! सजली मी चंचल चपला-पुतळी ! "
मयनिर्मित ही मायानगरीची मोहक मैनाराणी
वरखालीं हृदयास नाचवी अद्‌भुत जादूचें पाणी

नयनांचें कांटेरी कुंपण कुरळया केसांचें जाळें
मांडुनि बसली त्यांत गुंतवित भटकत फिरलेले डोळे
दिवसभरी मानेला मुरके, दिवसभरी डोळेमोड
दिवसभरी पानांच्या पट्ट्या, दिवसभरी स्वप्नें गोड
मध्यरात्रिला भेटी-गोष्टी थाटमाट हसणें रुसणें
रात्रीं क्षणभर फुरसत नाहीं, दिवसामागुनि दिवस सुने
दिसेल त्याचें स्वागत करुनी होते त्याच्यास्तव वेडी
सेल त्याच्या गळयांत पडुनी करिते काया कुरवंडी
पहिल्या भेटिस 'प्रेमाविण्हला' 'लागे मूर्तीचें ध्यान'
जो जो भेटल त्याला म्हणुनी करिते अर्पण पंचप्राण
'तुम्हि माझे सरदार राजसा! मी या चरणांची दासी!'
असो शिपायी, असोच प्यादा, क्षणांत वृंदावनवासी
गुण नसतां गुणगंभिर व्हावें रूप नसूनी रूपमणी
या माडीवर पैसे देउनि नसत्या सर्वस्वास धनी

हा येथें विक्रीस ठेविला तनुलतिकेचा बहर नवा
ईश्वरनिर्मित भांडवलावर नफा घेतला अवासवा
'आज नगद कल उधार' येथें 'माल चोख पैसा रोख'
'असल माल' 'दिलपसंत' सारा घे चिल्लर वा घे ठोक
सायंकाळापासुनि वाढे रोज दुकानांतिल गर्दी
क्षणोक्षणीं नवनवें गिऱ्हाइक आली वर्दीवर वर्दी
जगभर शाखा, खुल्या कराचा अंतर्-राष्ट्रिय व्यापार
पाजी तरुणांच्या तांड्यावर दुकानदारांचा भार

भावावाचुनि लोभहि लटका, हृदयाविण लटकें प्रेम
लोभावाचुनि लटके अश्रू, प्रेमाविण लटका काम

उघड्या मैदानांत मांडली सार्वजनिक ही पिकदाणी
आठ चार आण्यांत थुंकुनी सर्वस्वाची धुळधाणी

# अनिल [आत्माराम रावजी देशपांडे]

(१९०१-     )

## प्रेमाचें ममत्व

तिच्या मार्गीं तुम्ही कुसुमशत नेवोनि पसरा
कुठेंही त्यांमाजीं मम सुमन द्या फेंकुनि जरा
तयां पुष्पां साऱ्या त्यजिल, असलीं सुंदर जरी
सखी माझें साधें सुमनचि त्वरें घेइल करीं

तिला काव्यें तुम्ही अगणित लिहा, नेउनि वहा
तया काव्यांची ती कधिं न हृदयीं दाविल स्पृहा
परंतू माझें मी जरि रचिन निःशब्द कवन
तरी शब्दांमध्यें करिल नित ती तेंच पठन

तुम्ही सारे यत्ना तिजप्रत करा जा रमविण्या
विनोदें, कौशल्यें, कितिकहि झटा जा हसविण्या
परी माझ्या चर्येवरि न दिसलें तें स्मित जरी
प्रमोदा सोडोनी तरि त्वरित खिन्नत्वाचि धरी

तुम्ही घेवोनी जा, तिज रुचिर सौंदर्य बघण्या
निसर्गाचें कोठें, उपवनिं, तडागीं विहरण्या
मला तुम्ही न्याया जरि तिजसवें कीं विसरलां
उदासीना वृत्ती करिल, गणुनी तुच्छ सकलां

तिला द्या नेवोनी अखिल दुनियादौलत तुम्ही
हिऱ्यांचे, मोत्यांचे निचय उघडा जाउनि तुम्ही
तयांमध्यें टाका मम फुटकिही शिंपचि कुणी
धनातें सोडोनी, उचलिल सखी तीप्रति झणीं

तुम्ही दृष्टी ठेवा अविरत तिच्या नेत्रिं खिळली
म्हणा त्रासें, आम्हांवरि नच कधिं दृष्टि वळली;
परी जेव्हां जेव्हां नयन वळती हे तिजकडे
तिचें माझ्या नेत्रां क्षणभर तरी मीलन घडे

तुम्ही सारे मोठे किति जरि गुणें युक्त असलां
तुम्ही सारे रूपें जरि मदनमूर्तीच असलां
कृपादृष्टी तुम्हावरि जरि किती लक्ष्मि करिते
अभावीं सर्वांच्या मज मम सखी प्रेम वरिते

## पेर्तेव्हा

व्याकुळ पृथ्वी
प्रखर उन्हांत होरपळतां
जळतांना जागोजाग वणव्यांत
नव्हती एकहि हुंदका देत
दिसूं देत अश्रू नयनांमधें
दाबीत होती आंतल्या आंत
दुःखांचे कढ
करुनी आपल्या जिवाचें पाणी
पुरवीत होती खोल मुळांना
फुटत होती तरुलतांवर
नवी पालवी
फुलोर, बहर, फुलाफळांचा
गाऊं लागले बुल्बुल आणि
कोकिळहि घेऊं लागले ताना
उन्मत्त प्रीतीच्या, विरहार्ततेच्या
नवोन्मेषाच्या
वसंत...वसंत...!
......तूं मात्र शांत !!

तूं मात्र शांत......
दाटलेल्या कंठीं
आटले होते जणूं तुझे शब्द
वाढत होती तळमळ पण
हृदयामधें
नव्हतें संगीत सळसळत—

व्याकूळ पृथ्वी
प्रखर उन्हांत होरपळत !
……तूं मात्र शांत ! !

वसंत सरे, मोहर गळे
बिलगून फळें फांद्याफांद्यांना
वाढत होतीं, पक्व होत होतीं
कितीक गळून पडत होतीं
वाहतां थोडेसे वादळी वारे
कोकिळाच्या गोड गीतांत आतां
भरलेली होती किती आर्तता—!
वाट पाहात वेळ येण्याची
हृदयांत पण हळहळत
तूं मात्र शांत…… ! !

……तूं मात्र शांत
पृथ्वीचाहि होता ताप वाढत
आसावलेल्या जीवांना भास
मृगजळाचेहि भुलवीत होते
वाऱ्याचा वाढत होता पण जोर
फडफड होत तुझ्या पंखांची
दूरचीं क्षितिजें न्याहाळून तेव्हां
पाहून आलास वादळाच्या खुणा
आतुरपणें
तरीहि नव्हता फुटत शब्द
तूं मात्र शांत……!

घोंघावत होता रात्रभर वारा
दिवसां धुळीचे लोट, वावटळी
उठवीत होता
कडाडत होते जीर्ण वृक्ष आणि
मोडून पडत होत्या कितीतरी
कोवळ्या फांद्या

म. ग्रं. सं. ठाणे
आ. नं. १२८५

आणि संध्याकाळ होण्यापूर्वींच
क्षितिजाच्या कडा आक्रमीत होते
काळे निळे मेघ
आणीत होता ओढून त्यांना
सोसाट्याचा वारा……
तुफान…वादळ…
आदळत ढग ढगावरतीं
व्यापीत आकाश
पृथ्वीच्या जवळ जवळ आले
अंधार भरे……
क्षणभर होई सारें निस्तब्ध !
आणि ओठावर आले तुझे शब्द !!

चकाकली वीज
गंभीर घुमली घनगर्जना
निनादले तिचे साद पडसाद
सुरू झाली वृष्टी
मृगाचा पाऊस बरसूं लोग
थरारे सृष्टी !

कडाडूं लागल्या विजावर विजा
सरीवर सरी वर्षत गर्जत
वादळांत आणि कल्लोळांत त्या
आसरा निवारा सोडून देत
उडालास तूं भराऱ्या घेत
बेफामपणें
मेघामध्यें वर
परत खालतीं माळरानावर
पुन्हां वर खालीं नव्या भूमीवर
नांगरलेल्या
आणि विजांच्या लखलखाटांत
मेघांच्या गंभीर गडगडाटांत
फुटे तुला शब्द—

" भिऊ भिऊ भिऊ
नका भिऊ भिऊ
उठा रे उठा रे सत्वर सत्वर
तत्पर तत्पर
पेरा पेरा पेरा
नव बीजें पेरा
नव्या आशा धरा
पेर् ते व्हा ! पेर् ते व्हा ! ! "

वादळ ओसरे तरीहि स्फुरे
तेंच आर्त गीत !
माळरानावर
नांगरलेल्या नव्या भूमीवर
विरव्या घालीत भराऱ्या घेत
ओतीत जासी तूं कळकळीच्या
भावपूर्ण स्वरें
तेच शब्द आणि त्याच लकेरी
त्याच गीताच्या
पेर् ते व्हा ! पेर्तेव्हा ! !

## मानवता

अन्याय घडो कोठेंही
चिडून उठूं आम्ही
घाव पडो कोठेंही
तडफडूं आम्ही
हाल पाहून हळहळूं
होवोत कोठेंही
पिळवणूक पाडील पीळ आम्हां
असो कोणाचीही
वजन आमच्या छातीवर
पायांतल्या बेड्यांचें दासांच्या

वळ पाठीवर आमच्या
चाबूक उडो कोठेंही
अवघ्या अभाग्यांचे अश्रू
उभे आमच्या डोळयांत
दुःखितांच्या वेदनांच्या
कळा उरांत आमच्याही
संवेदना साऱ्या जगाची
हृदयांत आहे भरभरून
नातें नवीन असें कांहीं
जोडून आहोंत आम्ही
मानव तेही मानव आम्ही !

## वाट

मला आवडते वाट वळणाची
दाट झाडींची नागमोडीची
ही अलिकडची नदिच्या थडिची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
सरघसरणिची पायफसणीची
लवणावरची पानबसणीची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
अशि भुलवणिची हुलकावणिची
सागवेळूच्या भर रानींची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
जरा अडचणिची चढउतरणिची
घाटमाथ्याची ती पलिकडची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
इथची तिथची कधिं कुणिकडची
क्षितिजाकडची पुढची पुढची
मला आवडते वाट वळणाची

## पावसाळा

बाई या पावसानं
लाविली झीम झीम
भिजलीं हीं माळरानं
उदासलं मन
बाई या पावसानं

दिनभर देई ठाणं
रात्रिस वरसून
सकाळिंचं लोपविलं
कोवळं ऊन छान
बाई या पावसानं

फुलली ही जाईजुई
बहरून वाया जाई
पारिजातकाची बाई
कशी केली दैन
मातींत पखरण

थबथबलेलीं पानं
ठिबकती वरतून
पांखरांचे भिजवून
टाकिले पंख छान
बाई या पावसानं

नदीनाले एक झाले
पूर भरूनीया चाले

जिवलग कोठें बाई
पडे अडकून
नच पडे चैन

बाई या पावसानं
लाविली झीम झीम

## प्रीति तुझी माझी

प्रीति तुझी माझी हीं
प्रीति तुझी माझी न
अवतार्ली भंवतार्ली
जागतें जीवन !

प्रीति तुझी माझी
प्रीति रम्य फुलबाग
खुलवीत खुलतात
किती महाभाग

प्रीती तुझी माझी
जरी रम्य फुलबाग
जगतीं जीवन आणि
जगतांत जाग !

प्रीति तुझी माझी
प्रीति निराळीच दुनिया
निराळे म्हणोत कोणी
निराळे बनुनिया

प्रीति तुझी माझी
नाहीं निराळेपणाची
जगांतल्या सुखदुःखीं
मिळालेपणाची ! !

# रघुनाथ दत्तात्रय सरंजामे

(१८९५–    )

## झिम्मा

झिम्मा खेळूं ये झिम्मा नाचूं ये
आकाशींच्या तारेसंगें   झिम्मा खेळूं ये.

अंधारी ही रात्र काळी
कोणी पाहीना मुळींही
एकटीच अंतराळीं   झिम्मा खेळूं ये.

सप्तऋषींमध्यें सती
बैसलीसे अरुंधती
लाडक्या या आजीसंगें   झिम्मा खेळूं ये.

चांदण्यांत चंद्रज्योती
हिमगिरी चकाकती
हांसऱ्या या ज्योतीसंगें   झिम्मा खेळूं ये.

चवथीची चंद्रकोर
हळू चाले सुकुमार
लाजऱ्या या पोरीसंगें   झिम्मा खेळूं ये.

काळ्या मेघामागें जाऊं
वीज नाचे पैज लावूं
नाचऱ्या या पोरीसंगें   झिम्मा खेळूं ये.

दक्षिणेचा झंझावात
रानफुलें उफाळत
झंझावातीं दोघें रंगूं   झिम्मा खेळूं ये.

# वा म न   ना रा य ण   दे श पां डे

( १९०३-   )

## नंदनवन मुकल्यावर !

[ छंद लवंगलता ]

[ स्वर्ग व पृथ्वी यांजमधील रस्ता. चहूंकडे घोर अंधार पसरला आहे. नंदनवनांतून हांकून दिलेलें ॲडम व ईव्ह हें पहिलें मानवदांपत्य त्या रस्त्यावरून पृथ्वीवर चाललें आहे. नंदनवनांत रात्र नसल्यामुळें पूर्वी कधींहि त्यांच्या अवलोकनांत अंधार आला नव्हता. यामुळें त्याच्या त्या विराट् प्रथम दर्शनानें तीं उभयतः अतिशय भयविव्हल झालीं आहेत ! ]

ईव्ह—( थकलेंसें करून )
**तम केव्हां सरे ?**

ॲडम—( निःश्वास सोडून )
**—हाय ! केव्हां तें सरेल ?**
**धडधडे ऊर, वाटे, आतांच फुटेल !**
**झांक मुख केशीं, मीही झांकीं एका हातें :**
( ईव्ह घनदाट मोकळ्या केसांनीं व ॲडम उजव्या हातानें तोंड झांकतो. )
**—तमोभय हो कमती मिटतां नेत्रांतें !**
**राहूं दे हा दुजा कर कटीस गुंफून—**
( ॲडम डाव्या हाताचा ईव्हच्या कमरेभोंवतीं विळखा घालतो. )

ईव्ह—( स्फुंदत )
**अंतच न देवा ! का रे तिमिरालागून ?**

× × ×

ईव्ह—( थरथरत )
**तम केव्हां सरे ?**

ॲडम—( निःश्वास सोडून )
**—हाय केव्हां तें सरेल ?**

सेवियेलें नेणूनियां ज्ञानतरुफल
लोटून तूं देशी विभो ! नंदनामधून !
—तिमिरांत गवसलों !–वाटही नवीन !

ईव्ह—( थकलेंसें करून )
—शीण तरी किती देहीं चालून चालून !—

ॲडम—( सद्‌गदित कंठानें )
अंतच न देवा ! का रे तिमिरालागून ?

× × ×

ईव्ह—( थरथरत )
तम केव्हां सरे ?

ॲडम—( निःश्वास सोडून )
—हाय ! केव्हां तें सरेल ?
कैचें पुन्हां तेजोमय नंदन दिसेल ?

ईव्ह—( आशाळभूतपणानें )
त्यावाचून सर्वत्र का तम नित्य राही ?
—जातसों ज्या मेदिनीतें असे का तेथेंही ?–

ॲडम—( निराशेनें )
धाडिता का प्रभु तेथ आपणां त्यावीण ?

ईव्ह—( स्फुंदत )
अंतच न देवा ! का रे तिमिरालागून ?

× × ×

ईव्ह—( थरथरत )
तम केव्हां सरे ?

ॲडम—( निःश्वास सोडून )
—हाय ! केव्हां तें सरेल ?

ईव्ह—( कानोसा घेऊन )
दुरून ये कशाची ही कानीं किलबिल
नवेंच हें दयामया ! साकडें कसलें ?

ॲडम—( उसनें अवसान आणून )
पाहूं का मी उघडून नयन आपुले ?

ईव्ह–( अधीरतेनें )
—छे, छे, नको राजसा ! रे जाशील भिऊन !—

ॲडॅम—( सद्गदित कंठानें )

**अंतच न देवा! का रे तिमिरालागून?**

× × ×

ईव्ह—( थरथरत )

**तम केव्हां सरे?**

ॲडॅम—( निःश्वास सोडून )

**—हाय! केव्हां तें सरेल?**

ईव्ह—( जास्तच भिऊन )

**किलबिल ये जवळ!...काय हें असेल?...**

ॲडॅम—(कष्टानें धीर धरून )

**बघतोंच—**

( पहातो तों सकाळ झालेली दिसते. हर्षातिरेकानें तो ईव्हला घट्ट आलिंगन देतो!)

**अहा! फुटे तेज! खग गाती!...**

**मही का ही?...तमच न येथ!...**

ईव्ह—( डोळे उघडून आनंदानें )

**—सेर अंतीं!**

( पण हा आनंदाचा झटका लगेच ओसरून ती खिन्न होते! )

**परी त्याची स्मृती सख्या! राहिल मनांत**

**तेजाहूनही अधिक!—**

ॲडॅम—

( ईव्हच्या भाषणानें नुकत्याच पाहिलेल्या अंधाराची दुःखद आठवण जागृत होऊन ॲडॅमहि तिच्या-सारखा पुन्हां खिन्न होतो. )

**तीच मम गत!**

## विरामक (*Epilogue*)

तेजांतील ईश्वराचा अंश—

( ॲडॅम व ईव्ह यांची तिमिरच जास्त आठविण्याची प्रवृत्ति पाहून पृथ्वीवर प्रगट झालेल्या दिवसाच्या तेजांतील ईश्वराचा अंश सखेदाश्चर्यानें स्वगत बोलतो.)

होऊं नये तें जाहलें !-

तिमिरांतील सॅटनचा अंश —

( तेज प्रगट झाल्यामुळें पृथ्वीवरून पळून गेलेल्या, पण दिवसाची मुदत सरतांच रात्रीच्या वेळीं पुन्हां आपलें साम्राज्य पृथ्वीवर प्रस्थापित करण्याची संधि साधण्यासाठीं तेजाच्या पाठीशींच अनंत अवकाशामध्यें दडून बसलेल्या तिमिरांतील सॅटनचा अंश तेजांतील ईश्वरी अंशाला ऐकूं न जाईल अशा रीतीनें त्याच्या दर वाक्यागणिक प्रत्युत्तरात्मक असें भाषण करतो. )

व्हावें तेंच झालें-!

तेजांतील ईश्वराचा अंश–

मानवांतें तेज जरी दिसूनियां आलें,
तेजाधिक तमच त्यां आठवे तरीही !

तिमिरांतील सॅटनचा अंश–

-निकेंच हें !-

तेजांतील ईश्वराचा अंश–

—झटेन मी लोपाया वृत्ती ही !

तिमिरांतील सॅटनचा अंश–

मीही न का झटेन ती कराया अक्षय ?

× × ×

—समरभू हो इथून मानव-हृदय !

## वेड ग खपुष्पाचें

[ छंद उद्धव ]

वेड ग खपुष्पाचें
जडलें हें कोठोनी ?
हासती मजलागीं
अवघ्या शेजारिणी !

वेड ग खपुष्पाचें
धुंडिलें येथें-तेथें :
लोगे ना खपुष्पाचा
कोठेंही माग मातें !

वेड ग खपुष्पाचें
सुजाण शेजारिणी
कागदी फुलांनेंही
तयांची हो शिराणी !

वेड ग खपुष्पाचें
खुळीला मला त्यांची
लाभे ही सुजाणता
जन्मांत तरी कैची ?

वेड ग खपुष्पाचें
जीवानें माझ्या बाई !
एकच खपुष्पाची
घेतली घोकणी ही

वेड ग खपुष्पाचें
अघ्रात त्याचा वास
नतसे स्वप्नमयी
भूमीस मन्मनास !

वेड ग खपुष्पाचें
धुंडिलें येथें-तेथं
लागावा खपुष्पाचा
कोठोनी माग मातें ?

# आनंद [विनायक लक्ष्मण बरवे]

( १८९६–१९४८ )

## मजुरांची सांज

" दिसाभऱ्याचा थकून आलों, चुलीपशीं धावलों
चुलीपशीं धावलों, सयेच्या संवुर ग्या बैसलों
हताळितां भाकरी सयेच्या मुखांत चंद्रम डुले
चुलवैलाची आगिनलाली निबार गालीं खुले

दिवा वराचा-सईच माझी-उजेड माझ्यावरी !
उजेड माझ्यावर, तेलाचा टिपूस नाहीं जरी
मलाच झाकी सदा सयेच्या पिरतीची कांवळ
पण सयेला धडूत घ्याया मला न पैकावळ !

ऱ्हाल्या दिसाची सईच ये लवलवून केळीपरी
लवून केळीपरी !-तिमाही सरून जाइल पुरी ! !
हलाखिच्या या दिसांत राखूं कशी तिघांची निगा
भयाण ही काळजी करी कणखर जिवाचा भुगा

जनम देशी कशास देवा, इथें कुणा बालका
इथें कुणा बालका, जरी ना मुठींत माझ्या रुका !
भणंग पोटीं नकोत बाळें ! महाग झाली भुई
भकावलेल्या मशीं नकोशी व्हईल माझी सई ! !

अंघोळिच्या पाण्यानं न येई जरा मुळीं त्या उब
जरा मुळीं त्या उब, मुखांतिल सुकून गेली जिभ
जशीच राही तशी गड्याच्या पुढ्यांतली भाकरी
उरांत खोवी दुकाळ चालू निळया तिख्याची सुरी

दुकाळ गांवावरी भरोनी नगर पिके जर नवें
सुखून जात्या रुखावरीच्या फळा कसें पाहवे
जळोत शहरें, जळोत राज्यें, जळो तिजोरीघरें
खपून वर्सावरीस जेथें जरी न शेती तरे !

# चकवा

जळ भरारी दोथडींत माझ्या होडिचें मोल कोण करी !

दर्यांत सांज लोपली
पांढरी पांखरावली
घनदाटिकडे चालली
पाण्यांत शेंग तापली
चण् चुणुक करूं लागली

घे थरारी भरतींत पागळें फेकियलें दुर्वेरी.

सप् सपा वाजतें पाणी
का नाव गातसे गाणीं ?
तालख्याल मंजुळवाणी
पाणियांत अमुची रहाणी
त्या छंदावर वल्हवणी

बिल्लोरी सरसरा जाहली ठाम भरतिची स्वारी.

भर-चांद मूस वरचिशी
उलथली खालिं चद्रदिशीं
चौफेर तवंगत कशी
लाट देत कलथी हुशी
पंखापरि हलते जशी !

भिंगोरी भर्‌धांव चालली पुळण भाटियावरी.

मचव्यांत शीड फडफडे
दोरखंड जरा कडकडे
माडांत वाय गडबडे
डोलतात डोंगरकडे
लुकलुके बत्ति चहुंकडे

कंगोरी पाडिते सागरीं मैलभरी जरतारी

जाळ्याचा बंद खेचिला
कां ओढा जड लागला ?
वा ! सगिन् माल गवसला

आजचा रोज पिकाविला
मागुता फिरुन् चालला
ललकारी घरधनिण् उभ्यानी देत किनाऱ्यावरी !

## निशिगंध [ रामचंद्र श्रीपाद जोग ]

( १९०३–        )

### पहिलें प्रेम

कितीक दिन गेले होते—
होतों वाट पहात;
गांठ तुझी माझी पडली
जेव्हां एकांतांत.
केला मग निश्चय पुरता
बोलायाचें आतां—
आला क्षण आजवरी मीं
केलें तप ज्याकरितां.
' मी तुजवर—', ' तुजवर माझें—'
येई वच इतकेंच;
त्यापुढचा कांहीं केल्या
शब्द न येइ मुळींच.

काय मला बोलायाचें
होतें तुज कळलेंच;
नसते का भाषा पहिल्या
प्रेमाची असलीच.

*  *  *

रक्त तुझें झालें वदन,
होती खालीं मान;
पदराशीं खेळत होत्या
हस्तांगुलिही दोन.

होतें तंव जिकडे तिकडे
क्षणभर अगदीं शांत;
हृदयाचे ठोके माझ्या
मजला ऐकूं येत.
कांहीं तरि वदलीस तदा
ऐकूंहि न मज आलें;
काय म्हणायाचें होतें
तुज, तें परि मज कळलें

कळतें हें तुम्हांआम्हां
शब्दांवाचूनीच
कोण रुसे शब्दांसाठीं ?
पहिलें प्रेम असेंच.

* * *

तीं अर्धीं अर्धीं वाक्यें—
शब्दहि अर्धोच्चरित—
भीत भीत बाहिर येई
तें अर्धें निःश्वसित—
अर्धें स्मित, अर्धें हसणें,
अर्धोन्मीलित अक्ष—
मृदु असुनी हृदयीं शिरती
ऐसे अर्ध कटाक्ष—
अर्धें वर अर्धें खालीं
केलेलें मुखकमल—
कुण्या सहृदयाचें सखये !
कसें न हृदय हरील ?

मना हवें वाटे अजुनी
हें सारें अर्धेंच—
कारण कीं गोडी पहिल्या
प्रेमाची तसलीच.

## नागोराव घनःश्याम देशपांडे

(१९०९-    )

### ती कळी आणि ती साखळी

फुलून हासतांच, मी तुला दिली नवी कळी;
खुडून एकएक, तूं झुगारलीस पाकळी.
कितीतरी जपून मी दुवा दुवाच जोडला;
करून घाव तूं मधें दुभंगलीस सांखळी.

सुरंग कोवळी कळी : कशी जुळेल ती पुन्हां ?
जुळेल एकदां, तरी कशी फुलेल, सांग ना ?
दुवा दुभंगलास तो कसा अभंग मी करूं ?
पुन्हां अखंड सांखळी कशी जुळेल, साजणा ?

विशीर्ण, जीर्ण पाकळ्या तशाच वेचते पिशी;
दुभंग सांखळी, तरी जपून ठेवते अशी;
कळी, तशीच सांखळी विलोकते पुन्हां पुन्हां;
पुसून ऊन आंसवें विसावते कशीबशी !

### जाणीव

सांध्य रसानें रंगत रंगत
वाहत होता कोमल वारा;
अवकाशाचें अंतर उजळत
उमटत होता एकच तारा.

तूं आणिक मी बसून तेथें
बोलत होतों सहजच कांहीं :
सहजच सारें वाटत नव्हतें
त्या दिवशीं पण तुला, मलाही

उमजत नव्हतें हें कीं तें वा :
ती तर, सजणे, होती प्रीती !

होती प्रीती, परंतु तव्हां
जाणिव नव्हती, जाणिव नव्हती.

दैवगतीनें वाहत वाहत
अनेक वर्षांनंतर, सजणी,
असेच आलों बघ अनपेक्षित
आपण दोघें एक ठिकाणीं !

पुन्हां तूं नि मी बसलों येथें;
बोललीस तूं, मी पण कांहीं :
सहजच वाटत नाहीं पण तें
आज खरोखर मला, तुलाही.

अजाण होतों मागें आपण :
नव्हती जाणिव; होती प्रीती.
उरला आहे आज, सखे, पण—
जाणिव नुसती, जाणिव नुसती !

## नदीकिनारीं

नदीकिनारीं नदीकिनारीं नदीकिनारीं ग ऽ !
नदीकिनारीं ग !
अवतीं भंवतीं नव्हतें कोणी;
नाचत होत्या राजस वाणी—
निळया जळावर सोनसळीच्या नवथर लहरी ग ऽ !

जरा निळया अन् जरा काजळी
ढगांत होती सांज पांगली :
ढवळी ढवळी वर बगळ्याची संथ भरारी ग ऽ !

दुसरें तिसरें नव्हतें कोणी;
तुझेच हसले डोळे दोन्ही :
अवखळ बिजली भरली माझ्या उरांत सारी ग ऽ !

सळसळली ग ऽ हिरवी साडी :
तिनेंच केली तुझी चहाडी :
फडफडल्या पदराच्या पिवळ्या लाल किनारी ग ऽ !

वहात होते पिसाट वारे :
तशांत मी उडविले फवारे :
खुलून दिसली तुझ्या उराची नवी थरारी ग ऽ !

कुजबुजलीं भंवतालीं रानें;
रात्र म्हणाली चंचळ गाणें :
' गुढगाभर पाण्यांत दिवाणे दोन फरारी ग ऽ !'

नदीकिनारीं नदीकिनारीं नदीकिनारीं ग ऽ !
नदीकिनारीं ग ऽ !'

# वामन भार्गव पाठक

(१९०५— )

## ओढणी

[ अभंग ]

साध्या शब्दांसंगें कविता रांगते
तीस का लागते यातायात ?
साध्या आठवणी खळखळा पाणी
आणिती नयनीं नाहीं काय ?
साधेसुधे धागे कोळी नित्य विणी
तेव्हां ना शोभूनी येतें जाळें ?
साध्या शब्दें तैसा प्रभू आळवितो
परी तो द्रवतो तयानेंच.

×

नको म्हणतांही फूल दृष्टी पडे
हुंगावेसें वाटे मजलागीं.
नको म्हणतांही वाऱ्याची लहर
येते मदंतर तोषवाया.
नको म्हणतांही हर्ष होई फार
नभीं चंद्रकोर पाहुनियां.

नको म्हणतांही तुझ्या मी गायनीं
जाईन रमुनी केव्हां देवा ?

×

सावरूनी तोल शिशु उभा राहे
माय मागें पाहे कौतुकानें.
बागडाया लागे कोकरूं अजाण
धनी कौतुकून जाय मागें
अल्लड हा तारा फिरे नभीं स्वैर
उभा सुधाकर रक्षाया त्या
नुमजुन देवा गातों तुझें गान
पाठिराखा पण होतोस ना ?

×

वृक्षवल्लरींचे अनेक प्रकार
मिळून सुंदर बन बने
सप्तरंग जेव्हां एकत्र मिळती
तेव्हां ते निर्मिती इंद्रधनू
शून्यामध्यें ग्रह गोल सामावितां
ये एकरूपता विश्वाची त्या
साऱ्या वृत्ती होतां एक तुझ्याठायीं
अल्प भास होई तुझा देवा.

# वि ष्णु भि का जी को ल ते

(१९०५–      )

## गालबोट

माझ्या छकुलीचे डोळे
दुध्या कवडीचे डाव
बाई ! कमळ कमळ
गोड चिडीचं ग नांव !

जरि बोलते ही मैना
माझी अजून बोबडें
मला लागति ते बाई
खडीसाखरेचे खडे !

सर्व्या जगाचं कौतुक
इच्या झांकल्या मुठींत
ठेवुं ही साळुंकी
माझ्या डोळ्याच्या पिंजऱ्यांत !

कसं हासले ग खुद्‌कन्
माझ्या बाइचे हे ओठ
नजर होईल कोणाची
लावुं द्या ग गालबोट !

## पेरणीसाठीं

कराया पेरूनी तुम्हि चाला व ! समद्या जनी

भाजीभाकर लौकर रांधा
मोहन, ठेसा त्यावर कांदा
पालवामंधीं चट्‌कन् बांधा
न्याहारि घेऊनी तुम्हि चाला व ! समद्या जनी

ना. ना. हूड

आभायांतुन मोत्यावानी
मिर्गाचं ग ! पड्लं पानी
म्हने वापुया सोबद काहाडुनी
करा पेरऽनी तुम्हि चाला व ! समद्या जनी

पऱ्हाटिचं बीं घे तूं पार !
तूं घे जोंधे, तूं धर गोऱ्हे
चाडं, मोघं–ऱ्हा ग म्होरे
घेउनूश्यानी तुम्हि चाला व ! समद्या जनी

काहुन अशि ही करता वट्वट
पाय आपलं उचला चट्पट
चला भुर्र वावरांत झट्पट
पांखरावानी तुम्हि चाला ! समद्या जनी

उशिर न अक्षी लावा कांहीं
अटपा बिगिबिगी करा ग ! घाई
तठीं नाहितर माज्या पायीं
रडल घरधऽनी तुम्हि चाला ! समद्या जनी

# नारायण नागोराव हूड

( १९०३– )

## अकारण

[ मुक्तच्छंद ]

१.

चालला होता उत्सव भारी कोठें
अहमहमिका वाहावयाची फुलें होती लागली
देव्हाऱ्यांतील दगडाच्या माथीं तेथें !
टपोर फुलांची, आणिक पत्रीची, झाली पखरण
येई कुणी व्यक्ति, भक्तिभावनेनें उचलूनी पुष्प एक
मुकाट वांकून, केला नमस्कार भाग्यवानास;
आणि अकारण, मिळविलें पुष्प, पुष्प-ढिगाऱ्यास !!

.२.

दुज्या बाजूस कोणी फेंकित अभाग्यावरती धोंडे
कासावीस होई प्राण त्या फुलाचा, कोणी नच देती लक्ष
दगडाची झाली डोईवर त्याच्या रास !
एक व्यक्ति आली, तिनेंही घेतला करामाजीं धोंडा
दावून मनाचा अति तिरस्कार
आणि अकारण हाणला त्यावर कठिण फत्तर
दगडराशीस एक मिळविला आणखी दगड !!

# केशव नारायण काळे

(१९०४– )

## दोन फुलें

शोभीवंत फूलपात्रीं ठेवियलीं फुलें दोन
कुणी रचनाकुशलें आणिला जीं निवडून,
परिचय-उपचार अशालागीं कशा व्हावा ?
पटे निःशब्द ओळख समदुःखी-सुखी जीवां

दूरदेशीं दूरावले जीव जोडीसाठीं वेडे,
क्षणमात्र सहवासें भावबंध दृढ जडे;
मरणाच्या दारीं झाल्या अनोळखी गांठीभेटी—
धीर देती ऐकामेकां बोलुनियां गुजगोष्टी.

" सहवासीं विकासाचें भाग्य भाळीं नाहीं आलें;
एका जागीं कोमेजूं हें सुख काय कमी झालें ?
सहजाला सजवावें सुंदराला शोभा द्यावी—
तुझ्या माझ्या जीवनाची हीच पूर्तता असावी ! "

## या येथें पुलिनावरी

[ शार्दूलविक्रीडित ]

या येथें पुलिनावरी शिशुपणीं क्रीडारसें कौतुकें,
होतों घेत मुठी भरून सिकताराशींतलीं माणिकें;
हातांतूनि परी हळू न कळतां रत्नावली ओघळे,
लाखाची मग बंद मूठ उघडी होतां रिती आढळे !

केलें संसृतिसैकतीं प्रथम जें प्रेमें पदारोपण,
तेव्हां 'सुंदर, सत्य, आणि शिव' या ध्येयें भरे जीवन,
काव्य-प्रेम-कला सदा विहरती सावेश संभाषणीं—
सारें चिंतन आणि वर्तन घडे स्वप्नांत त्या रंगुनी.

प्रत्यक्षावसरीं परी प्रतिपदीं येई प्रचीती नवी
टाकी सुंदर रंग जी उडवुनी उत्साहही मालवी !
ध्येयें कल्पित जल्पना उमजलें विश्वासही ओसरे
एकाकी, भ्रमशून्य, शून्य हृदयावाचून कांहीं नुरे !

हें सारें समजूनिही फिरुनियां ध्येयांत जे गुंगती
ते या जीवनसंगरांतिल तुझे माझे सखेसोबती !

# अ नं त  का णे क र

( १९०५–    )

## चांदरातीं खाडीच्या किनाऱ्यावर

निळया नभावर गिरिराजींची काळिभोर आकृती,
उमटली चांदण्यांत मोडती.
कांठच्या नारळी ज्योत्स्नेंतुनि रंगती;
नस्तांत झपूर्झा ऊर्मी या खेळती;
कांठास शुभ्र शुभ फेनहार अर्पिती !
नौका काळया 'डबक डुबुक' या जळावरी डोलती;
मर्मरत ऊर्मि तयां चुंबिती !

वाळवंटिं पसरल्या वाळुच्या लहरी लहरी किती!
हिऱ्यासम कण मधुनी चमकती!
युगयुगें घेउनी लोळण पायावरी,
गिरिकडे कशाची सागर विनती करी?
गंभीर न बघतो वळुनि मुळीं हा गिरी!
दुःख गिळुनियां अंतरिं सिंधू फेंसाळे परि वरी,
हासतो निराश जणुं वरिवरी!

चराचरावरि शुभ्र रुपेरी मोहन हें पसरलं,
मोहनें जीवभाव भारले;
अस्मान वर्षतें शीत धवलता अशी;
नसनसांत थरके लहर थंड गोडशी;
कुणि जवळ बसावें बिलगुनिया छातिशीं!
चांदरातिच्या कोंदणांत दिक्काल विसरुनी असें,
पडावें स्पर्शसुखीं धुंदसें!

दिव्य कुणी यक्षिणी येउनी सौंदर्यक्षण असा,
अक्षयीं ठसविल का गोडसा!
चांदणें असेंच्या असें फुलुन राहिल,
गिरिपदीं स्थिरावुन राहिल सिंधूजल,
वृक्षावर माझ्या मान तिची निश्चल!
भावि युगें विस्मयें पाहतिल कोरिव लेणें असें,
म्हणतिल, 'झालें, तरि हें कसें?'

## 'प्रीतिची हूल फुकट ना तरी!'

'तूं माझी अन् तुझा मीच,' ही खातर ना जोंवरी,
प्रीतिची हूल फुकट ना तरी!

गालाला पडते खळी मला पाहुनी,
ही नजर पाहते धरणी न्याहाळुनी!
भयभीत प्रीत थरकते लीन लोचनीं,

ओंठाची थरथरत पाकळी,–बाल गडे, झडकरी !
प्रीतिची हूल फुकट ना तरी !

जिवाजिवाची अभंग जडली जोड असे ही जरी,
भीति मग कोणाची अंतरीं ?

ही गांठ भिडेची तांत गळया लाविल;
हिरव्याचीं पिवळीं पानें हीं होतिल !
प्रीतिच्या फुलाचा वास उडुन जाइल;
फसाल पुरत्या, बसाल गाळित घळघळ अश्रू-झरी !
प्रीतिची हूल फुकट ना तरी !

## सावल्यांचें गाणें

तेजाचीं आम्हीं बाळ,
रूप जरी अमुचें काळें !
लहान वा कोणी मोठीं
ससेमिरा अमुचा पाठीं !
वनीं स्मशानीं कुठें तरी
अशीं तरळतों पिशांपरी

×

मेघांच्या काळ्या पंक्ती
निळया नभीं जेव्हां फिरती,
राक्षसरूपांना धरुनी
सिंधूच्या पृष्ठावरुनी
मंद मंद आम्हीं फिरतों;
निळया जळा काळें करितों !

×

पीतारुण संध्या बघुनी
वंदन दीर्घ करूं पडुनी !
मग येई रजनीमाई
पदराखालीं अम्हां घेई

.२.

दुज्या बाजूस कोणी फेंकित अभाग्यावरती धोंडे
कासावीस होई प्राण त्या फुलाचा, कोणी नच देती लक्ष
दगडाची झाली डोईवर त्याच्या रास !
एक व्यक्ति आली, तिनेंही घेतला करामाजीं धोंडा
दावून मनाचा अति तिरस्कार
आणि अकारण हाणला त्यावर कठिण फत्तर
दगडराशीस एक मिळविला आणखी दगड !!

# केशव नारायण काळे

(१९०४– )

## दोन फुलें

शोभीवंत फूलपात्रीं ठेवियलीं फुलें दोन
कुणी रचनाकुशलें आणिला जीं निवडून,
परिचय-उपचार अशालागीं कशा व्हावा ?
पटे निःशब्द ओळख समदुःखी-सुखी जीवां

दूरदेशीं दूरावले जीव जोडीसाठीं वेडे,
क्षणमात्र सहवासें भावबंध दृढ जडे;
मरणाच्या दारीं झाल्या अनोळखी गांठीभेटी—
धीर देती ऐकामेकां बोलुनियां गुजगोष्टी.

“ सहवासीं विकासाचें भाग्य भाळीं नाहीं आलें;
एका जागीं कोमेजूं हें सुख काय कमी झालें ?
सहजाला सजवावें सुंदराला शोभा द्यावी—
तुझ्या माझ्या जीवनाची हीच पूर्तता असावी ! ”

## या येथें पुलिनावरी

[ शार्दूलविक्रीडित ]

या येथें पुलिनावरी शिशुपणीं क्रीडारसें कौतुकें,
 होतों घेत मुठी भरून सिकताराशींतलीं माणिकें;
हातांतूनि परी हळू न कळतां रत्नावली ओघळे,
 लाखाची मग बंद मूठ उघडी होतां रिती आढळे !

केलें संसृतिसैकतीं प्रथम जें प्रेमें पदारोपण,
 तेव्हां ' सुंदर, सत्य, आणि शिव ' या ध्येयें भरे जीवन,
काव्य-प्रेम-कला सदा विहरती सावेश संभाषणीं—
 सारें चिंतन आणि वर्तन घडे स्वप्नांत त्या रंगुनी.

प्रत्यक्षावसरीं परी प्रतिपदीं येई प्रचीती नवी
 टाकी सुंदर रंग जी उडवुनी उत्साहही मालवी !
ध्येयें कल्पित जल्पना उमजलें विश्वासही ओसरे
 एकाकी, भ्रमशून्य, शून्य हृदयावाचून कांहीं नुरे !

हें सारें समजूनिही फिरुनियां ध्येयांत जे गुंगती
ते या जीवनसंगरांतिल तुझे माझे सखेसोबती !

# अ नं त  का णे क र

( १९०५–     )

## चांदरातीं खाडीच्या किनाऱ्यावर

निळ्या नभावर गिरिराजींची काळिभोर आकृती,
 उमटली चांदण्यांत मोडती.
 कांठच्या नारळी ज्योत्स्नेंतुनि रंगती;
 नस्तांत झपूर्झा ऊर्मी या खेळती;
 कांठास शुभ्र शुभ फेनहार अर्पिती !
नौका काळ्या ' डबक डुबुक ' या जळावरी डोलती;
 मर्मरत ऊर्मि तयां चुंबिती !

वाळवंटिं पसरल्या वाळुच्या लहरी लहरी किती !
हिऱ्यासम कण मधुनी चमकती !
युगयुगें घेउनी लोळण पायावरी,
गिरिकडे कशाची सागर विनती करी ?
गंभीर न बघतो वळुनि मुळीं हा गिरी !
दुःख गिळुनियां अंतरिं सिंधू फेंसाळे परि वरी,
हासतो निराश जणुं वरिवरी !

चराचरावरि शुभ्र रुपेरी मोहन हें पसरलें,
मोहनें जीवभाव भारले;
अस्मान वर्षतें शीत धवलता अशी;
नसनसांत थरके लहर थंड गोडशी;
कुणि जवळ बसावें बिलगुनिया छातिशीं !
चांदरातिच्या कोंदणांत दिक्काल विसरुनी असें,
पडावें स्पर्शसुखीं धुंदसें !

दिव्य कुणी यक्षिणी येउनी सौंदर्यक्षण असा,
अक्षयीं ठसविल का गोडसा !
चांदणें असेंच्या असें फुलुन राहिल,
गिरिपदीं स्थिरावुन राहिल सिंधूजल,
वृक्षावर माझ्या मान तिची निश्चल !
भावि युगें विस्मयें पाहतिल कोरिव लेणें असें,
म्हणतिल, 'झालें, तरि हें कसें ?'

## 'प्रीतिची हूल फुकट ना तरी !'

'तूं माझी अन् तुझा मीच,' ही खातर ना जोंवरी,
प्रीतिची हूल फुकट ना तरी !

गालाला पडते खळी मला पाहुनी,
ही नजर पाहते धरणी न्याहाळुनी !
भयभीत प्रीत थरकते लीन लोचनीं,

ओंठाची थरथरत पाकळी,-बाल गडे, झडकरी !
प्रीतिची हूल फुकट ना तरी !

जिवाजिवाची अभंग जडली जोड असे ही जरी,
भीति मग कोणाची अंतरीं ?

ही गांठ भिडेची तांत गळया लाविल;
हिरव्याचीं पिवळीं पानें हीं होतिल !
प्रीतिच्या फुलाचा वास उडुन जाइल;
फसाल पुरत्या, बसाल गाळित घळघळ अश्रू-झरी !
प्रीतिची हूल फुकट ना तरी !

## सावल्यांचें गाणें

तेजाचीं आम्हीं बाळ,
रूप जरी अमुचें काळें !
लहान वा कोणी मोठीं
ससेमिरा अमुचा पाठीं !
वनीं स्मशानीं कुठें तरी
अशीं तरळतों पिशांपरी

×

मेघांच्या काळया पंक्ती
निळया नभीं जेव्हां फिरती,
राक्षसरूपांना धरुनी
सिंधूच्या पृष्ठावरुनी
मंद मंद आम्हीं फिरतों;
निळया जळा काळें करितों !

×

पीतारुण संध्या बघुनी
वंदन दीर्घ करूं पडुनी !
मग येई रजनीमाई
पदराखालिं अम्हां घेई

चांदण्यांत अमुची माया
भुताटकी गमते हृदया.
पांढुरक्या तेजांतून
कुठें कुठें बसतों दडुन.
पांढुरक्या वाटेवरुनी
एकलेच फिरती कोणी
लपत छपत पाठुनि त्यांच्या
फिरत असूं आम्ही वेड्या !

×

पानांचें पसरुनि जाल
आणिक पारंब्या लोल,
वट कोणी ध्यानस्थ बसे;
मंद अनिल त्या डुलवितसे.
मग अमुचीं रूपें डुलती;
बाळांना बागुल दिसती !

×

जुनाट हे पडके वाडे,
पर्णहीन त्यांतिल झाडें
धवल चंद्रिका रंगविते;
आम्हीं मग त्यांतील भुतें !
जर का कुणि चुकुनी आला
वाटसरू रात्रींमधला,
बघुन निकट अमुचे चाळे
चरकुनि तो मार्गच वळे !

×

प्रेमस्थल अमुचें एक;
त्यासाठीं विसरुनि भूक,
दाहि दिशा मागुनि फिरणें
जीवाभावानें जपणें !
ही अमुची वेडी प्रीत
झिडकारा-मारा लाथ !

## दोन देवभक्त

होतीं चार धुरांडिं ओकत ढगें काळया धुराचीं जिथें,
संपाग्नी भडकून ना चिलिमही सोडी धुरातें तिथें !
तेव्हां मालकही मनीं गिरणिचा झाला बहू रंजित;
सारें एकवटून चित्त मग तो देवा बसे प्रार्थित.

"केली दोन कलाक रोज बसुनी पूजा तुझी भक्तिनें
वस्त्रें घालुनि मखमली, किति तुला मीं घातले दागिने !
होतां वृद्ध मदीय राख तिजला देतों जरी टाकुनी,
नाहीं का तव मंदिरें दिधलिं मीं नांवें तिच्या बांधुनी ?

होत्या चार स्वयंगती परि अतां मी ठेविल्या दोन ना !
माझे हाल कसे तुझ्या बघवती देवा, खुल्या लोचना ?
आतां कांहिं तरी असें कर जयें मालास या भाव ये
टक्के आठ करूनि काट मजुरी, बांधीन रुग्णालयें."

× × ×

होता त्याच क्षणीं कुणी मजुरही देवाकडे पाहत
डोळे लाल करूनि, मूठ वळुनी मूर्तीस त्या सांगत.
"तेथें त्या बघ गोधडींत पडलें अन्नाविणें कुंथत,
माझें बाळ तयास ना मिळतसे रे, खावयाला शित !

वाहोनी तुजला फुलें फुकटचा पैसा हरूं गांठचा;
गाड्या दोन मजेंत तो उडवितो आहे धनी आमुचा !
आकाशांतिल पोलिसा ! छळिसि कां दीनांस आम्हां बरें ?
देतों टाकुनि मूर्ति ही गिरणिच्या काळया धुरांड्यांत रे !"

## चालली मिरवणुक

चालली मिरवणुक गीतांची माझिया;
कुणि निळीं दूफुलें नेसलिं, कुणि मोतिया.
नादांचे नूपुर घालुनियां नाचती;
रंगीत भरजरी रूपकांत मिरवती !
पाहुनी झोंक हा कुतुक नयनिं थाटतें;
परि कुठें कांहिंतरि चुकलेंसें वाटतें !

मनिं विचार येई सत्य पहाव तरा,
वस्त्रें नि नूपुरें काढुनि करूं खातरी.
हीं विवस्त्र उघडीं फिरतिल रस्त्यांतुन,
पाहतील सगळे रसिक चकित होउन!
कल्पना आगळी वाटतसे सोज्वळ,
गाणेंपण परि का गाण्यांचें राहिल?

# भवानीशंकर श्रीधर पंडित

(१९०५-    )

## सुप्त ज्वालामुखीस

सुप्त ज्वालामुखे!
जनमनीं भ्रांति कीं
झोंपसी तूं सुखीं!
तुज न पण
स्वस्थपण!
दुःख उरीं धगधगे!

तें न जावो उतूं
म्हणुनि गिळितोस तूं
वारिंवरी
कितितरी
कढ तयाचे मुके!

कोंडमारा स्वतां
करुन घेसी वृथा!
धुमससी
मानसीं!
दाबसी हुंदके!

आंतल्या आंत कां
विव्हळसी सारखा?

भडक रे !
धडक रे !
उडव अंगारकें !

काढ लळलळ जिभा,
चाट चटचट नभा,
सर्वभर
गच्च भर
धूमधूसर धुंक !

दाहकें गंधकें,
अग्निमय स्फोटकें
फेंक वर !
ओक, चल,
तप्त लाव्हा मुखें !

श्रांत जन केंवि मग—
धांवती धूम बघ !
चेत, चल !
रे ! उचल
रक्त ध्वज कौतुकें !

## युगान्त

पिवळ्या पाना ! पड, पड, पड.
पिकल्यावरतीं,
सुकल्यावरतीं—
कशास जगण्याची धडपड ?

पिवळ्या पाना ! पड, पड, पड.
कशास फडफड
कशास तडफड ?
कशास वाऱ्यावर बडबड ?

पिवळ्या पाना ! पड, पड, पड.
रंग फिकटला !

झरा आटला !
शिरा अखडल्या ! कांहिं न धड !

पिवळ्या पाना ! पड, पड, पड.
पहिली वहिली—
बहार गेली !
अखेरली आतां पडझड !

पिवळ्या पाना ! पड, पड, पड.
खालीं नवथर
फुटले अंकुर
होतिल आतां ते वरचढ !

पिवळ्या पाना ! पड, पड, पड.
कां भेदरसी ?
कां हादरसी ?
चल ये, भूच्या कुशींत दड !

# गोपीनाथ [गोपीनाथ गणेश तळवलकर]

(१९०७– )

## रानपांखरा

[ जाति सूर्यकांत ]

रानपांखरा, रोज सकाळीं येसी माझ्या घरा
गाणें गाउन मला उठविसी मित्र जिवाचा खरा.
शरीर निळसर, शोभे झालर ठिपक्यांची त्यावरी
सतेज डोळे चमचम करती जणुं रत्नें गोजिरीं
पाय चिमुकले, पंख चिमुकले, देह तुझा सानुला,
अफाट आभाळांतुन कैसें उडतां येतें तुला ?
रात्र संपतां डोंगर चढुनी वर येतो भास्कर
तूंही त्याच्या संगें येसी गात गात सुस्वर.
वाट चालुनी संध्याकाळीं रवि सोडी अंबरा

आणि तूंहि मग पंख उभारुन जासी अपुल्या घरा.
सूर्यासंगें जासी येसी सदाकदा कां बरें
शेजारीं आहेत काय रे परस्परांचीं घरें ?
देह एवढा, अपाय कोणी करील तुजला इथ,
म्हणून का तुज रवीबरोबर माय तुझी धाडिते ?
सांगतोस का तिला कसा हा छानदार बंगला ?
होते का रे कधीं आठवण माझी सखया तुला ?
तुझ्यासारखें जावें वाटे उडत मजेनें वरी
नेशिल का मज तुझ्या बिऱ्हाडीं बसवुनि पंखावरि ?
माय तुझी येईल, सूर्यही भेटेल; भेटायला—
मजाच होइल सख्या पांखरा, नेईं एकदां मला.

## कणिका

### दोन वृत्ति

तरुवरुनी पडलें पिकलेलें फळ खालीं
तों रमे शोधनीं शास्त्रज्ञाची मति
परि सहृदय कोणी वदे व्यथित होउनी
"येईल काय हें फळ फिरूनी डकवि ?
तुटलेली प्रीती येइल का सांधतां ?

### सागराचा रत्नशोध

काढिलीं चतुर्दश रत्नें जलधींतुनी
खवळला सारखा तो तेव्हांपासुनी
शोधाया त्यांतें पुनःपुनः ये वरी
ये परत किनारा सोडुन तूं प्रियतम !
नेईल कदाचित् तुलाच तो संभ्रमें !

### बलाकमाला

ही बलाकमाला उडते गगनांतुनी
जणुं फुलति खपुष्पें मूर्तरूप होउनी
कीं प्रणयभग्न कुणिं जीवें वैतागुनी
स्मृति उदासवाणी करिल दाह सारखा
म्हणुनि या फाडिल्या जुन्या प्रेमपत्रिका !

# ग णे श ह री पा टी ल

( १९०६–  )

## पाटिल

[ जाति केशवकरणी ]

अबलख वारूवरी बैसुनी येतो हा पाटिल
शिरीं भरजरी खुले मंदिल
मंदीलाची कड जरतारी किंचित् मानेवर–
झुकुनी खुलते वरचेवर

गंधटिळा भाळावर, झुलती कानांमधिं चौकडे
मिशांच गालांवर आंकडे
लाल झांक डोळ्यांत जराशी, हुकमी तोऱ्यावर
बोलतो काढुन करडा स्वर

रमत रमत वेशींत गांवच्या शिरतो मग पाटिल
मंडळी चपापती तेथिल
' जी जी ' करिती मुजरे, हुजरे सदरे जणुं, वेस्कर
खालतीं लववुनि अपुलें शिर

खबरबात गांवची विचारुन चावडींत पाटिल
हळू मग टाकितसे पाउल
हुकुम घ्यावया खडे जाहले रामोशी, वेस्कर
पुढें करि कुळकरणी दप्तर

चित्र जुनें गांवच्या धन्याचें दिसल डोळ्यांपुढें
आज परि काय दृष्टिला पडे ?
या अमदानींत उरले असती नांवाचे पाटिल
स्वतांची त्यां जाणिव कोठिल ?

पिढ्यापिढ्यांतिल बदल असे हा, दोष नसे त्यांकडे
हीच दुरवस्था चोहींकडे

सरकारी अधिकारी यांची मर्जी संभाळुन
कसेतरी घालविती ते दिन !

“ काळाचा हा ओघ ओळखा, व्हा पाटिल शाहणे
नका करुं हीन आपुलें जिणें
व्हा साक्षर, अधिकारक्षम मग तेच तुम्ही व्हाल कीं
नवी दाखवाल पाटीलकी

मीहि याच वंशांतिल, होते वाडवडिल पाटिल
म्हणुन या जीवाची तळमळ.

## पांखरांची शाळा

[ छंद ओवी ]

पांखरांची शाळा भरे पिंपळावरतीं
चिमण्यांचीं पोरें भारी गोंगाट करती
उतरतें ऊन, जाते टळुनी दुपार
पारावर जसा यांचा भरतो बाजार !
बाराखड्या काय आई घोकती अंगणीं ?
उजळणी म्हणती का जमूनी रंगणीं ?
तारेवर झोके घेती बसूनी रांगेंत
भुर्रकन इथें तिथें उडती मौजेंत !
खेळकर मुलें, नको कराया अभ्यास
परीक्षेंत का न आई व्हायचीं नापास ?
लक्ष यांचें पांगलेलें पेरूच्या बागेंत
मास्तरच यांना हवे आमुचे रागीट !
पावसाळ्यांतही शाळा आमुची न गळे
गळकी ग शाळा यांची भिजती सगळे
रविवारीं सणवारीं आमुच्यासारखी
यांना नाहीं सुटी, भली मोडली खोड कीं !
यांच्याहून आम्ही आई शहाणे, नव्हे का ?
गप्प शाळेमधीं, कधीं धरितों न हेका

होतों पास आम्ही, देती दिपोटी बक्षिस
मौज काय सांगूं ! मिळे सुट्टीही शाळेस !

## तिथें

[ जाति मंजरी ]

फुलतात वल्लरी रानजाइच्या तिथें
दरवळे गंध त्यामुळें भान हरपतें
चहुबाजुं टेकड्या, खालतिं पाझरे-
सानुली झरी, तिथ चिंवचिंवती पांखरें

वाऱ्यावर डुलती सोनावळिचीं फुलें
वाजविती तरवड-बाळें निज खुळखुळे
चिमुकली झेंडुची बहीण मखमल डुले
गोकर्ण आपुलीं झुलवि निळीं कुंडलें

कांटेरी वेड्या रुक्ष तिथें बाभळी
ज्यांवरीं घरकुलें न्हाव्यांचीं लटकलीं
करडांसह तेथें बागडती शेरड्या
कलकलाट करती झाडांवर भोरड्या

पिकलेलें मोठें कंवठ खालतीं पडे
आवाज ' धप्प ' मग घुमतो चोंहीकडे
पांखरें गाति, किरकिरति रानचे किडे
तेथला असा एकान्त मला आवडे

आसपास बेटें निवडुंगाचीं तिथें
वायपात भोंतीं समशेरी रोखिते
शेजारुन गेल्या अरुंद पांधींतुनी
रहदारी चाले बाजाराच्या दिनीं

झाडींत तेथल्या शिरल्यावर वाटतें
राहतों जादुच्या अद्भुत बेटामधें
मज बाळपणीं जी मौज तिथें वाटली
तीच ती आजही अनुभवितों त्या स्थळीं

मी काल पाहिला हिरवा जेथें मळा
पाहिला बांधिला आज तिथें बंगला
ओसाड जाहलीं खेडीं मी पाहिलीं
उत्कर्ष पावलीं शहरें मीं पाहिलीं

मी कितीक स्थित्यंतरें जगीं पाहिलीं
तीच ती स्थिती नांदते मात्र त्या स्थळीं
अधिकांश याहुनी असतिल रम्य स्थळें
स्वाभाविक परि मज आकर्षण तेथलें.

# ग जा न न ल क्ष्म ण ठो क ळ

( १९०९– )

## जात्यावरलं गाणं

[ ओवी ]

झुंजूमंजू झालं, सुकदेव वर आला
पहाटचं वारं कसं झोंबतं अंगाला

परसांत माझ्या आरवतंय कोंबडं
लई वक्त झाला, आतां फुटंल तांबडं

केंधुळ वढत्ये बाई जातं घरघर
पारुसं ग काम माझं पळंड घरभर

देवळींत जळे पणती ग मिणमीण
भळभळ गळे पीठ कसं जात्यांतून;

अवंदाचं साल, न्हाई आलं पीकपाणी
दूरदेशीं गेला बाई माझा घरधनी

दूरदेशीं गेला मला एकला टाकून
तिठं न्हाई त्येला जीव लावायाला कोन

राया डोळ्यामंदी तुझ्या मोतीयाचं पाणी
राया तुझा रंग जवसाच्या फुलावाणी

तुझ्या डोईवर अक्षी पागूट कुसंबी
तुझं वठ बाई जशी फुलली दाळिंबी

राया तुझं दात जसं धुतलं तांदूळ
तुझ्यासाठीं मला जनूं भरलया खूळ

तुझ्याबिगर रे ! मला घासही जाई ना
तुझ्याबिगर रे ! मला पाणीही घोटेना

तुला आवडतो हुळा भुजून ठीवला
कसं करूं बाई ? सम्दा वाळून चालला

कवाशिक याल माझ्या कुडींतल्या जीवा ?
कवाशिक याल माझ्या देवाच्या बी देवा ?

## सुनीता

[ जाति मंजिरी ]

घेउनी शुभ्र हा पेळू डाव्या करीं
ही सूत काढिते अपुल्या टकळीवरी,
नेसली खादिची भरडी साडी जरी
दिसतसे तरी पण सुरेख चित्रापरी;
मस्तवाल पोरी ! चाललीस येथुनी
त्या सुतांत माझें मनही गुंडाळुनी !

×

पाहिली गुदस्तां हिला फिकट पांढरी
इतुक्यांत कशी ही बदलुन गेली पुरी !
टवटवित लागली दिसूं केवड्यापरी
जणुं अडूळ लिंबू फुटलें अंगावरी;
हो खरेंच ! झाली अतां आठवण बरी
लागली हळद हिज गेल्या मार्गेसरीं

×

डोळ्यांत या तुझ्या कमळण पाणी भरी
तनु तुझी तियेच्या नाजुक देठांपरी,

हसतेस अशी कीं लाटच पाण्यावरी
लागतो स्पर्श तव ओल्या रेतीपरी;

जलदेवी दिसशी मूर्तिमंत तूं मला
कां दिसति न माझे अधर कोरडे तुला ?

# सोपानदेव चौधरी

( १९०७– )

## देवाच्या दारीं

[ वृत्त दिंडी ]

आज रामाचा जन्मदिवस येई,
मंदिरीं जाया उडत एक घाई,
रामनवमी पातली चैत्रमासीं,
म्हणुनि गेलों प्रभुरामदर्शनासी.

एकतारीचा सूर येइ कानीं,
ताल चिपळ्यांचा रंग देत गानीं,
मुखें गर्जत 'जय रामकृष्ण हारी'
एक चोखा देखिला महाद्वारीं.

गोड तुकयाचे गाउनी अभंग
रामभजनीं जाहला पुरा दंग,
खऱ्या भावाचा विमल भक्तिप्रेमा,
फोडि टाहो, 'जय दाशरथे रामा !'

घालि लोटांगण भजन संपवीलें,
स्वतांभंवतीं मग प्रदक्षिणा चाले,
मजकडे तो फेंकिता दृष्टिक्षेप,
मुदें वदला, "जोहार मायबाप."

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 04800

म्हणे, " दादा तुम्हि फार भाग्यवान
तुम्ही ब्राह्मण, मी असें हीन दीन,
अभाग्याची या विनंती तुम्हाला,
प्रभूकंठीं हा हार एक घाला.

' हार चोख्याचा ' वदा हेच बोल,
पुजारी जरि केरांत टाकतील;
कापुराची ही ज्योत लावुनीयां,
राख हृदयाची वहा रामराया "

फिरुनि गर्जे तो ' रामकृष्ण हारी '
करुण वाणी मम बैसली जिव्हारीं,
हळुच वदलों मी, " तूंच जाइं आंत,
देवभक्ताला काय जातपात ?"

" काय भलतें बोलतां मायबाप ?
कुठें फेडूं हें मूर्तिमंत पाप ?"
वदुनि दीनवचें अश्रु दोन ढाळी,
" असें नाहीं होणार कदाकाळीं !

मंदिराचीं अंगणें झाडण्याचें,
लाभलें हें मज वतन वैभवाचें,
वाडवडिलांचें पुण्य सांठलेलें
कसें फासूं मी आज त्यास काळें ? "

भक्तिभावें स्यां करुनि नमस्कार,
प्रभूकंठीं घातला पुष्पहार
कर्पुराच्याही ज्योति लावुनीयां,
धूर त्यांचा वदतसे रामराया,

" कितिक पापी जन मंदिरांत येती,
लोकलाजेस्तव रामनाम घेती,
तुझ्या भेटीची आस जया भारी
खरा ब्राम्हण तळमळे पहा दारीं."

## सृष्ट-चमत्कार

एका अंधाऱ्या खोलींत
कांहीं साहित्यिक बंधू
जो तो स्वतांला समजे
धरित्रीचा मध्यबिंदू !

आणी सहाजिक होई
त्यांना ऐसा बुद्धिभ्रंश
माझ्यापासूनीच होती
सुरू अक्षांश रेखांश !

जड ऐशा डोक्यावरी
अहंकारांचे डोंगर
ऐसा शीण दुणावतां
होई धरणीला भार

ह्यांच्या वितंडवादानें
भ्रम होई स्थिरांचरां
तेव्हांपासूनीयां पृथ्वी
फिरूं लागे गरागरा

## दा मो द र  अ च्यु त  का रे

(१९०९-    )

### भाताचें रोप

[ जाति बालानंद ]

स्मरते मजला ती पुरती
सतेज चिमणी तव मूर्ति,—
भूमीतळची निज शेज
किती दिसांची तरि नीज—
त्यजुनी, शिर करुनी वरतीं
डोकावसि जेव्हां जगतीं !
तेजोमय जग बघुनि खुळें
नवल किती तव वदनीं खुळें !
कवाड बंद तुझें असुनी
तुला उठविलें तरी कुणी ?
फटींतुनी कर शिरकवुन
जागविती का रवि-पवन ?

×

शेताच्या मेरेवरुनी
आंब्याच्या सावलींतुनी,
रेशमापरी तकाकतां
लवलवीत तनु तव नवती
रोज विकसतांना बघुनी
आशांकुर नव उदित मनीं
गमे भूमिहृर्दिची स्फूर्ति
तव रूपें पावे पूर्ति !

×

लव झुळुकेनें थरथरती
किसलय-कोमल तव पातीं
वरी धरेंतुनि परि सरती

सलील निर्मल सुंदर तीं !
मातीचे थर केविं तरी
दुरी सारिसी मृदुल करीं ?
कोमलतेमधिं तुझ्या कसें
भेदकपण हें लपुनि असे ?

x

अंतर तव नाचे हर्षें
प्रेमळ का वायुस्पर्शें ?
म्हणुनिच वाटे फिरफिरुनी
जाय तनू तव शिरशिरुनी !
सर्वेच कंपनमय गान
गासी हरपुनियां भान !
तव मृदु हृदयाची तार
छेडितात का हळुवार
कोमल अंगुलिनें झुळका
गान निघे मग मंजुळ का ?

x

जोत बांधुनी शेतकरी
कसणी जेव्हां येथ करी
स्वेदबिंदु त्याचे गळले
हृदीं धरेनें ते धरिले !
मोतीं होई स्वातिजल
बघतां जैसें जलधितल,
तदंतरीं का त्यापरि ते
रूपान्तर झाले वरिते ?
मग येती बनुनी दाणे
तव कणसीं गोजिरवाणे ?
पात वेष्टुनी रक्षितसे
मोत्यांना शिंपले जसे !

x

कीं वत्सल ही भूजननी
तुझ्या मिषें कर लांबवुनी

ओती मनुजाच्या पदरीं
भरुनि मुठी निज भांडारीं ?

## संगीत-परिणाति

[ जाति प्रणयप्रभा ]

निःस्तब्ध रहा क्षणिं या, प्रणया !
मानांत बोलुं दे निज हृदयां
पुसट दूर गिरि क्षितिजीं दिसती
तरुतळिं छाया अचल पहुडती
खुले सृष्टिची अस्फुट नवती
चांदण्यांत एकांतामधिं या !
भिडव नयन तव मदीय नयनीं
हृदयज्योतिचें तुझ्या त्यांतुनी
स्निग्ध तेज मम नयनिं बिंबुनी
तें स्तिमित डोलुं दे गुंगुनियां !
कर दे राहूं मम करयुगुलीं
झुळुकांनीं तनुवेल थरकली
पुलकफुलांना क्षणांत फुलले
ही केंवि कुणीं केली किमया ?
जन्म जन्म दुर्मिळ, ये घडि ती
हृदयें अपुलीं द्रुत धडधडती
काय वदाया गुज धडपडती ?
भाषा कळुनी नकळे उभयां !
मान न हें, संगीत-परिणति
हृदय-कलशिं हो स्वरजल-भरती
उसव न आतां उद्गारांप्रति
स्वरकंप नसनसीं अनुभवुं या !

# बाळकृष्ण भगवंत बोरकर

(१९१०–    )

## जपानी रमलाची रात्र

तुझें विजेचें चांदपाखरूं दीपराग गात
रचीत होतें शयनमहालीं निळी चांदरात.
रतिरत कुक्कुटसा कुंडीवर आरोहुनि माड
चोंच खुपसुनी फुलवित होता पंखांचें झाड.
अद्‌भुत पंख्यापरि भिंतीवर आंदोलुनि छाया
लावित होती ताप जगाचा नकळत विसराया.
धूप उसासत होता कोनीं रजताच्या पात्रीं
विचित्र रेशिमचित्रें होतीं रसावलीं गात्रीं.
तुझा ' पियानो ' यक्ष जळांतिल होता निजलेला
मनांत गुंफित स्पर्शसुखाच्या स्वप्नांचा झेला.
अन्‌ ' म्यूसे 'चीं कवनें होतीं माझ्या हातांत
प्रतिचरणाला करीत होती धूम्रवेल साथ.
जळत उसासत होतें त्यांसह अंतरांत कांहीं
होता चिमणा श्वान लोकरी घोटाळत पायीं.
तोंच वाजल्या तुझ्या सपाता सळसळला घोळ
आलिस मिरवित चालीमधुनी नागिणिचा डौल.
करांतुनी तव खिदळत आले स्तनाकार पेले
जळता गंधक पाच उकळती यांहि रंगलेले.
अभीष्ट चिंतुनि आम्हीं त्यांचे भिडवियले कांठ
सुरेहुनी तूं गडे भाजिले ओठांनीं ओठ.
स्पर्शें तुझिया आणि ' पियानो ' थरारला सारा
मजसम त्याच्या कानशिलांच्या झणाणल्या तारा.
गंधर्वांच्या दुहिता जमल्या करित पुष्पवृष्टि
हृदय मदाचें मोहळ झालें जडावली दृष्टि.
पोहुं लागले तुझ्या रेशमी अलकांतिल मासे
हवा जाहली जड पाण्यासम अंगांतिल वासें.

आणि तरंगत डुलूं लागली नौकेपरि शेज.
तों कांतींतुन तुझ्या निथळलें फेनाचें तेज
नखें लाखिया, दांत मोतिया, वैदूर्यी नेत्र
अवयव गमले चपल चिवट कीं मयवनिंचे वेत्र.
कात सोडिल्या नागिणिचें तें नवयौवन होतें
विळख्याविळख्यांतुनि आलापित ज्वालांचीं गीतें.
गरळ तनूंतिल गोठुनि झालें अंतरांत गोड
कळलें का मज जडते देवा नरकाची ओढ.
डोळे बांधुनि खेळत होतें जीवन मायावी
अंधपणांतच वितळत होतें भूत आणि भावी
तुझ्या जपानी भाषा-लिपिसम अगम्य सुंदरता
असुनी हातीं उरली दुर्लभ आली ना हाता.
आजहि तुज शोधितां कधीं ती रमलाची रात
पाठींतुनि जंबिया मधाचा घालि काळजांत!

## बांगड्या

बांगड्या बघा या
श्रावण लावण्यराज लागला फुलाया ध्रु०

जलवलयें, स्वरवलयें
दिनकर-शशिकरवलयें
मिसळुनि घडिल्या प्रणयें
गोड बांगड्या या.

नाजुक या सुंदर अति
मंजुळ रवि रुमझुमती
रत्नांसम चमचमती
भाग्य रंगवाया.

या प्रदोषकांत निळ्या
या बिजल्या सोनसळ्या

लाजविती रुसुनि खुळ्या
आम्रकिसलया या

नवयुवती ! कां भिडस्त ?
भरुनि घ्या त्वरें स्वहस्त
वाजवुनी तरुण मस्त—
चरणिं लोळवाया.

या वासंतिक हिरव्या
आशांसम नित्य नव्या
वधुहृदयापरि हळव्या
प्रेम-ओवया या.

निर्मळ हें हिरवेंपण
पतिगृहिं न्या करिं मिरवुन
सतत करा जपुन जतन
ही सुरम्य माया

क्षितिजासम या जांभुळ
जलदांसम या श्यामल
वत्सल या गंगेंतिल
सांध्य-मेघ-छाया.

या माउलि, अपुल्यास्तव
वर ज्यांचा सुखसंभव
कर ज्यांचा दे गौरव
वैश्वदेव राया.

ये कन्ये, ये दुहिते,
अपरिणिते, ललितलते,
ये कांते, ये माते
सुभग-साज न्याया.

## स्पर्श

फुलल्या लाख कळया
स्पर्शसुगंधा घन अंधारीं फुलल्या ग उकळ्या ध्रु०

ध्वनिकंपित तनुच्या शततंत्री
बंदी मन रतिमोहनमंत्रीं
लय लागुनियां नाचुं लागल्या स्वप्नींच्या पुतळ्या.

धूप जळे तिमिराचा पवनीं
विनिद्रनयना व्याकुळ अवनी
पिकुनी लवल्या नक्षत्रांच्या द्राक्षलता पिवळ्या.

भुई वाळुची संगमरवरी
तीवर काळया फेनिल लहरी
व्यथेंतुनी सुख मंथित ग्रंथित झाल्या मधुर निळया.

सुटल्या अवचित जटिल समस्या
फुटला रव स्मरकुटिल रहस्या
जननांतरिंच्या स्मृतिंच्या ज्योती पाजळल्या सगळ्या.

द्रवलीं नयनें, स्रवलीं हृदयें
दो चंद्रांच्या संगम उदयें
दुणी पौर्णिमा, रसा न सीमा, उसळयांवर उसळया.

## भिडली रात्र पहांटे

माझें सुख मोठें। सुख मोठें।
ठेवुं कळेना कोठें ध्रु०

उरीं उगवला आत्मसुधाकर जनीं चांदणें दाटे.
बाग बहरले जिकडे तिकडे बोथट झाले कांटे.
छायेसम मज गमलें खोटें, सत्यचि तें उफराटें.
रसलंपट मी, तरि मज अवचित गोसावीपण भेटे.
वाट उसळली चिरयात्रेची भिडली रात्र पहांटे.
आटे आतां तृष्णा, वाटे त्रिभुवन मनिं कोंदाटे.

# जलद भरुनि आले

गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले
शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले ८०

दिन लंघुनि जाय गिरी
पद उमटे क्षितिजावरि
पद्मरागवृष्टि होय माड भव्य न्हाले.

धुंद सजल हसित दिशा
तृणपर्णी सज्ज तृषा
तृप्तीचें धन घनांत बघुनि मन निवालें.

उतट बघुनि हरिकरुणा
हरित धरा हो गहना
मंदाकिनिवरुनि धवल विहगवृंद डोले

रजतनील, ताम्रनील
स्थिर पल जल, पल सलील
हिरव्या तटिं नांवाचा कृष्ण मेळ खेळे.

मीन चमकुनी उसळे
जलवलयीं रव मिसळे
नवथर रसरंग गहन करिति नयन ओले.

धूसर हो क्षितिज त्वरित
ढोर पथीं अचल चकित
तृण विसरुनि जवळिल तें खिळवि गगनिं डोळे.

टप, टप, टप पडति थेंब
मनिंवनिंचे विझति डोंब
वत्सल ये वास, भूमि आशीर्वच बोले.

# गो विं द झो क र क र

( १९१२–    )

## श्रांत पथिक

[ भैरवी ]

एकलेंच यायचें; एकलेंच जायचें !
मागुती न पाह्यचें; पुढें पुढेंच जायचें !!

कितीक दूर मार्ग हा,
कधीं न संपणार हा,
कधीं इथें न राह्यचें; पुढें पुढेंच जायचें !

सगे न सोयरे कुणी,
आप्त मित्र ना कुणी,
कुणी कुणा न ओळखे, जगांत सर्व पारखे !

न प्रेम उग्र अग्नि हा,
करील भस्म, जीव हा,
कितीक जीव पोळले, कितीक देह जाळले !

न्याय, नीति, आंधळी,
शक्ति, पांगळी, लुली,
किरीट चोर घालतो, सुळीस साधु चुंबितो !

मनांतलें कधीं जनीं,
कुणी न पाहि ऐकुनी,
एकलें कुढायचें; एकलें रडायचें !

कुणास वाहुं हीं फुलें,
धरूं कुणाचीं पाउलें,
दिसे न देव देउळीं, जळीं स्थळीं न कातळीं !

जगप्रवास हा बुरा,
होय जीव घाबरा,
थकोनि अंग टेकलें, अपाप नेत्र झांकले !

# पंडित सप्रे

## (१९१२—  )

### जग

कितितरी अहा हीं रत्नें वर आकाशीं !
हीं माणिकमोतीं खालीं सिंधुतळाशीं !
अन् मधेंच आम्ही रत्नें पण रत्नें रे !
रे ! माप असे हें कुणास फसवायासी !

×

"हें काय बरें ?" तो पुसतां सांगितलें कीं :
"ही मशीद रे ! जन देति तिला 'जग' संज्ञा !
वर निळा निळा हा घुमट भव्य दिसताहे !
चुकलेले खालीं फकीर आपण सारे !"

×

—पलिकडे कुणीतरि घालुन संगितशाळा
पटवून देइ कीं "जग हें संगित सारें !"
खोटें न, त्यांत किति आढळुनी ये सत्य !
जुळतो न कुणाचा कुणास येथें सूर !

## रा म चं द्र अ नं त का ळे ले

( १९०७—  )

### वणव्यापूर्वी

[ मुक्तच्छंद ]

गेला वसंत
आला तापदायी प्रखर उन्हाळा
लोपली वनश्री
पडलें सुनें सगळें जंगल :
हीं झाडें पहा,
पाण्यावाचून, जीवनावाचून—
निष्पर्ण, निष्प्राण—
वाळून कोळ आहेत झालीं !

कां बरें उभीं हीं
उंच उभारून रिक्त शाखाहस्त ?
करीत आहेत काय याचना देवाच्या दयेची ?
किंवा मृत्यूला ' थांब ' म्हणून आर्जवताहेत ?
दीनपणें कीं दाखवताहेत
आपली अशी दुर्दशा जगाला ?
छे छे–मातीचे हे अस्सल पूत
जगतील कैसे भिक्षापात्र जिणें लाजीरवाणें ?
याचनेला नव्हे—
सहसा कराया प्रहार कडाडा
यांनीं उंचावले हे शाखाबाहू !
नव्हेत नव्हेत हीं मृत काष्ठें
अहो हे अपर महातपस्वी शरभंग जाणा—
ज्यानें आजन्म तपून अग्नी—
शेवटीं त्यांतच दिली आपल्या देहाची आहुती !
शुष्क हे वृक्ष वरून निश्चल;
परंतु त्यांच्या आंत करीतो आहे दांडगाई

अदम्य अग्नी
समुत्सुक जो संघर्षासाठीं

येउं द्या संधी
आणि पहा जादू !
अस्थिपंजरामधून हो याच
प्रकटेल मोठा दावाग्नि सहसा संघर्षजन्मा !
चराचरांची,
लहानथोर
निरुपद्रवी नी भीषण हिंस्र
निष्पाप बापडे तृणाशन अन्—
क्रव्याद्‌ही क्रूर
—सर्वांची समान घेणार अहो तो
एकत्र आहुती !!

## माळरान

[ मुक्तच्छंद ]

खुलें माळरान !
रानटीं खुरटीं माजलीं झुडुपें
भुईच्या पोटास चिकटून कशीं आहेत बसलीं
दरिद्री मातेचीं बापुडवाणीं—
खंडीभर हीं जणूं खिल्लारें !
वीत दोन वीती वाढीचीं अवघीं
टीचभर यांच्या आशाआकांक्षा !
कांहींना इवलीं निर्गंध फुलें
किती त्यांच्या तऱ्हा !
कांहींना लागती निष्फळ फळें—
वेचव, तुरट, कडू वा कांटेरी
कांहींना केवळ कांटे नि कुसळें !
कोणाला माहीत
काय यांचीं नावें ?

असतील यांत महत्त्वाचे गुण
परन्तू तेही कोणाला माहीत ?
आपापल्यापरी असेल त्यांच्यांत सौंदर्यही, पण—
बघतो कोण !
निपजताहेत ! मरताहेत !
कशाला जन्मलीं ?
कशाला जगती ?
काय उपयोग ? कोणाला दाद ?
वाढलीं केवळ वाऱ्यावरती ?
जगती देवाच्या भरंवशावर !
कांहीं तुडविलीं, कांहीं नांगरलीं
कांहीं खसाखस कापून काढलीं
भक्ष्य द्यायला
आणखी पुष्कळ व्यर्थ जन्मती नि व्यर्थ मरती

कुंडीमधल्या फुलझाडांनो
वाटतो का गर्व तुम्हाला आपल्या थोर नशीबाचा ?
समावेना हो तुमचा तोरा नि उन्मादी गंध !
अहो प्रत्यक्ष सौंदर्यलक्ष्मीनें जरी तुम्हांला वरिलें तरी
—तुम्ही परभृत !
भाग्याच्या बळानें झालांत मोठे
परोपरीनें दक्षतेनें तुम्हा जपतो माळी
त्याच्या छत्राखालीं जगतां तुम्ही
आयतें मिळे नि आयतें वाढतां
ऐदी तुमचें निर्जीव जीवन !
तुंग प्रासाद नी विलासोपवन—
यांची करतां दिखाऊ झाकी !
जीवन्मृत तुम्ही !
जगतां तुम्ही—
परी नाहीं तुम्हां कळलें जीवन !

तीं पहा झुडुपें माळावरलीं—
झोडपतो त्यांना वादळवारा

पडतो आहे पावसाचाही निर्दय मारा
कडकडून दंश करी शीत
भाजून काढील प्रखर उन्हाळा
परंतु झुंजत झगडत कशीं आहेत नेटानें जीव धरून
न कळो कोणाला कशासाठीं आहे यांचें जीवन
पण खचित त्यांनाच, त्यांनाच कळलें जीवन !

## उद्धार

[ छंद जीवनलहरी ]

खालतीं खालतीं
खालतीं खालतीं
वहातसे जळ
दलित दुर्बळ

वाट जी सापडे
वळत तिकडे
आडून खालून
वळून वाकून

फत्तर दगड
रुतती रगड
पण धकाधकी
करीत सारखी

चाललें वहात
खोल दुर्गतींत
खालतीं खालतीं
खालतीं खालतीं

एथून तेथून
नेतसे वाहून
ओंगळसोंगळ
घाणवट गाळ

अमंगळ हीन
कंठीत जीवन
चिखलमातींत
धुळींत, रेतींत

ठेंचत, पडत,
वेंगत, रेंगत
ढकढकलत
रखरखडत

कठीण जीवित
रेटीत रेटीत
खालतीं, खालतीं
खालतीं, खालतीं

अवतींभंवतीं
समृद्ध वसती
बाग बहरली
शेतें डंवरलीं

याच्या जीवावर
चालला संसार
याचें हो जीवन
तें जगज्जीवन !

वाढवी जगातें
पण हें वहातें
खालतीं, खालतीं
खालतीं, खालतीं

पावला उदय
मित्र महोदय
त्यानें दिली मग
जाणीवेची आग

दिली हालोहाल
चेतना जहाल

आरक्त ते कर
तापले प्रखर

तीव्र शरापरी
घुसले माझारीं
शिरले जळांत
रुतले तळांत

डिवडिवचलें
अंतर उसळे
जागून उठली
भावना आंतली

अन् अद्‌भुत झालें !
रूप पालटलें,
राहिलें न जळ,
झालें विराट्काय !

कणकण उठे
आकाशाच्या वाटे
चालला वरतीं
वरतीं वरतीं !

नभाचा सकळ
घ्यावया कवळ
उठले वेगानें
धांवले त्वेषानें

व्यापण्या ब्रह्मांड
जाती आडदांड
चालले वरतीं
वरतीं वरतीं

पूर्व अन् अवर
दक्षिण उत्तर
घेतलें वेढून
टाकलें झाकून

परजून मग
विद्युन्मय खड्ग
केला एकवार
गर्जून पुकार
        वरती नादलें
        ब्रह्मांड सगळें
        निर्वीर खालतीं
        कांपली धरती !

## आपली प्रीत

आपली प्रीत
फुलांची, कांट्यांची
आपल्या वाट्याची
हरघडीची, तुझ्या चढीची माझ्या पडीची

तुटीची जुटीची
वट्ट मिठीची

आपली प्रीत
रंगारंगाची इंद्रधनुष्याची
ऊनपावसाची
मोत्यांच्या सरींची, हास्यलकेरींची
अळीमिळीची, हर्षकळीची,
दहिंवराची, गहिंवराची

आपली प्रीत
खऱ्या गोडीची, सारसजोडीची
बिनूतोडीची
व्योमधरतीची, सागरभर्तीची
नाहीं परतीची !

आपली प्रीत
पांखाच्या तडीची

तडफडीची, फडफडीची
उंच भरारीची !
आपली प्रीत
कुणाला वळली ? आपणा कळली !
शब्दांत चुकती, मनांत झुकती
तुझ्यांत फुलती—माझ्यांत उलती
हलती-झुलती
जुळती-जुळती
खळखळती—

अशी गमतीची
आपली प्रीत भलती भलती !

# भालचंद्र रा. लोवलेकर

(१९११-१९४५)

## शुभ्र पांढरीं कापुसबोंडें

शुभ्र पांढरीं कापुसबोंडें आलिं ग आलीं तोडीला
तुझ्यासारखी हंसत माधुरी सखी जिवाच्या जोडीला !

टपोर बोरें जाळीमाजीं घोसयुक्त श्रीमंत बरीं
निळीं, बादळीं, पिंवळीं खुलती रानफुलें तांबुस गहिरीं

पलीकडे मिठ्ठास सळसळे गर्द ओलसर ऊंसमळा
तुझ्या जिवावर मोहनराणी आज पसारा हा सगळा

मोट कुव्यावर चुरुचुरु चाले गडी खपे ग दिवसभरीं
ओलें आलें, पिकलें राणी, केळफुलीं रमती भ्रमरी

ऊर भरभरे नव्या उमेदी स्वप्नभरानें हुंदळती
स्वप्न असें फलदायी करणें खरेंखुरें तुझिया हातीं

शरन्मेघ चुंबुनी उषेला लाख वैभवें आणि नभीं
स्वप्नमेघ चुंबुनी साजणी अमित वैभवें करिसि उभीं

मुकाट येउनि मूर्त तुझी मज रात्रभरी बेचैन करी
आणि पहांटे प्रत्यक्षार्शी गांठ पडे प्रेमळ गहिरी

जंगलींच मी वनराणी तूं प्रेमाची हंगाम घडी
अखंड सौख्यें अमूर्त जगतें आज इथें झालीं उघडीं

## चोरलकांठ

चोरलकांठ,
पाउलवाट
हळुहळु जाइल शामा राणी
घाटावर आणाया पाणी

हरळी दाट
मऊ सपाट
झिम्मा झिम्पोरि, फुगड्या फेरी
स्वच्छंदानें कधीं दुपारीं
जमवुनि खेळिल त्रुजऱ्या पोरी

उंच उजाड
पिंपळ झाड
डौळी फांदी, आणुनि बांधी
नवा नारळी जाडा दोर
झोके काढिल अल्लड पोर

कपिला गाय,
डौलीं जाय,
शेपुट चौरी, अलगद फेरी
फिरेल पळवित माळवनांत
खुळ्या प्रीतिचीं गाणीं गात

झुरुमुरु धार
दूध चिकार
भरून कटोरा अहीर गोरा
देतां डोळीं बोटें चार
'नको नको.'चा नाजुक मार

सहज मधुन
दिसलि म्हणुन
चंचळ पापी, मोहक छापी
खुपरे डोळे रोखुनि कोणी
पाहात राही जंगलराणी

# दत्तप्रसन्न कारखानीस

(१९०८– )

## बंदिवान पोपटा...!

बंदिवान पोपटा ! कशाला धडपडसी पंजरीं ?
तिथेंच राही मित्रवरा रे ! सोन्याच्या मंदिरीं !

डाळ, पेरु, डाळिंब, कलिंगड खाद्य खावया जरी,
सुगंधमय जल वाळामिश्रित मिळतें प्याया वरी !

सुखासुखीचा घांस तोंडचा सोडुनि वेड्यापरी,
वणवण विपिनीं फिरावयाची येत तुला शिर्शिरीं !

कानमंत्र तुज स्वातंत्र्याचा दिधला का कुणि तरी !
तरीच तडफड, अफाट धडपड चालत ही पंजरी !

गोड गुलाबी, नको विसंबूं सोज्वळ थापांवरी
थांब थांब खगवरा ! अंतरीं संयम कांहीं धरीं !

आणि विहंगम, नजर टाक तूं सभोंवतीं क्षणभरी
अन्नासाठीं तिळ तिळ तुटतो लाख जिव भूवरी !

निढळाचा ढाळुनी घाम अश्रांत मेहनत करी
कामकऱ्याला पोटापुरती तरि न मिळे भाकरी !

चार शब्द पढविले, बोलले, रमले सुखसागरीं;
कशास आटापीट व्यर्थ ही दुर्धर गिरिकंदरीं !

गिरिगव्हरिं हिंडतां व्याधशर अवचित बसतां उरीं
स्वातंत्र्याच्या तरल कल्पना विरतिल वाऱ्यावरी !!

# नारायण माधव संत

(१९०९–१९४६)

## वीज !

माझ्या मी हृदयांतल्या उकलुनी दावूं कशा भावना
कैसें फूल कळींतलें उकलुनी येईल गे दावितां ?
किंवा पिंजुन मेघ येईल कशी विद्युल्लता पाहतां ?
छेडूनी बिसतंतु हे उगिच कां सोसूं तरी यातना ?

आली काय नभांत घेऊन अतां आषाढमेघावली
छेडी गीत अखेरचें विहरुनी रानांतुनी कोयळ
तीच्या गोड स्वरांतुनी प्रकटली दुःखार्तता कोवळी
'जातां मत्सख, प्रांत होईल मला दुःसह्य हा केवळ !'

माझ्याही हृदयांत दाट जमुनी आल्यात या भावना
त्यांचा थांग अजून मात्र नच हा माझा मला लागला
ज्यांची गंभिर गर्जना उपजवी जीवास या मूढता
आणी ती चपला क्षणीं उजळुनी जीवास मोहांधता

जावी व्यक्त करावया हृदयिंची जों वीजही नाचरी
येती कोसळुनी सरारुन अहा ! डोळ्यांतुनी या सरी !

# वा म न   रा व जी   ढ व ळे

( १९०८–      )

## तुझ्या खुणा

वद तुझ्या काय असणार खुणा ?
मी कसा ओळखूं तुज मरणा ?

येशिल का रे वाजत गाजत ?
मरुतासम का येशिल बरळत ?
उल्केसम किंवा तेजाळत ?
येशील कसा ? दिसशील कुणा ?
मी कसा ओळखूं तुज मरणा ?

येशिल किंवा पाताळांतुन ?
नरसिंहासम वा स्तंभांतुन ?
तडितेसम का आभाळांतुन
भयभीत करित अवघ्या गगना ?
मी कसा ओळखूं तुज मरणा ?

घुमती घुबडें तो तव का स्वर ?
रुद्रासम का असशिल भेसुर ?
शांतिदूत कीं समरधुरंधर ?
असशील कुणी योगी ! मरणा ?
मी कसा ओळखूं तुज मरणा ?

पाय वाजती पाचोळयावर !
तूंच येशि का तेथुन झरझर ?
हिमलाटेसम जाळित मोहर—
येशील करित जगतीं दैना ?
मी कसा ओळखूं तुज मरणा ?

घेउनि काळोखाची स्मरणी,
तूंच बैसशी का अनुरजनीं ?
भीति, निराशा माळेंतिल मणि—

ओढिशी काय तूं पुन्हा पुन्हा ?
मी कसा ओळखूं तुज मरणा ?

कुठुनि कसा ये. तिळ ना मज भय.
जीवित माझें सत्य मनोमय !
नेशिल शरिरा ! मरण तेंच तव !

उरतील मात्र मम येथ खुणा !
मी कसा ओळखूं तुज मरणा ?

## आलीस तूं

आलीस तूं नी शांतलीं
माझ्या मनांतिल वादळें
नैराश्य तें हरिणीपदें
अन् कोठच्या कोठें पळे !

या वाळवंटीं चाललों
होतों, प्रवासी एकटा
अंधारुनी गेलें मन
दृष्टींत होती शून्यता !

तेजाळल्या दाही दिशा
चैतन्य अंगीं ये नवें

आलीस तूं मज वाटलें
चोंहीकडे जग हो नवें !

# कुसुमाग्रज [ वि. वा. शिरवाडकर ]

( १९१२-    )

## स्वप्नाची समाप्ति

[ छंद पादाकुलक ]

स्नेहहीन ज्योतीपरी
मंद होई शुक्रतारा
काळ्या मेघखंडास त्या
किनारती निळ्या धारा

स्वप्नासम एक एक
तारा विरे आकाशांत
विरे रात्र कणकण
प्रकाशाच्या सागरांत !

काढ सखे, गळ्यांतील
तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलिकडे
उभे दिवसाचे दूत !

रातपांखरांचा आर्त
नाद नच कानीं पडे
संपवुनी भावगीत
झोंपलेले रातकिडे !

पहांटेचे गार वारे
चोरट्यानें जगावर
येती, पाय वाजतात
वाळलेल्या पानांवर

शांति आणि विषण्णता
दाटलेली दिशांतुन
गजबज गर्जवील
जग घटकेनें दोन !

जमूं लागलेलें दंव
गवताच्या पातीवर
भासते भू तारकांच्या
आसवांनीं ओलसर !

काढ सखे, गळयांतील
तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलिकडे
उभे दिवसाचे दूत.

प्राजक्ताच्या पावलाशीं
पडे दूर पुष्परास
वाऱ्यावर वाहती हे
त्याचे दाटलेले श्वास !

ध्येय, प्रेम, आशा यांची
होतसे का कधीं पूर्ती !
वेड्यापरी पूजतों या
आम्ही भंगणाऱ्या मूर्ती !

खळयामध्यें बांधलेले
बैल होवोनियां जागे
गळयांतील घुंगुरांचा
ध्वनि कानीं येउं लागे

आकृतींना दूरच्या त्या
येउं लागे रूपरंग
हालचाल कुजबुज
होऊं लागे जागोजाग

काढ सखे, गळयांतील
तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलिकडे
उभे दिवसाचे दूत

होतें म्हणूं स्वप्न एक
एक रात्र पाहिलेलें

होतें म्हणूं वेड एक
एक रात्र राहिलेलें !

प्रकाशाच्या पावलांची
चाहूल ये कानावर
ध्वज त्याचे कनकाचे
लागतील गडावर

ओततील आग जगीं
दूत त्याचे लक्षावधी
उजेडांत दिसूं वेडे
आणि ठरूं अपराधी !

## पृथ्वीचें प्रेमगीत

[ वृत्त सुमंदारमाला ]

युगामागुनी चाललीं रे युगें हीं
करावी किती भास्करा वंचना
किती काळ कक्षेंत धावूं तुझ्या मी
कितीदां करूं प्रीतिची याचना !

नव्हाळींतले ना उमाळे, उसासे
न ती आग अंगांत आतां उरे
विझूनी अतां यौवनाच्या मशाली
उरीं राहिले काजळी कोपरे !

परी अंतरीं प्रीतिची ज्योत जागे
अविश्रांत राहील अन् जागती;
न जाणें, न नेणें कुठें चाललें मी
कळे तूं पुढें आणि मी मागुती !

दिमाखांत तारे नटोनी थटोनी
शिरीं टाकितां दिव्य उल्काफुलें
परंतू तुझ्या मूर्तिवांचून देवा,
मला वाटतें विश्व अंधारलें !

तुवां सांडलेले कुठें अंतराळांत
वेंचूनियां दिव्य तेजःकण
मला मोहवाया बघे हा सुधांशू
तपाचार स्वीकारुनी दारुण.

पिसारा प्रभेचा उभारून दारीं
पहांटे उभा शुक्र हा प्रेमळ
करी याचना प्रीतिची लाजुनी लाल
होऊनियां लाजरा मंगळ.

निराशेंत संन्यस्त होऊन बैसे
ऋषींच्या कुळीं उत्तरेला ध्रुव
पिसाटापरी केस पिंजारुनी हा
करी धूमकेतू कधीं आर्जव !

परी भव्य तें तेज पाहून पूजून
घेऊं गळयाशीं कसे काजवे !
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनि साहवे !

तळीं जागणारा निखारा उफाळून
येतो कधीं आठवानें वर
शहारून येतें कधीं अंग, तूझ्या–
स्मृतीनें उले अन् सले अंतर !

गमे कीं तुझ्या रुद्र रूपांत जावें
मिळोनि गळां घालुनीयां गळा
तुझ्या लाल ओठांतली आग प्यावी
मिठीनें तुझ्या तीव्र व्हाव्या कळा !

अमर्याद मित्रा, तुझी थोरवी अन्
मला ज्ञात मी एक धूलीकण
अलंकारण्याला परी पाय तूझे
धुळीचेंच आहे मला भूषण !

# एकदां ऐकलें

एकदां ऐकलें
कांहींसें असें :
असीम अनंत
विश्वाचें रण
त्यांत हा पृथ्वीचा
इवला कण
त्यांतला आशिया
भारत त्यांत
छोट्याशा शहरीं
छोट्या घरांत
घेऊन आडोसा
कोणी 'मी' वसे
क्षुद्रता अहो ही
अफाट असे !
भिंतीच्या त्रिकोनीं
जळमट जाळीं
बांधून राहती
कीटक कोळी
तशीच सारी ही
संसाररीती
आणिक तरीही
अहंता किती ?
परंतु वाटलें
खरें का सारें ?
क्षुद्र या देहांत
जाणीव आहे
जिच्यांत जगाची
राणीव राहे !
कांचेच्या गोलांत
बारीक तारा

ओतीत रात्रीत
प्रकाशधारा
तशीच माझ्या या
दिव्याची वात
पाहते दूरच्या
अपारतेंत !
अथवा तुरलें
वेगळेंपण
अनंत कांहीं जें
त्याचाच कण !
डोंगरदऱ्यांत
वाऱ्याचीं गाणीं
आकाशगंगेंत
ताऱ्यांचें पाणी
वसंतवैभव
उदार वर्षा
लतांचा फुलोरा
केशरी उषा...
प्रेरणा यांतून
सृष्टींत स्फुरे
जीवनतेज जें
अंतरीं झरे
त्यानेंच माझिया
करीं हो दान
गणावें कसें हें
क्षुद्र वा सान ?

## निळा पक्षी

उषःकालचें प्रकाशमंडल येतां प्राचीवर
निळें पाखरूं त्यांतुन कोणी अवतरलें सुंदर

फुलराणीचें विलासतारूं निळीं उभारुनि शिडें
सोनेरी दर्यांतुन आलें—आलें माझ्याकडे !
पालवलेल्या मृदुल पाकळ्या पंखांच्या मिटवुन
झालें ज्यांवर दिसे उषेच्या किरणांचें सिंचन—
स्वप्न निळें तें बसे अंगणीं हिरव्या वेलीवरी
आकाशाचा आशीर्वादच आला माझ्या घरीं !
फुलवुनि अपुला दिव्य पिसारा नाद पदांचा क़री
नवरत्नांचा झुलतो पंखा गमे लतेच्या शिरीं !
बरसुं लागलीं गीतें मंजुळ कोमल कंठांतुन
स्वरलहरींनीं वेढुन गेलें सारें मम जीवन
जिवाभोंवतीं वितरुनि माझ्या घडीभरी लाघव
हंत, नभीं तें निघून गेलें मखमाली मार्दव !
उदासवाणे नेत्र शोधती जें कोठेंही नसे
दलित पाकळ्यांतुनी झुलावें पुन्हां पुष्प तें कसें ?
निळ्या अनंता मिळून गेला माझा पक्षी निळा
रखरखती भंवतालीं आतां माध्यान्हींच्या झळा !

## अहि-नकुल

[ जाति द्राक्षकन्या ]

ओतीत विखारी वातावरणीं आग
हा वळसे घालित आला मंथर नाग,
मधुनीच उभारी फणा, करी फूत्कार
ये ज्वालामुखिला जणूं अचानक जाग !

कधिं लवचिक पातें खड्गाचें लवलवतें,
कधिं वज्र धरेवर गगनांतुन कडकडतें,
कधिं गर्भरेशमी पोत मधें जरतार,
प्रमदेचें मादक वस्त्र जणूं सळसळतें !

मार्गावर याच्या लवत तृणाचीं पातीं
पर्णांवर सुमनें मोडुनि माना पडती
थरथरती झुडुपें हादरती नववेली
जणुं गुलाम सारे या सम्राटापुढतीं !

चालला पुढें तो—काय ऐट ! आनंद !
अग्नीचा ओघळ ओहळतो जणुं मंद,
  टाकली यमानें कट्यार वा कनकाची
चालली बळींचा वेध घेत ही धुंद !

वा तांडव करतां सोम प्राशुनी काली—
रक्तांत नाहली, शिरमुंडावळ भालीं,
  थयथयां नाचतां नरड्यांवर प्रेतांच्या,
हें कंकण निखळुनि पडलें भूवर खालीं !

चालला पुढें तो लचकत मुरडत मान,
अवतरे मूर्तिमान् मल्हारांतिल तान !
  चांचल्य विजेचें, दर्याचें गांभीर्य
चालला मृत्युचा मानकरीच महान !

हां थांब ! कुणाची जाळिमध्यें चाहूल,
अंगार-कणापरि नयन कुणाचे लाल,
  आरक्त ओंठ ते ध्वजा जणूं रक्ताच्या,
रे नकूल आला ! आला देख, नकूल !

थबकलाच जागीं सर्प घालुनी वळसा,
रिपु समोर येतां सोडुनि अन् आडोसा,
  भूमीस मारुनी मागें तीव्र तडाखा,
वे फडा उभारुन मरणाचा कानोसा !

पडलीच उडी ! कीं तडितेचा आघात !
उल्केपरि तळपत कण्यांत घुसले दांत,
  विळख्यावर विळखे कसून चढवी सर्प,
फुंफाट करी अन् पिशापरी त्वेषांत !

रण काय भयानक, लोळे आग जळांत !
आदळती, वळती, आवळती क्रोधांत ;
  जणुं जिंकायासी गगनाचें स्वामित्व !
आषाढ-वनांशीं झुंजे वादळ-वात

क्षणिं धुळींत गेली वाहत ती विषधार,
शतखंडित झालें तें गर्वोन्नत ऊर,

विच्छिन्न तनूंतुनि उपसुन काढुनि दांत
वाऱ्यापरि गेला नकुल वनांतुनि दूर !

संग्राम सरे, रक्ताचे ओघळ जाती
आनंदें न्हाती त्यांत तृणाचीं पातीं
पिंजून कापसापरी पडे तो नाग
ते खंड गिळाया जमले कीटक भोंतीं !

## उषास्वप्न

सखे, मृगजलांत मी कमलिनीपरी नाहलें,
प्रकाशकिरणांत या नवल हंत तें संपलें,
जगा गमत मित्र जो रवि मलाच हो वंचक.
उदास मरुभूपरी दिसत हा रिता मंचक !

तुझे चरण लागतां उगवतीस नारायणा
सुवर्णलहरींवरी विहग जात तारांगणा.
परी मजसि शाप तो हृदयपांखरूं बापुडें
विपक्ष घरट्यामधें विकल होउनीयां पडे !

द्युतींत तव नाहुनी कनकवर्ण होई धरा
मलाच तिमिरांत कां बुडविसी प्रकाशेश्वरा ?
मनोगत लतेवरी सुमनरूप साकारलें
मनोगत मदीय रे परि तवागमीं भंगलें !

सखे, अननुभूतशी उदित हो मनीं भावना,
उगाच रुधिरांतुनी लहरुं लागली चेतना.
उशीवरति टेकतां शिर निशीं उगा वाटलें
चहूंकडुनि वर्षती तनुवरी सुगंधी फुलें—

उगाच गमलें कुठें मधुर तार झंकारते,
स्वरांवरि सकंप त्या हृदय आंत हिंदोलतें !
गमे कुणि तरी कुठें कुजबुजे मला बोलवी,
कुणी श्वसन रोधुनी दुरुनिया करां पालवी !

क्षणीं विहरूं लागलें अतल यक्षदेशांतरीं
प्रफुल्ल कमलापरी पुनव जेथ नीलांबरीं
प्रसन्न गगनांत त्या धवल भव्य मेघावर,
मनोहर दिसे मला सुरधनूपरी मंदिर !

तिथें मदनरूप तो प्रिय सुहास होता उभा
विशाल नयनीं फुले अभय यौवनाची प्रभा !
तयास बघतां सखे, वळत नेत्र पायाकडे
अशांत हृदयांत हो नव अबोध भीती जडे !

करी स्मित सरे पुढें धरुनियां करानें मला,
म्हणे मजसि आर्जवें ' अमर मंदिरीं या चला '
समीरलहरीवरी पतित पर्ण जातें जसें
तशीच सखयास मी अनुसरें कळे ना कसें !

महाल-निथळे तिथें अणुअणूंतुनी चांदणें
सुरेशभुवनींहि ना विभव रम्य तें नांदणें
' कुठें असत मी ' असें वदत चित्त भांबावुन,
धरून करपाशिं तो म्हणत ' हें प्रिये यौवन ! '

कवेंत मज वेढुनी, फिरवुनी करां कुंतलीं,
मदांध नयनांतुनी नयनिं वारुणी ओतली !
मुलायम जलापरी, परिमलातं वायूपरी
सुवर्णमय मंचका बघुनियां थरारें उरीं !

फुलामधिल रम्यता विधुकरांतली चारुता,
सुधेमधिल माधुरी, मधुमधील बेहोषता,
अजाण मम जीवनावर उधाणला संगम,
लतेसि पहिला जसा करित धुंद पुष्पागम !

सखे कधुं कसें पुढं हळुच ओढली मेखला
नको म्हणत मी तरी लव दया न त्या ये खला
गळून विनयापरी वसन गे पडे रेशमी
तशीच सरुनी पुढें विजविला सखे दीप मी—

सखे विझविला दिवा—विझविलेच सारे दिवे !
मयें मजसि जाग ये सकल लोपलीं वैभवें !
कुठें न अनिरूद्ध तो प्रणय, तें कुठें मंदिर ?
कठोर पडला कळे किरण मात्र नेत्रावर !

## अशोक [दत्तात्रय केशव भट]

(१९१०- )

### तुझी आठवण

कांहितरी होउनिया कारण,
तुझी आठवण जेव्हां होते,
उरांत भरते लहर वेडसर—
आणि 'बाजुचें' बाजुस होतें !

ज्यामधिं होतों आपण दोघें
प्रसंग-चित्रें पूर्वींचीं तीं
डोळ्यांपुढती भासत, हांसत,
रंगत, रेंगाळत विरताती !

आणि आपल्या बोलण्यांतले
वाद आणि संवाद कितीतरि
मुकेपणांतच बनुन बोलके
कर्णपथीं करतात मुशाफरि !

असल्या स्पर्शास्पर्शामधुनी
ओथंबे जो स्नेह चिरंतन
जननांतरिंचा गमे जिव्हाळा
स्वतांचेंच कीं करतों चिंतन !

नंतर येतें आतांचें तें
जग 'बाजूचें' आणि 'स्वतांचें' !
संध्या-स्वप्न जणूं विरल्यावर
उरे आवरण वरी निशेचें !

—आणि दूर त्या चंद्र-चांदण्या !
    —दुरुनिच त्यांना बघावयाचें !
—दुरुनिच पाहुन प्रकाश-लाघव
    येथुन आपण हंसावयाचें !

## पोट उपाशी

पोट उपाशी कळवळलें कीं
    ‘ मानी जीवा ! हात पुढें कर…
मिळेल तर मिळुं दे रे बाबा,
    भीकेची असली तरि भाकर… ’

अश्रू करुनी जरा बाजुला
    क्षुधा बघे भिजल्या डोळ्यांतुन !
थरथरत्या करिं होती भाकर—
    बघत क्षुधेला विषण्ण हांसुन !

‘ उचल हात रे माझ्या बापा !
    घांस एक तरि आंत लोट रे ! ’
—पुन्हां विवळलें पोट उपाशी…
    ‘ कवळ एक तरि कवळूं दे रे ! ’

तिथेंच केला जरा अडोसा
    त्राणच नव्हतें दूर जावया !
आणि खायची आतां भाकर
    पोटाची समजूत कराया !

तोंच तुटावे भुंकत तेथें
    अपुल्या पोटाचा कुणि चाकर !
आणि तयाच्या कवळिंत गेला
    कवळ सोडुनी गरिबाचा कर !

पिळवटलें तें पोट उपाशी
    ‘ अरे…अरेरे…कोठें भाकर… ’

आणि लोचनें पहात होतीं
रक्तबिंदु कांपऱ्या करावर !

झांपड आली दुसऱ्या नयनीं
काया कलली धुळींत खालीं
सर्व शून्य व्हायच्या अगोदर
जातां जातां वृत्ती वदली—

'भाकर ती तुज पचली नसती
वेड्या पोटा, श्वान योग्य तिज !'
—आणि लागली लगेच व्हाया
बंद हळु हळू आंतिल गजबज !

## व सं त रा व चिं ध डे

( १९१६–  )

### दारीं येशी आज अकल्पित

दारीं येशी आज अकल्पित
आणि उपेक्षित पाषाणांतुन मूर्ति मनोरम झाली शिल्पित !

स्वप्नासम आलीस समोरुन,
स्वप्नाहून परंतू सुंदर,
आणि चंद्रिकेपरि पुनवेच्या
उजळलेंस मम उदास अंतर—
तुझें आगमन–स्वप्न न आतां–सत्य एक चिरपरिचित शाश्वत !

अंगांगांतुन तुझ्या झळाळे
कांचन-कांति मोहक उज्ज्वल,
अणुरेणू उजळती तेथले
जिथें पडे तव सुवर्ण पाउल
रितें हृदयसिंहासन माझें, हेमांगिनि, केलेंस अलंकृत !

जीवन-गीताला ह्या माझ्या
मिळे सुरेल न साथ आजवर,
रंग न भरला, आळविलीं जरि
ललित-मधुर गीतें रस-मंथर—
आज परंतू हृद्वीण्याच्या तारा झाल्या सहसा झंकृत !

जीवन-मार्गावरती माझ्या
केलिस तूं पुष्पांची पखरण,
' जय अपुला ' तूं येशि पुकारित
शिरीं फुलांची करीत उधळण—
सुवर्णमय अन् स्वरमय माझें जीवित झालें आज सुगंधित !

दारीं येशी आज अकल्पित !

## कणिका

हा वृक्ष एकदां जीर्णशीर्ण झालेला
पाहून वाटलें कीं हा पुरता वठला
—पण काय तरी ही अद्‌भुत किमया आतां
मधु मत्त दर्वळे सुगंध ह्याचा रानीं
वासंतिक वैभव उसळे पानोपानीं ! !

✕

टाकितां देह हा रात्रीं धरणीवरती
एकेक लोचनापुढून मूर्ती सरती
क्षणभरी तुझ्यावर जाती नयन खिळून
त्या काळोखांतुन येशी तूं उजळीत
उज्ज्वले, मदिय हें काजळलेलें चित्त ! !

## संजीवनी [सौ. संजीवनी मराठे]

( १९१६- )

### प्रतीक्षा !

तिकडली स्वारी घरास यायची
उडे तारांबळ माझिया जिवाची

कोनाकोपऱ्याची धूळ झटकली
घरास दारास निर्मळता आली

निर्मळता आली तनूला, मनाला
प्रतीक्षेचा शीण क्षणीं हरपला

गोड पक्वान्नांच्या संगें बोल गोड
बोलेन–ऐकेन, लागलीसे ओढ

रचियली शेज सफेत सुंदर
उशाला ठेवीले मोगरीचे हार

घरांतले सारे दीप मालवीले
उभी मी सज्जांत शिणवीत डोळे

रहा तारकांनो अशाच तेवत
एकाकी पांथाला तुमची सोबत

चढे जाळींतून चंद्रमा आकाशीं
मनांत सांठल्या गुपितांच्या राशी

किती किती राया वेळ लाविलात
माजलें काहूर मनांत–देहांत !

### आज घरास यायची

आज घरास यायची माझी माउली मायेची
माझ्या संसारावरती तिची दृष्टी फिरायाची

माझा जीव आनंदानें आला बाई मोहरून
उत्साहाचें गीत माझ्या मुखीं आलें ओथंबून

सारे पसारे ठेविले आवरून सावरून
वरकूल ठेवियेलें नटवून सजवून

माझ्या माहेराची रीत वठवीतें राहणींत
माते ! तुझी शिकवण आहे माझ्या स्मरणांत

सानुल्यांना सांगितली वार्ता अति आनंदाची
आज बाळांनो, आपणां आजी आहे भेटायाची

तुम्हांला नि मला आतां नको काळजी कशाची
माझी मायेची माउली आहे वरास यायची !

झाली यावयाची वेळ पाय घोटाळे दारांत
बाळ उभा फाटकाशीं दूरवर न्याहाळीत

माझा मलाच देतांना धीर, काळीज कांपतें
तोंच दुरून टांग्यांत माझ्या मायेस देखतें

'आजी आली, आजी आली' झाली दुल्लड घरांत
हळुवारपणें माय पाय टाकी उंबऱ्यांत

पडो माझ्या संसारांत माझ्या मायेचें पाऊल
माझ्या सुखसर्वस्वाची तिला घेऊं दे चाहूल

## शांत सागरीं कशास

शांत सागरीं कशास उठविलींस वादळें ?

काय हें तुझ्यामुळें
देहभान हरपलें
युगसमान भासतास आज नाचरीं पळें !

अमृतमधुर बोल एक
श्रवणिं जों न पाडिलास
अधिरता भरे जिवांत केवढी तयामुळें !

निमिषमात्र लोचनांत
दिव्य तेज दाविलेंस
भटकुनी तसेंच वन्हि जीव आंतला जळे !

पढविल्या वदे वचांस
बद्ध त्या विहंगमास
गायिलेंस तूं कशास गीत नंदनांतलें ?

स्वर्ग कल्पनेंतला
येइल कधिं भूतला
दिवसरात्र अंतरांत आस ही उचंबळे !

शांत सागरीं कशास उठविलींस वादळें ?

## पद्मा [सौ. पद्मावती गोळे]

( १९१३- )

### याच कांहीं क्षणांसाठीं

भिंती फिकट हिरव्या
झुले पडदा रंगीत
आणि कोचांच्या गिरद्या
हिरव्या गडद गडद

शुभ्र पुतळा बुद्धाचा
पुष्पहारें सुशोभित
उद्बत्तीच्या सुवासानें
मन होतें उल्हासित

उभे समोर गांधीजी
धीर देत मानसासी
रोमां रोलां नि लेनिन
नव्या युगाचे हे ऋषि

पलिकडे तीं कपाटें
ज्ञान-रत्न मंजूषांचीं
वरी विराजे प्रतिमा
ध्यानमग्न ज्ञानेशाची

उजळतो कोनकोन
प्रकाशानें निळसर
तूं मी वाचीत बैसतों
स्तब्धपणें कोचावर

कधीं वाचतांना येई
कांहीं विशेष सुंदर
सांगतांना एकमेकां
येतो आनंदा बहर

खिडकीशीं जातों कधीं
दोघें पुस्तकें मिटून
न्याहाळतों मूकपणें
आकाशींचें तारांगण

येई झुळूक वाऱ्याची
सर्व सुगंध घेऊन
हालवीत तुझे केस
रुंद कपाळावरून

स्तब्ध निःशब्द भोंवतीं
तसें तुझ्या माझ्या मनीं
मूकताहि वाटे गोड
लाख प्रेमबोलांहूनी

वेगें दिवस संपतो
आपुलाल्या उद्योगांत
याच कांहीं क्षणांसाठीं
आतुरतें माझें चित्त !

# इंदिरा [ इंदिरा संत ]

( १९१४-        )

## खुणा

“ लाल मऊ धुळींतील
   उमटली खूण, खूण,
माझ्या अंतरींचा ठेवा
   पहा गडे न्याहाळून !

बघ येथें उमटलीं
   चाकें कशीं दुचाकीचीं
नक्षी किती सुकुमार
   किनारच पातळाची !

बाळ कोणी धावलासे
   ओढ लागून घराची
इथें पाऊलें गोजिरीं
   बघ दुडक्या चालीचीं !

इथें कोणा प्रेमिकांची
   जोडी जाई बिलगून
उमटली लगोलग
   बूटाचपलांची खूण !

गेला कोणी अधिकारी
   ठसवोनी अधिकार
बुटांतील खिळे परी
   उमटले सुकुमार !

शेळ्या-मेंढ्यांचा कळप
   आला बघ धसा धसा
नाजूक त्या पावलांचा
   साठवावा कसा ठसा !

सरसर आलीं पानें
    फेर धरून नाचलीं
नाजूक ही त्यांची खूण
    किती जपून ठेविली !

गजबजे अंतर हें
    अशा लोभस खुणांनीं
येते परी एक वेळ!
    जाती साऱ्याच पुसोनी !

आणि अंतरावरू
    जातो अंधाराचा लोळ
बसे तया न्याहाळीत
    क्षीण दीपकांची ओळ !

होऊनीयां एकतान
    आभाळही वरतूनी
कोरी बुजलेल्या खुणा
    चांदण्यांच्या टांचण्यांनीं

लाल मऊ धुळींतील,
    उमटली खूणखूण
माझ्या अंतरींचा ठेवा
    पहा गडे न्याहाळून !"

## वाटे मला

ओथंबले मेंदी-घोस
त्यांच्या परागांची उटी
लेऊनीयां, मंद मंद
येई झुळूक चोरटी !

फुलें पारिजातकाचीं
ओवळती हळुवार

गंध त्यांचा झेलूनीयां
समीर ये सुकुमार !

मंद शीत सुगंधित
येती झोत माझ्यापाशीं
येऊनीयां बिलगती
लाडकीं हीं बाळें कशीं !

कठोर हें मन परी
तोडी त्यांचा स्नेहपाश
ओढ जीवा वेगळीच
वेगळाच त्याचा ध्यास !

सागराचा खारा वारा
गंध त्याचा आणि धुंद
वादळाची ओढ त्याची
स्पर्श ओलसर सुंद !

आभाळ हो काळेंभोर
चहूंकडे धूळ धूळ
बेफाम हा धावे वारा
सुटे सागराचा तोल !

घुसमटे श्वास, जाई
देह-दूकुलाचें भान
वाटे मला आतां व्हावें
याच वादळास्वाधीन !

## शेला

निर्मल निर्भर वातावरणीं
धुकें तरंगे धूसर धूसर
झगमगते अन् नक्षी त्यावर
सोनेरी किरणांची सुंदर

थंड गुलाबी कार्तिकांतला
हवाहवासा स्पर्श तयाचा
सुगंध त्याला नाजुक मादक
नव्या उमलल्या बूच-फुलांचा !

चारुदत्त हा कोण, कोठुनी
अंगावरला फेकित शेला
वसंतसेना वसुंधरेनें
झेलुन तो हृदयाशीं धरला !

## चिमुकलें डबकें

सरसर गेला पाउस येउनि
जिकडे तिकडे झालें पाणी
टप टप ठिबके पानांमधुनी
लोट चालले रस्त्यामधुनी
लगबग जाती कुठें धावुनी
घाई कसली ? कुठें ओढणी ?

मधेंच रस्त्यावरी एकलें
सांचुन राही डबकें इवलें
जणूं खोडकर हट्टी बालक
तटुनी हटुनी राही नाहक
रुचे न त्याला जाणें धावुन
आणिक मिळणें ओढ्यालागुन

आस कोणती मनीं धरूनी
बसे इथें हें खिन्न होउनी ?
गढूळ झालें चिखल माखुनी
गजबज करती चिलटें वरुनी

कुणी पोरटीं जातां येतां
खडे फेकती त्यांत खेळतां

कुणी न जाई त्याच्याजवळुन
जातां घेती वस्त्र आवरुन
तिरस्कारुनी त्याला बघती
शीं शी म्हणुनी कुणी थुंकती

गर्वोद्धत कुणी मधेंच मोटर
भेदुनि जाई त्याचें अंतर.
कारंजीं चिखलाचीं उडती
शांत जलावर रंग तरंगती.

सर्व ताप हा घेई सोसुनी
खिन्नपणानें राही बसुनी.

येउन वरुनी कोमल रविकर
उजळूं पाहे याचें अंतर
येउनि वायूलहरी शीतल
हसवूं पाहे उदास पल्वल
कुणी बालिका गोजिरवाणी
शुभ्र सोनुल्या नावा सोडुनी
त्याच्या संगें खेळूं पाहे
परी कुणाला मुळीं न मोहे

हास्यछटा मुळिं दिसे न वदनीं
खिन्नपणानें राही बसुनी
स्थितप्रज्ञ हा मुनी कुणि तरी
घोर तपातें इथें आचरी

कडक उनाच्या समयीं कोठुनि
श्वान तिथें ये जीव घेउनी
केविलवाणें लूतभरू तें
मरणाला जणुं सादच देतें
अंतकाळची तहान त्याची
शमली तेथें दोन जिभांची

आणिक पल्वल क्षणिक उजळलें
जणूं तपाचें सार्थक झालें

चमकुनि किंचित् रविच्या किरणीं
पहातां पहातां गेलें सुकुनी.

## अडखळे

अडखळे लिहितांना
हात कधीं अवचित
आणि निरखून डोळे
पहातात अक्षरांत !

काना-वेलांटीचा डौल
मोड तशी अक्षरांची
कधीं द्यावी कधीं नाहीं
रेघ अक्षरावरची !

न कळत उमटली
कुणाचीहि काय तऱ्हा—
इवल्याशा रेषेमाजी
भावजीवनाचा झरा !

नव्हेतच अक्षरें हीं
स्मृतिसुमनांचे झेले
एका एका अक्षरांत
भावगंध दरवळे !

म्हणूनच लिहितांना
अवचित थांबे हात
धुकें तसें आसवांचें
उभें राही लोचनांत

## केव्हांपासून ही

केव्हांपासून ही लागे हूरहूर
फुललें अंतर अवचित

उगाच मी जातां पहाया दर्पणीं
तरळे नयनीं गोड हसें

लागलें वाटाया सारें हें नवीन
गुंगलें मन्मन नाविन्यांत

नवीनच कांहीं मना उमगलें
हळूच हंसले पंचप्राण

दिवसाच्या मनीं चांदणें दाटलें
मन भारावलें तसें माझें

सूर्योदयापूर्वी नभ कोंदाटतें
आणिक हांसतें त्याच वेळीं

तसेंच हृदयीं कांहींसें दाटलें
तरीही वाटलें गोड कांहीं

## रा जा ब ढे

( १९१२- )

### करवंदीमागें

करवंदीमागें उभी लाजरी पोर
कीं ढगाआड ती लपे विजेची कोर

चालली करुनि अभिसार कुणा भेटाया
डोकाउनि बघती तुला तरूंच्या छाया
हुडकशी रातदिन अशी प्रीत आनंद
कुंजांत कोठल्या लपला गे गोविंद ?
—जिवाचा चार

हा अवखळ वारा जन्माचा छळवादी
प्रणयाचे भरतो सूर भावसंवादी

चाहूल तुझी ऐकिली लतावेलींनीं
कुजबुजती कलिका परस्परांच्या कानीं
—लाजरी पोर

थरकांप जिवाचा असा नाच नयनांचा
पावलोपावलीं गडे फुलांच्या ठेंचा
बसवेल कुठवरी उगें मुखर नुपुरांना
हळुहळू गुंजली मधुशब्दांची वीणा
—लाजरी पोर

कां उगाच चाळा गडे असा पदराशीं
लाजेचा चाले विलास मृदु गालाशीं
कुरवाळुनि तुजला देत धीर जलवंती
शिकविते बोल प्रीतिचे रंगरसवंती
—लाजरी पोर

## माझिया माहेरा जा !

माझिया माहेरा जा ! रे पांखरा,
माझिया माहेरा जा

देतें तुझ्या सोबतीला, आतुरलें माझें मन
वाट दाखवाया नीट, माझी वेडी आठवण
मायेची माउली, सांजची साउली
माझा ग भाईराजा
माझिया माहेरा जा

माझ्या रे भावाची उंच हवेली
वहिनी माझी नवीनवेली
भोळ्या रे सांबाची भोळी गिरिजा
माझिया माहेरा जा

अंगणांत पारिजात, तिथं घ्या हो घ्या विसांवा
दरवळे बाई गंध, चोहिंकडे गांवोगांवा
हळूच उतरा खालीं, फुलं नाजूक मोलाचीं

माझ्या माय माऊलीच्या, काळजाच्या कीं तोलाचीं
तुझी ग साळुंकी, आहे बाइ सुखी
सांगा पाखरांनो, तिचीये कानीं
एवढा निरोप माझा
माझिया माहेरा जा

# वसंत वैद्य

( १९११- )

## शांतिपूजन

गर्दीनें मंदिर गजबजलें
—शांतीस पुजाया जन जमले !

वखवखलेल्या अगणित तोफा,
तलवारींचा उभाच ताफा,
रुधिरतृषेनें टाकित धापा,
नग नरमुंडांचे किति रचिले !

पायदळांची अखंड पंक्ति,
घोडदळांचे संघ दौडती,
भव्य विमानें नभिं गुरगुरतीं,
मंत्र हे गाति जणुं स्तुतिभरले !

स्फोटक अस्त्रें फुटुनी उडती,
ज्वालाग्राही द्रव्यें जळती
विषवायूंचे धूर कोंदती
मंदिरांत हा तर धूप जळे !

फोडिति रणशिंगें किंकाळी
करिती नौबती एकच टाळी,
भेसुर भरले नाद निराळी
करितात आरती भावबळें !

नरमांसाचा प्रसाद करुनी,
वरि शुद्धीस्तव रुधिर शिंपुनी,
राज्य-लालसा प्याया पाणी—
देवीस देउनी तोषविलें !

सत्तामदिरेचे घट भरले,
आकांक्षांचें कुंड धडकलें,
बंधुत्वाचें सर्पण जळलें,
'जय शांति' रवें नभ दुमदुमलें !

जिवंत जाळुन चितेंत जीवा,
अस्थींची हे करिती सेवा,
शांतीचा तर उडवुन धुव्वा,
म्हणतात—'शांतिनें जग भरलें'!

## वजन-यंत्र

फलाटावर स्तंभासमीप
होतें उभें एक वजनयंत्र पाचारीत लोकां—
'यारे सारे जन.'

खुराड्यांतून पक्षी प्रातःकाळीं जावे उडून
वाटसरू तेवीं थांबतां गाडी
चार दिशांना जाती निघून
झाडून करावा साफसूफ मार्ग
फलाटावरील तेवीं उतारू जाई घेऊन
लोकलगाडी मधून मधून.
जाई एखादी भरधांव गाडी
वाटे चालला अहंकार जणुं होऊन साकार !
चितारला होता फलाट सारा
रंगीबेरंगी चित्रफलकांनीं.
नव्हते तेथें जनजीवनाचे
रोमांचपट, स्मरकथा किंवा समरकथा,
नव्हतीं पुराणें, काव्यें, इतिहास

अथवा चरित्रें चितारलेलीं.
वीरांच्या, कवींच्या, कलावंतांच्या,
विज्ञानवेत्त्यांच्या
नव्हत्या तेथें शिल्पकृति किंवा छायाचित्रणें.
नव्हता कलेचा किंवा आविष्कार.
नव्हती सोनेरी भवितव्याची रेखाटली आशा.
नव्या जगाचीं नव्हतीं स्वप्नें.
' चहापासून फायदे, '
पहा नैनिताल, रामकुंड, देहू,
कोइमतुरी साड्या, पातळें किंवा खंबायती,
फौलादी मुक्का, जुळबेका नतीजा,
पेनकिलर, खासी खलास,
झाली जीवनाची बाजारपेठ !
वेश्यागृहाची खिडकीच जणुं !
त्याच घोळक्यांत
फलाटावर होतें उभें एक वजनयंत्र
पाचारीत लोकां—
' यारे सारे जन. '

फलाटावरून चालले होते
अनंत जीव, अनंत विश्वें, अनंत सुखें, अनंत दुःखें
उरीं आणि ओझीं शिरीं वागवात.
लहान, मोठे,
श्रीमंत, गरीब,
पुष्ट, रोगकृश,
मदिर लावण्य आणि मूर्त घृणा,
त्याच घोळक्यांत
चालला होता कोणी वाटसरू.
होता आपल्याच दुःखांत चूर.
रात्रंदिवस कारखान्यांत
तेथें आजवर राबून सतत
बनविलीं होतीं अपार स्वहस्तें
वजन-यंत्रें.

पोटाची खळी भरायाकारणें
राबला, गेला उरीं फुटून
लाखों यंत्रांची उभवीत माया.

ग्रासला रोगानें-रोगराजानें.
फणफणला होता तापानें,
लागली होती ढास नि धाप,
नव्हतें त्राण उचलून पाय पुढें टाकायचें,
चालला होता हवा पालटाया
जीवनाशेनें मुलखाकडे—
सोडून आपलें कार्याचें क्षेत्र
चाचपीत एक रेलचें तिकिट
आणि एक आणा
खमीसांतला
आला विचार—
पाहूं विचारून यंत्राप्रति या
झाला किती नाश आजवरी या देहसंपदेचा
फलाटावर स्तंभासमीप
होतें उभें एक वजनयंत्र
पाचारीत लोकां—'यारे सारे जन
नाहीं सानथोर, श्रीमंत गरीब,
पुरुष, महिला, सबळदुर्बळ,
वंश, धर्म, जाती,
देश, गण, वेश,
रोगी, निरोगी, स्वकीय, परका
यारे सारे जन
तुमच्याचसाठीं केल्या ठायीं ठायीं
या सुखसोयी
ठेवल्या होत्या काय तुमच्या बापजाद्यांनीं
करून यापरी अपूर्व सोयी ?
घाट एखादा, विश्रामशाळा किंवा पाणपोयी
एवढेंच होतें ठावें पूर्वजांना.'

होतें ओळखीचें यंत्र तयाच्या.
अमोल आपला जीवनरस
देऊन पोसला होता यंत्राचा पिंड तयानें
कामगारानें !
फिरला होता सर्वांगावर
हात तयाचा कामगाराचा
फुलविली होती त्याची अस्मिता
कामगारानेंच !
माझीच सृष्टि,
मीच प्राणदाता
माझ्याच अंकित
याच आशेनें, अभिमानानें
उभा एक क्षण होता समोर
नव्हतें परी राजी बोलाया यंत्र तयाशीं
कोठली मग भाषा सेवेची, कृतज्ञतेची ?
शुंभासारखें होतें थंडगार खडें समोर
वजन-यंत्र
माझीच निर्मिति
मला परकी आणि पारखी
चावी निकलची, सोन्या-चांदीची,
कागदी नोटांची हवी लावाया
सुखाचीं दालनें तेव्हांच होतीं खुलीं खाड्खाड्
पसारा सृष्टीचा उभवून सारा
नामानिराळें ब्रह्म-कामगार !
यंत्रापाठीमागें अदृश्य हात
होता धन्याचा नच निर्माल्याचा
खडकन् झाला अस्पष्ट आवाज
कुण्या गामाची,
कुण्या तन्वंगीची,
कुण्या कुबेराची,
कुण्या कंगालाची,
तोडून मिठी, कडोसरीची सोडून ऊब

कोण आला हा आपल्या वस्तींत ?
हीच होती पृच्छा
यंत्रोदरींच्या तळघराची
' कणकणलें आहे अरेरे अंग ज्वरानें '
क्षणभरच झाली चुळवूळ
क्षणार्धांतच आपपरभाव
गेला पार लया
आण्यांत मिळाला एक नवा आणा ,
टोळीस मिळाला एक नवा साथी,
खळकन् झाला अस्पष्ट आवाज.
खिळवून दृष्टी लाल काट्यावर
एकाग्रचित्तें होता कामगार
समजावून घेत संपदेची हानी आपुल्या
स्थिरच होता तरी शून्यावर तांबडा काटा !
नुरली जणुं जडता देहीं !
सोडून एक दीर्घ उसासा
उतरून खालीं गेला निघून
चाचपीत एक रेलचें तिकिट
खमीसांतलें

फलाटावर स्तंभासमीप
होतें उभें एक वजन-यंत्र
पाचारीत लोकां–' यारे सारे जन ...'

# पांडुरंग श्रावण गोरे

( १९०५-     )

## पाटलाची पोर

रत्नटीक साडी    लाल शालजोडी    जडित शिणगार !
झलमाची गाडी    बसुन भूल पाडी    शांत सुकुमार !
बाभुळबन दाट    डोंगराळ वाट    रान चौफेर
गोऱ्हे अरकाट    सुटले सरनाट    नवे दमदार !
पाठीवर झूल    रंगित मखतूल    वर कलाकुसर
करिति गळ्यांतील    सैल कशाझील    टिणामिण्या गजर
पडदी झक झोल    गोंडे सुति गोल    लवति वरखाल
धूरकरी पोर    मिशीची न कोर    काय परि डौल
पोरीचे पायीं    छब शिंदेशाही    तोरड्या उजळ
सूर्यफूल डोई    सोनें शिवराई    पाडिते भुरळ
सुरतेला तेज    चंद्राची वीज    ठरूं न दे नजर !
लेक घरंदाज    अंगावर साज    उमलता बहर
पिवळी नखबोटीं    नाजुक शेलाटी    पोर गुलजार
रत्नाची वाटी    सोन्याच्या ताटीं    कुण्या पडणार ?

# वा. रा. कांत

(१९१३-   )

## अग्निपंख नभिं फडफडुं दे

तव अग्निपंख नभिं फडफडुं दे
निजलेल्या चटका लव बसुं दे

तुफानवाता बेडी पडली
वीज ढगांतुनि स्वस्थ झोंपली
गगन-घरेला जडता खिळली
त्या प्रलयघनांना कडकडुं दे
तव अग्निपंख नभिं फडफडुं दे

आंत शांत जरि दिसते जगती
युद्ध-वैर-लाव्हारस कढती
धाराकंपनिं आग फुटुनि ती
चल जुनाट जग हें तडतडुं दे
तव अग्निपंख नभिं फडफडुं दे

माणुसकीहुनि आत्मे ढळले
देव देवळांतून भटकले
न्यायावर उकिरडे माजले
हे जाळ, अग्निगिरि धडधडुं दे
तव अग्निपंख नभिं फडफडुं दे

क्रांतिदेवि, ये, विद्युच्चरणीं
तव नयनींची ठिणगी उडवुनि
असंतोष पेटवी जनमनीं
मग जुलुम कितिहि वर गडगडुं दे
तव अग्निपंख नभिं फडफडुं दे

## रमणी, उदविशि निज कचभार

रमणी, उदविशि निज कचभार
मृदुल रेशमी कुरळ मोकळा कृष्णसघन विस्तार

जाळिदार नाजूक टोपलें
शिर टेकुनि तूं त्यावर अपुलें
मदालसे, पहुडशी धरुनि कर उरीं स्वस्तिकाकार
रमणी, उदविशि निज कचभार

न्हाले ओले केश मोकळे
खांद्यावरुनी स्वैर पसरले
मोत्यांवाणीं मधुनि चमकती, टिपुनिहि सलिलतुषार
रमणी, उदविशि निज कचभार

धूर सुगंधी धूपदाणिंतुनि
हळूच मिसळे कचपाशांतुनि
अभिलाषा जणुं तरुण जिवांच्या भ्रमति मंडलाकार
रमणी, उदविशि निज कचभार

सळसळती नागीणपिलें हीं
नयननीलिमा प्यालीं कांहीं
पाजुनी कशास करिशी अधिकाचि धुंद विखार !
रमणी, उदविशि निज कचभार

## घाटावर

लगबग चढे घाट नार निथळे पाण्यानं
भरज्वानीचं कणिस चाले भिजून मद्यानं

शिरीं कळशी, चालते कोण गुलाबी नेसून
नार नागिण गऱ्हाळी चाले गुलालीं न्हाऊन

हातीं पूजाताट डोले, चंदेरीची सळसळ
कांपे ज्वानीच्या वाऱ्यानं चांदण्याचं केळफूल

कोण प्रदक्षणा करी नदीपारीं, कडे तान्हं
सुगी धरणीबाईची लखडली मोतियानं

अंगी धूतां, शिळेभोंतीं   लाट भितरी नाचते
तिला आठवे घरांत   बाळ झोपेंत हांसतें

## रुबाया

जणुं अधरबिंब ! अर्धाच चंद्र वर आला
गिरितळांतुनी अंधार सांचला-हलला
  जळजळत उसळलें काळकूट जें क्षितिजीं
प्यायास काय तें अधर शिवाचा लवला !

×

निष्पर्ण नाचती शाखा, चांफा डोले—
जणुं दग्ध अनंगचि अस्थिशेष हा हाले !
  जंव शाखाशिखरीं फुलें फुलति एकेक
प्रीतिचें अपर्णा-तप तें कुसुमित झालें !

# पुरुषोत्तम शिवराम रेगे

(१९१०–  )

## मस्तानी

एकापाशीं माती होती.
एकापाशीं मस्ती होती.
एक म्हणाला, "मातीचा मी करीन किल्ला."
एक म्हणाला, "मस्तीचा मी चढविन हल्ला."
एकापाशीं माती होती, मस्ती होती.
एक म्हणाला, "मातीची या, मस्तीची अन्
करीन ऐशी मस्तवाल कुणि
—छटेल थोडी, हटेल किंचित्,
बनेल किंचित्, मनेल मोठी.
मस्तवाल मी तिच्याचसाठीं
होशियार अन् पुन्हा तयार."

यार, तुम्ही त्या दुज्या गांवचे
म्हणुन सांगतों काय म्हणालों, कसें म्हणालों.
उगाच ना तरि चव्हाट्यावरी
बसाल कांहीं झोंकित गप्पा
–खवचट तुम्ही टीकाशास्त्री.

माती म्हणजे खरेंच माती;
दुसरें-तिसरें नव्हेच कांहीं,
काळी, करडी, निळी, तांबडी,
चिकणी, बरडी, भुसभुशीत अन्.
मस्ती म्हणजे माझी, तुमची,
जिवंत साऱ्या मनामनांची,
युगायुगांतुन समर्थ ज्यांची
एकच येते हांक निकडिची.

येथें गेलों म्हणाल थोडा
पुन्हा अपुल्या वळण
–घसरलाच कीं बेटा पुन्हा !

मस्ती म्हणजे गालांवरची,
मस्ती म्हणजे डोळ्यांमधली,
मस्ती म्हणजे बाहूंमधली :
मस्ती म्हणजे छाती…छाती,
मस्ती म्हणजे मांड्या, मांड्यांवरचा घाम,
मस्ती म्हणजे विसरविणारी,
मस्ती म्हणजे विसरणारिही,
मस्ती म्हणजे मनांतलीं तीं निळीं, जांभळीं, शुभ्र पांखरें,
मस्ती म्हणजे अफाट माळ,
मस्ती म्हणजे गगनाला जे हात लागती,
मस्ती म्हणजे लाटांवरचा मिस्किल फेस,
मस्ती म्हणजे गंगेमधलें अथांग पाणी,
मस्ती म्हणजे गोपकृष्ण,
मस्ती म्हणजे मत्त हस्ती.

अस्तु अतां हें मस्तिपुराण.
जरा दावितों मातीची त्या मस्तीची अन्
मस्तवाल ती
–छटेल थोडी, हटेल किंचित्,
बनेल किंचित्, मनेल मोठी.
मस्तवाल मी जिच्याचसाठीं
होशियार अन् पुन्हा तयार.

मातींतुन ती रूपच घते,
सत्त्व आणखी छाया शीतळ.
केसांत तिच्या काळी माती,
वक्ष तिचा त्या निळया टेकड्या,
लाल बरड अन् तिच्याच जांघा,
जिराईत ती उदरावरची
थोडी करडी, थोडी पिवळी.
माती माझी असली अस्ली.

मस्ती म्हणजे माझा आत्मा
तिच्याभोंवतीं तेजाचें जो
नवें काढतो-वर्तुळ, निस्तुळ.

मस्तवाल ती नाचण मोठी
मस्तींतच त्या तोडुन येते नातीं सारीं.
वाऱ्यासंगें स्वयें खेळते
फुगडी, पिंगा आणि झपूर्झा
—नक्षत्रांना घालित डोळा.
भिरभिरते अन् जशी नर्तकी
टोकावरती एक बुटाच्या
—केवळ पंखच, केवळ डंखच !
गिर्कीतहि त्या कडक झग्याच्या आखुड घोळाखालीं सुस्थिर
मंथर डावा पाय तिचा तो,
आगीचा कीं खांबच, कोंभच...
आणि संपतां रात्र पहांटे

निळावंतिच्या लाटांवरती
तिचीं पावलें तरळत पळतां
नकळत, हलकीं, स्पष्ट, नेटकीं,
मधेंच दावी जिभली काढुन
—चावट साली.
"खेंटर माझें अडलें पुन्हा
करायला ही कसरत ऐशी !"
म्हणो कांहिही, परंतु येइल...
परंतु येइल पुन्हा-पुन्हा
पचवायाला अपुलाच गुन्हा.
गस्तवाले, होशियार !

## लंपट ओलें वस्त्र होउनी

लंपट ओलें वस्त्र होउनी
अंग अंग तव लिंपुन घ्यावें;
हुळहुळणारें वस्त्र रेशमी
होउन वरवर घोटाळावें.

भुइवर निखळुन नवख्यापरि तुज
दुरून रात्रीं तसें पहावें;
पहांट होतां पश्मीन्याची
शाल होउनी तुज छपवावें.

## उर्वशी

काळोख चेंगट;
चोहींकडे हें हैराण वादळ;
पुरूरवा आणि उर्वशी एकांतीं—
साधिली वेळा खाशी गंधर्वांनीं !
पळविले मेंढे प्रिय उर्वशीचे.
'धांवा रे, पकडा' एकच हुल्लड.

प्रमत्त धांवतो स्वतः पुरूरवा.
पडे, गडबडे, कोण कोलाहल !
त्यांतच मोठा गडगडाट;
चमके वीज;
झालें राजाचें विवस्त्रदर्शन शय्येबाहेर !
होतांच ऐसा संकेतभंग,
त्यजून राजातें
उर्वशी निघे जाण्या माघारीं.
आवेश, रोष, असहायता,
अमोल क्षणांचीं चपखल शल्यें,
चार वर्षांच्या सहजीवनांतील अतृप्तता—
काहूर एकच दाटून येई,
' उर्वशी, उर्वशी, '
आर्त हांकारित
धांवतो राजा दीन पुरूरवा.

हृदयीं विप्लव.

' उर्वशी, उर्वशी, '
फीर माघारीं. '
' दुष्प्राप्य आतां वायूपरी मी
नको `, येऊंस जाई माघारीं ! '
तरीहि पुन्हा
' उर्वशी, उर्वशी, '
आर्त हांक अशी.
त्याच हांकेच्या अक्षरांतून
एकेक स्फुरती
प्रियसखीचे गुणविशेष
विलोल तें लास्य, मादक आव्हान,
लावण्य अम्लान
—हटवाद ऐसा ज्वलंत अंगीं
नटवूं शके जो स्त्रीच एकली !—
युगानुयुगींची विलोभनशक्ति
एकवटून उधळिली जणूं

तपोनिधि श्रीनारायणानें.
आणि वाटलें
मीलन होतें अपुरें केवळ
स्वप्नरंजन.

'उर्वशी, उर्वशी'
हांक पुन्हा अशी.
दस्युवधार्थ सामर्थ्य तुझें
देवांनीं वर्धिलें, दिधलें नद्यांनीं
पयोदान तुला.
पराक्रमाची तुझ्या परिसीमा
साऱ्यांनीं पहावी म्हणूनच ना ?

'उर्वशी, उर्वशी,'
हांक उगा अशी,
रतिकुशला मनोज्ञ तशीच
जाणते ही खरें वीरहृदय.
म्हणते जरी,
'स्त्रियांचें सख्य नव्हेच तें सख्य—
वृकहृदया त्या;
तशांत कामना परिपूर्ण माझ्या—
जातें माघारीं.'
लावूं नको हे बोल मनाला,
नव्हे हें वैराग्य किंवा नैर्घृण्य—
केवळ बहाणा.
युगानुयुगींचीं स्वप्नबीजें रे,
हिच्यांत आहेत सामावलेलीं
चाळविते ही म्हणून ऐसी.
निर्माणशक्ति ही;
भुले जेथें जेथें निर्माणक्षमता,
अनित्य जें तेथें सनातन ही.
युगकर्ता तूंहि;
आहेच तुझें बीज तिच्या पोटीं

ज्यांतून पुढें घेणार जन्म
मनस्वी आयु.
अरे, जोंवर होतास सुकृती
तोंवर तुला वश उर्वशी.
' उंवशी, उवशी, '
कशाला व्यर्थ आक्रंदितोसी ?
कमकुशल योगी जर तूं
मांडिजे यज्ञ सत्वर आतां
सत्त्वरक्षणीं.
तुझ्याच पाशीं
उर्वशी, उर्वशी.

## शेवगा

दोन  प्रहर  निवांत सारें.
श्रमभरानें  बाजेवरतीं
पांगुळलेली  तूं.
खिडकीबाहेर ढाळिता चवरी
आसुसलेला  शेवगा दारचा.

## पाहिलेंस तूं

पाहिलेंस तूं आणि वाटलें
    चुकलें कोठें कांहीं.
पहिलेंस तूं....झालें नवखी
    भरल्या संसारींही.
पाहिलेंस तूं आणि उजळलं
    नव्हतें जें स्वप्नींही.
पाहिलेंस जें अजाण पांथा,
    पाहिलेंस तूं नाहीं.

# बा ळ  सी ता रा म  म र्ढे क र

(१९०९–    )

## वडवित टिऱ्या

वडवित टिऱ्या अर्धपोट किंवा
ओंगळ देखावा दाखवीत

भिक्षा मागे रोज एवढासा पोर,
आई ती लाचार पाठीमागें

शठ सावकार मीहि शरमिंदा
मानव्य-मिलिंदा पैसा देतों

होउनिया नंगे पोटा घांस घ्यावा,
आम्हीहि तो द्यावा हलाखी ही

सत्याचें सुपीक विश्वांतून वेंचूं,
प्रयोगांत खेंचूं परमाणू

अधिकार ऐसा मिळविला आम्ही,
आमुच्याच धामीं नाठाळ कां !

सत्तेचेंच तूप सत्तेचीच पोळी,
मानव्याची होळी भाजाया ती

देवा, ऐशी भूक कासया दिलीस,
झालों कासावीस मीहि नंगा

नंग्यांचाच आतां येथें कारभार
कोंडी आरपार फोडाया ही

टिऱ्या अर्धपोट जोंवरि आहेत,
ओंगळ समस्त आम्ही नंगे !

# फलाटदादा, फलाटदादा

फळाट दादा, फळाटदादा,
येते गाडी, जाते गाडी;
फलाटदादा, आली ही–
पण
शिंगल पडला, गेली गाडी !

हिम्मत तुमची खरी पहाडी,
फलाटदादा, फलाटदादा;

कितीक गेला गडी तुडवुनी
छातीवरतीं तुमांस समदा !

फळाटदादा, फळाटदादा,
येते गाडी, जाते गाडी;
फलाटदादा, आली ही–
पण
शिंगल पडला, गेली गाडी !

फलाटदादा, इंजनवाली
पसंद पहिली भपकेदार ?

कां आतां ही विलेक्ट्रिकीची
नकटी नागिण तळख–तार ?

किति पायांची छोव्या मोठ्या
मऊ चामडी गेलां हुंगुन;

किती बुटांच्या ठोकर टांचा
फलाटदादा, गेलां पचवुन !

सपाट, नाजुक, नखरेबाज
बिलगुन गल्या किती चंपल्या;

किती रांगडी ठसकेदार
वहाण गेली दावित टिकल्या !

फलाटदादा, बोला वो तुमि !
आली गाडी, गेली गाडी;
परी न हंसलां अथवा रडलां,
रामरामचा फुपाट हरघडी !

किती बावटेवाले दादा,
मुछीदार अन् मुछीवगर बी;

हमाल-पार्टर निळे तांबडे
तुमी पाहिले हजर्‌जबाबी !

पचक् पान ह्यो कुनी थुंकलं;
कुनि मायेचे निरोप दिधले;

बिडि-माचिस् कुनि इकीत फिरले;
विलायती कुनि मुके घेतले !

हर् गार्डाची न्यारी शिट्टी ;
हर् ड्रायव्हर्‌चा न्यारा हात;

तुमांस दादा, ठाऊक आहे
पर समाद्यांची बारिक बात !

बोला वो तुमि, बोला वो तुमि;
फलाटदादा, आली गाडी:
उरांत गुपितें कितीक तुमच्या !
बोला वो तुमि !
गेली गाडी;

किति तोऱ्यानें ऐटबाज अन्
दिमाख दावित, घेत सलामी,

'थ्रू' गाडी ही येई जाई
झगाळ, जनुं कीं रानीवानी !

मनांत ठसली फलाटदादा,
झोकदार ही पल्लेवाली ?

फटाकडी वा लाकल' गाडी
चटकचांदणी थिल्लर पटली ?

लटांबराची गबाळ संथ
मालगाडि कां बोलघेवडी—

वरी वाटली ऐसपैसशी,
घरलक्षुमि जनु यडी भाबडी ?

फलाटदादा, बोला बोला !
मिश्किल शिंगल हिरवा झाला;
गेली गाडी :
फलाटदादा
आतां तरि वो बोल बोला !

मिश्किल सिंगल, भोळा सांधा;
सीधे रूळ नि खडी गोमटी;

कुरूप काळी पाठ लावतां,
ज्या जीवाला धरिलें पोटीं.

ह्या समद्यांच्या गोष्टी सांगा;
फलाटदादा, आली गाडी;

बोला वो तुमि ! पाठ टेकतों.
शिंगल पडला:
गेली गाडी.

फलाटदादा,
फलाटदादा,
बोला वो तुमि;

गेली गाडी :
बोला वो तुमि !

फलाटदादा,
फलाटदादा...... !

## पिपांत मेले ओल्या उंदिर

पिपांत मेले ओल्या उंदिर,
माना पडल्या मुरगळल्याविण :
ओठावरती ओठ मिळाले,
माना पडल्या आसक्तीविण.

गरिब विचारे बिळांत जगले.
पिपांत मेले उचकी देउन;
दिवस सांडला घाऱ्या डोळीं
गात्रलिंग अन् धुवून घेउन;

जगायची पण सक्ती आहे;
मरायची पण सक्ती आहे;
उदासतेला जहरी डोळे,
कांचेचे पण;

मधाळ पोळें
ओठावरतीं जमल तेंही
बेकलाइटी ! बेकलाइटी ! !

ओठांवरती ओठ लागले;
पिपांत उंदिर न्हाले ! न्हाले ! !

o

## दणकट दंडस्नायू जैसे

दणकट दंडस्नायू जैसे
लोखंडाचे वळले नाग ;
कभिन्न काळ्या मांड्या, जैसा—
पोलादाचा चिरला साग.

धगधगणाऱ्या भट्टीपुढल्य
प्रकाशांत ही तळपे कांति
जशी ओलसर शिसवी-नक्षी
पॉलिशलेली चांदण्यांत ती.

टणक् कोळसा पावित्र्यांत हा
खोरुनि घेई पावड्यांत अन्
झोकुनि देई पहा लीलया
तसाच भट्टींत अचूक झर्कन्.

आणि फुरफुरे भट्टी जैसी
हल सांवलीप्रकाश तैसा;
भालावरला रुमाल शुभ्र
जिरवुन घेई घाम जरासा.

यंत्रयुगांतिल नवनृत्याचा
स्थाणुभाव हा प्रगटे येथें ;
मनोज्ञ मुद्रा शिल्पित एक
संगमरवरी मांसामध्यें.

—अहा, कोळसेवाला काळा !
नव्या मनूंतिल गिरिधर पुतळा ! !

## न्हालेल्या जणुं गर्भवतीच्या

न्हालेल्या जणुं गर्भवतीच्य
सोज्ज्वळ मोहकतेनें बंदर—
मुंबापुरिचें उजळित येई
माघामधली प्रभात सुंदर.
सचेतनांचा हुरूप शीतल ;
अचेतनांचा वास कोंवळा ;
हवेंत जाती मिसळुनि दोन्ही !

पितात सारे गोड हिंवाळा

डोकीं अलगद घरें उचलती
काळोखाच्या उशीवरूनी ;

पिवळे हंडे भरून गवळी
कावड नेती, मान मोडुनी

नितळ न्याहारिस हिरवीं झाडें
काळा वायू हळूच घेती;

संथ बिलंदर लाटांमधुनी
सागर-पक्षी सूर्य वेंचती.

गंजदार, पांढऱ्या नि काळ्या
मिरवित रंगा अन् नारिंगी,

धक्क्यावरच्या अजून बोटी
साखरझोपेमधीं फिरंगी

कुठें धुराचा जळका परिमल,
गरम चहाचा पत्ती गंध;

कुठें डांबरी रस्त्यावरच्या
भुऱ्या शांततेचा निशिगंध

ह्या सृष्टीच्या निवांत पोटीं
परंतु लपली सैरावैरा

अजस्र धांदल, क्षणांत देइल
जिवंततेचें अर्घ्य भास्करा

थांब ! जरासा वळ, तोंवरी—
अचेतनांचा वास कोंवळा;
सचेतनांचा हुरूप शीतल;

उरे घोटभर गोड हिंवाळा !

## मनास पडलीं जर खिंडारें

मनास पडलीं जर खिंडारें
भकास, थापा गाळ भीतिचा;
अन् धमन्यांतिल धारांवरती
बर्फ रचा मग जनरीतीचा.

अंधाराचा धाक उदंड;
काळोखाची हांक अकल्पित;

ओल्या जिवणेमधलि पाणी—
पळविल ऐशी रात्र अशिल्पित.

भयाणतेच्या बुरुजावरुनी
यइल केव्हां शीळ अनामिक;
गिळा तिला अन् मंत्र आठवा
मनांतल्या पण मनांत, लौकिक :

—" सह नौ टरकूतु !
सह वीर्यं डरवावहै ! "

# कृष्ण बलवंत निकुंब

( १९२०- )

## कशी येशील ?

शिरीं बिंदी बांधून मालतीची
रचुनि मवा, केवडा केशपाशीं,
सोनचांफ्याच्या कळ्या दोन कानीं
कांचनाच्या कुंडला लाजवीती !
आणि गजरे मणिबंधिं मोगरीचे
चमेलीची त्यांतही बाहुभूषा.
गुलाबांची घालून गळां माला—
येशि उधळित निशिगंध-पारिजात !
परी लेउनियां असा पुष्पसाज
नको येऊं मम गृहीं गंध-राणी !

उषा शिकवी पांखरां वेद-सूक्तें,
झरा गुणगुणतो प्रीति-मंत्र दिव्य,
बालकांच्या शब्दांत काव्य न्यारें
बोल रमणींचे—राग-रागिण्या त्या !—
काव्य-सुंदरता सकल यांतली ही
तुझ्या दडलेली गायिके! गळयांत.

आणि सोनेरी स्वर तुझा तशांत!
नवल नाहीं!–जग डुले गीत-रंगीं.
परी आलापित अशीं भाव-गाणीं
नको येऊं मम गृहीं गीत-राणी!

चांदण्याचें ल्यालीस शुभ्र वस्त्र
आणि त्यांतहि जरतार तारकांची !
स्निग्ध भालीं रेखीव चंद्रकोर
चंद्रकांताचे गळां रम्य हार!
पदीं पैंजण चंदेर तुषारांचे
तुझ्या श्वासें अन् फुलत रातराणी.
देत ललकारी चालला चकोर:
" येई ज्योत्स्ना ही–हिला वाट द्या हो!"
परी लेउनियां विभव हें रुपेरी
नको येऊं मम गृहीं चांद-राणी!

क्षणीं उजळावी कृष्ण मेघमाला–
क्षणीं धरणीवर वीज कोसळावी!
लोळ तेजाचा उठावा प्रचंड
दिपुन आणिक जावेत विश्व-नेत्र.
आणि तेजोगर्भातुनी तशा त्या
–यज्ञकुंडांतुन द्रौपदी निघाली–
तसें–अंगीं यावेंस लेउनी तूं–
अग्निसुमनें, भूषणें दिव्य कांहीं.
येइ ओजस्विनि! मुक्त गृह तुला हें
बैस जाउन निःशंक अंतरांत!!

## हळूहळू येई रात

हळू हळू येई रात दुनियेच्या महालांत
काजळाया लागले नी नभ–गिरि–भात-शेत
छाया भंगल्या वाटाची नदींतल्या जळांतली
गेली पुसून, पडतां काळ्या रात्रीची साऊली!

रानगवताचा वास उग्र हवेंत पांगला
सारें निश्चळ जाहलें मंद वाराही थांबला
एखादाच रातकिडा हळू किरकिरूं लागे
काजव्याची चमचम पलीकडे जाळीमागें-!

गहींवरून आंतून आले भावनांचे कढ
लोचनांची आपोआप आणि ओलावली कड!...

## जीवनरेषा

तुझ्या नि माझ्या जीवनरेषा
परस्परांना भिडल्या येउन—
आणि वाटलें : वाट चालणें
करांमधीं कर गुंफुन येथुन!

परस्परांना ओलांडुन परि
जीवनरेषा गेल्या अपुल्या-
आशा विद्युल्लतेपरी अन्
क्षण दिपवुनियां, क्षणांत विरल्या!

मात्र सुवर्णक्षणिं त्या एका
उजळुन गेलें अवघें जीवन
शतजन्मांतिल पुण्य-पयाचा
सेक जाहला वा स्वर्गातुन

आणि संगमस्थलिं त्या आपण
स्मृतिस्तंभ उत्तुंग उभविला
दिव्य मीलनोत्सव अपुला अन्
तेथ शिलालेखांत कोरला....

—आतां कधिं निजमार्गे चालतां
शिणुनी रेंगाळतां पाउलें
शिलालेख तो फिरुनि वाचणें...
—जीवन झालें हेंच आपुलें!

# वर्षा

[ मुक्तच्छंद ]

येई वर्षादेवी !

विजेचें नर्तन, मेघांचें गर्जन,
मृद्‌गंध, विशाल समृद्ध शेतें,
अमृत-वर्षाव सांगातीं घेऊन
येई वर्षादेवी !

"वसंत, वसंत ! ऋतुराज ! श्रेष्ठ !"
म्हणत नाचलों–
आजपर्यंत
आम्ही वेडे कवि
परंपरेचे अंधपूजक !
संकेतांचे बळी !
–करून घेतली वंचना स्वतांची
जाणूनबुजून !
आणिक घडलें जन-वंचनहि
ह्यातून आमुच्या.
–आम्हीच कारण तुझ्या उपेक्षेला
हे वर्षादेवी !
–गुन्हेगार आम्ही !
क्षमस्व, क्षमस्व !

–आजपर्यंत
कधींच नव्हतें ऐकिलें काय
आम्ही तें तुझें
जीवनदायी घन-गर्जित ?
तरीहि आम्ही म्हणत राहिलों,
"कुहू कुहू कुहू...
कुहू कुहू कुहू..."
पंचम गोड तो !

काळ्या मेघांवर आरूढ होऊन
मृगदेवानें
टाकिली जेधवां पहिली चूळ
नव्या अमृताची
—थरारून गेली 'गंधवती पृथ्वी'
आणिक सोडिले
सहर्ष तियेनें सुगंधी निःश्वास
कृतकृत्यतेचे,
समाधानाचे !
कितिकदां तरी सेविला होता
आम्ही तो सुगंध,
—आगामी समृद्ध, तृप्त जीवनाचा
अग्रगामी दूत !
तरीहि गातच राहिलों गायनें
आम्ही वासंतिक पुष्पसंभाराचीं,
परिमळाचीं !

तुझें संजीवक
पाचूंचें वैभव—
नित्य पाहूनहि
आम्हीं उभविलीं गुढ्या-तोरणें
चैत्रपालवींचीं
आणि स्वप्राणानें
हर्षनाद केला :
"वसंत आला !"

भरूनी जीवन आकाशपात्रांत
सहस्रधारांनीं
आरंभिला तूं अभिषेक जेव्हां
प्रतिमेवरती वसुंधरेच्या—
तीर्थजलानें त्या
सरिता, ओहळ ओसंडूं लागले
विजयोर्मींपरी यौवनांतल्या !

दुर्दम्य, जिवंत, भव्य आकांक्षांचें
तसलें प्रतीक नित्य पाहूनिहि
मोहिनी मात्र पडली आम्हां
संथ वासंतिक पुष्करिणींची!

जीवन-देवते!
जाणीव आज हो आमुच्या गुन्ह्याची
क्षमस्व, क्षमस्व!
'वसंत, वसंत' म्हणून तेव्हां
कलाविलासाचा केला बाडिवार–
'जीवन-कले'ची प्रतीति मात्र
तुझ्या रूपांतून लाभते आज!
येथून आम्ही
सदैव पूजूं
तुझीच–तुझीच समृद्ध कूस.
–उमजलें आतां तूंच अन्नपूर्णा!

येई अन्नपूर्णे!
उदात्त भावांनीं भरून गेलेल्या हृदयापरी
भरून येऊं दे आकाशाचा ऊर
मंथर, सजल मेघमालिकांनीं!
वीर पुरुषाच्या
दीप्त, ऊर्जस्वल जयध्वनीपरी कडाडूं दे वीज!
सर्वत्र वर्षूं दे अमृताच्या धारा
चौफेर सुटूं दे मातीचा सुवास
वाहूं दे जीवन नद्यांत दुथडी
भिडवीं क्षितिजा विनम्र शेतें
अनंत, सतेज, हिरव्या छटांनीं
निववीं डोळे!
इकडे-तिकडे
चोहींकडे फुलो उदंड, अमूप समृद्धि केवळ!

होतांच समूर्त वरदान तुझें
गहींवर उरीं दाटून जन

तुजला आपुल्या
उत्स्फूर्त, कृतज्ञ, स्निग्ध भावनांनीं
गौरवितील !
म्हणतील आणि कृतार्थतेनें,
यथार्थतेनें,
" वंदे मातरम्
सुजलां, सुफलां, सस्यश्यामलाम्
वंदे मातरम् ! "

## शांता ज. शेळके

( १९२१-     )

### रे चुकलेल्या वाटसरा !

रे चुकलेल्या वाटसरा !
घेईं विसावा येथें घडिभर, जा नंतर आपुल्या घरा !

रखरखली ही दुपार तापुन
भीषण मृगजळ करितें रणरण
वैराणांतुन अशा कापिसी वाट आपुली भराभरा.

चर्येवरचें सुकलें मार्दव
नयनींचें हो उदास लाघव
मूर्ति अशी तव श्रांत पाहुनी भाव नवे बिलगती उरा.

इकडे तिकडे टकमक बघसी,
कसलासा मागोवा घेसी
'स्नेहल छाया मिळेल कोठें ?' प्रश्न हाच का मुशाफिरा ?

माझ्या सदनीं ये सखया तर,
घेईं विसांवा येथें घडिभर,
निरर्थ कांहीं कुजबुज करुनी गूज मनींचें खोल जरा.

तुडुंब भरल येथें जीवन,
दिसानुदिस तें जाई वाहुन
तृषा शमावी कुणाची तरी यास्तव हा तळमळे झरा !

गात्रें भरतां नवचैतन्यें,
खुशाल अपुल्या जा वाटेनें
भरल्या डोळां निरोप देइन, नाभिं येतां पहिली तारा !

येइल जेव्हां श्यामल रजनी,
सुखें तेधवां जा निजसदनीं.
नीज सखीच्या करपाशामधिं, हर्षच मजला त्यांत पुरा.

या घटकेची गोड आठवण
फुलविल माझें नीरस जीवन !
एकांताच्या वेलीवरतीं स्वप्नांचा बहरेल तुरा !

## बारव

खोल खोल आहे भारी
माझ्या मनाची बारव
फसाल हो, जाऊं नका
बघावया तिचा ठाव

संथ गूढ निळें पाणी
जरी हेलावतें वरी
कुणा ठावें, असताल-
क्रूर तळाशीं मगरी

ओथंबलें जरी आहे
तृण कांठाशीं कोवळें
तळीं चरणा बांधील
दुष्ट कमळाचें जाळें !

माझ्या मनाची बारव
हिचें जळ रुचकर

बारव : दगडानें बांधून काढलेला चौकोनी जलाशय

नयनांना तोषविती
पृष्ठीं लहरी सुंदर

येतां वाऱ्याची झुळूक
जळ हर्षून थरारे
चोंच लावुनीयां जाती
कधीं गोजिरीं पांखरें

मुग्ध भावनागौळणी
येती घेऊन घागरी
निळ्या जळाचा या अंश
नेती वाहुनीयां शिरीं

पुष्ट विकारांचे गाप
कधीं जळांत डुंबती
कधीं कल्पनाबालकें
जळ ओठानें चुंबिती

निळ्या गूढ आकाशाचें
कधीं पडे प्रतिबिंब
कधीं हितगुज करी
शेजारचा कडूलिंब

नानापरींची चालते
अंतरंगीं खळबळ
जरी माझ्या बारवेच
वर संथ दिसे जळ

खोलखोल आहे भारी
माझ्या मनाची बारव
फसाल हो जाऊं नका
बघावया तळठाव !

# श्री कृष्ण पोवळे

( १९२१-    )

## बुतशिकन

गराडा दिला नास्तिकांनीं पहा
देवालयाला तुझ्या ईश्वरा.
हंड्या नि हीं झुंबरें फोडिला
नीरांजनें दीप लाथाडिलें.

अलंकार कोणी तुझे काढिले
वस्त्रें कुणी फाडिलीं रेशमी
कुणी तोडिल्या पुष्पमाळा तुझ्या
विध्वंसिली पार पूजा पहा !

तुझे मत्लबी भक्त खुष्मस्करे
पळाले कुठें मोक्ष शोधावया ?
किंवा कळे त्यांस आतांच वा
कुठेंही पहा जा असे ईश्वर ?

किती चालला गल्बला गोंधळ
मुखानें शिव्याशाप देती तुला
कुणी नास्तिकांचा सजे अग्रणी
फोडावयाला तुझे मस्तक.

उद्गारला तो, " अरे फत्तरा,
भुकेनें जळालीं पहा आंतडीं;
तुला निर्जिवाला परंतु हवी
दीपारती, शेज, नैवेद्यही.

स्वतःला जगाचा प्रभू मानिसी,
परी भक्तिची चाड    हीं तुला.
स्वतःचा करी जीव कुर्बान जो
जनांकारणें, ईश तो आमुचा !

अरे, भक्तिचें रक्त तूं प्राशिलें
मनें त्यामुळें जाहलीं दुर्बळ.
तुझ्यासारखे जाहलों आंधळे
खुळे, दैववादी नि कर्मच्युत.

पुरे जाहलें सर्व थोतांड हें
असूं आमुचे ईश आम्ही स्वतः
न थारा तुला यापुढें भूवरी
नको नश्वरांना कुणी ईश्वर.

पृथ्वी दरिद्री अतां सोडुनी
जा मोक्ष शोधावयाला दुरी,
मूर्तामधोनी अमूर्तामधें
जाण्यास घे घाव शीर्षावरी!"

## वारूळ

वारूळ वारूळ
मुंग्यांचें वारूळ
कृमीकीटकांनीं
बांधिलें देऊळ.
मृत्तिकेचे कण
एकेक घेऊन
स्वतंत्र, दुर्गम
बांधिलें भुवन.

तुफान वाऱ्याला
ऊनपावसाला
द्यावया आव्हान
बांधिलें कष्टून.
आणि कण कण
जमविलें अन्न
कष्टाळू, भंगूर
क्षणायू जीवन.

परंतु जीवांनो,
तुम्ही वारुळांत
जीवनाचें सुख
आहांत भोगीत.
असेल लाभत
मायेचा उबारा
आणिक संकटीं
मित्रांचा निवारा.

स्वातंत्र्याचे वारे
तुम्ही सेवणारे
तुम्हां कोण म्हणे
'दुर्बळ बिचारे!'
तुमच्या मनाचे
तुम्ही मुखत्यार
वारुळांत तुम्ही
स्वतःच ईश्वर.

वारुळांत नस
शत्रूंना प्रवेश
सत्कारार्थ त्यांच्या
लक्षावधी दंश.
परी कधीं येतां
सर्पांचें संकट
दुर्बळांना येई
सामर्थ्य अफाट!

कोट्यावधी जीव
पडती तुटून
लक्षावधी जीव
जाती चिरडून.
स्वातंत्र्याचें अंगीं
संचरोनी वारें

हटविती अंतीं
सर्पांना माघारे.

## रुबाया

सुख आहे कोठें ? बघ शोधून जगांत.
सुख आहे कोठें ? बघ शोधून नभांत.
सुख मिळेल होउन काय गुंग मद्यांत ?
सुख मिळेल तुजला त्यागानें जळण्यांत.

✕

कां पापापुण्याची तुज वाटे भीती,
जर कर्म आपुल्या नाहीं मुळिंही हातीं ?
सैतान कुणी जो घेत कर्म करवून,
तें पापपुण्य बा ! बसेल त्याच्या माथीं.

✕

मधुप्याला जर मिळता प्रत्येकास,
हिमगौरी जर मिळती सहशय्येस,
आणि मृत्युचें भय नसतें जीवांना,
ईशकल्पना तर सुचती न कुणास.

✕

सत्य असो वा न असो, केवळ माझ्याकरितां
जीवन हें, वायूवर शर धांवे सळसळता
कुठुनी आला नकळे, कोठें जाणे न कळे
सळसळणें जीवन हें—केवळ हें—हेंच कळे.

# त्रि. म. कुलकर्णी

( १९१७-      )

## नवें पाणी !

[ जाति माधवकरणी ]

आलें नवें नवें पाणी !
उसळत, घुसळत, फेंसाळत जळ धांवे दाहि दिशांनीं !

ग्रीष्म संपतां, मृगापरी ‘ मृग ’ धांवत हा आला
घेउनी मेघांच्या माला—
कलाबतूची वीज चमकते ज्यांवर थरथरुनी.
आलें नवें नवें पाणी !

उदासवाणी पाहुनी अवनी वरुणा ये कणव
कृपेचा करि तो वर्षाव
कोसळलें जळ वरुनि पृथ्विवर धाराधारांनीं
आलें नवें नवें पाणी !

तप्त गिरीवर, तप्त दरीवर शिडकावा होतां
तोषली वसुंधरामाता
समाधान-उद्गार बोलती सुगंध मातींतुनी !
आलें नवें नवें पाणी !

नदिनाल्यांना पूर लोटला तुडुंब चाले जल
तयाची अवखळ हो खळ्खळ
दुथडी भरल्या गोकुळांतल्या ‘ त्या ’ यमुनेवाणी !
आलें नवें नवें पाणी !

हें नवजीवन हें संजीवन ये इहलोकांत
नवतिची नवी ऋचा गात
मृत्युलोकची कळा पालटे, पृथिवी हो तरुणी !
आलें नवें नवें पाणी !

(चुलीला दगड मिळतील तेथें-
नकोत ते घ्याया बांधूनियां संगें!!-)
घोड्याशेजारून संसारामागून रस्ता हुंगत हीं
धापा टाकणारीं चाललीं कुतरीं

—चालला चालला लमाणांचा तांडा
घोड्याशेजारून संसारामागून चालले बापई! चालल्या बायका
असंस्कृत मुद्रा... दीनवाण्या मुद्रा...अगतिक मुद्रा...
कटिखांद्यावरी यांच्याही लादलें 'संसाराचें ओझें.'
पहा पाठीवरी बांधलीं बोचकीं,
पहा काठीवरी आणखीही कांहीं
उरलासुरला बांधला संसार.

चालला चालला लमाणांचा तांडा...
आणि तांड्यांतील, पाहिलीत का ती एक लमाणीण?
ओझ्यानें अगदीं वांकली आहे, थकली आहे.
तिच्या खांद्यावर, तिच्या काठीवर
जड जड सारं गुळाचें गाठोडें, देवाचें गाठोडें बांधलें आहे.
—परी काठीच्या त्या एका टोकाला अन्
राघूचा पिंजरा बांधला आहे...
जीवानें जपल्या मायेनें पोसल्या राघूचा पिंजरा बांधला आहे...
अस्थिर संसारीं विकीर्ण जीवन
त्यांत एकली ही कोमलता-खूण!
—ओझ्यानें वांकल्या लमाणाच्या स्त्रीनें
डोळ्यांपुढें येई अशा रीतीनें हा बांधला पिंजरा.
-तेवढीच तिच्या आत्म्याची ओळख...
मनाचें भोजन
तेवढीच तिच्या लमाणजातीच्या
मानव्याची खूण!!

-चालला चालला लमाणांचा तांडा
एका गांवाहून दुजा गांवाला...

किल्मिष, कंटक, चिखल मातला पात्राच्या पोटीं
तयाला जळ हें देइ गती !
समतेची जणुं लाल ध्वजा ही राही फडफडुनी !
आलें नवें नवें पाणी !

पायदळींचीं दडलीं बीजें येतिल तरतरुनी
धुमारे तणांरेहि फुटुनी
' सस्यश्यामला सुजला सुफला ' होइल हो धरणी !
आलें नवें नवें पाणी !

उसळत, घुसळत, फेंसाळत जळ धांवे दाहि दिशांनीं
आलें नवें नवें पाणी !

## लमाणांचा तांडा

[ मुक्तच्छंद ]

—चालला चालला लमाणांचा तांडा
एका गांवाहून दुजा गांवाला.
संपलीं येथलीं उसाचीं गुऱ्हाळें, संपला येथला अन्नाचा शेर.
आतां दुजें गांव !
आतां दुजा मळा ! !
चला पाहूं चला…
नवीन चाकरी, नवीन भाकरी !

—चालला चालला लमाणांचा तांडा
पाठीवरी सारें घेउनी बिऱ्हाड
मरतुकडीं हीं खंगलेलीं घोडीं
खंगलेले बैल…
यांच्या पाठीवर देखा हा संसार :
चार वितींचीं तीं उभवाया घरें घेतल्या चटया,
घेतलें खाटलें, (त्यांचा हा पलंग ) घेतलीं गाठोडीं,
घोड्याच्या पाठीशीं उलटें खाटलें अन् त्यांत घातलें रांगतें मूल !
घेतलीं गाडगीं, मडकीं, डबडीं,

(चुलीला दगड मिळतील तेथें–
नकोत ते घ्याया बांधूनियां संगें!!–)
घोड्याशेजारून संसारामागून रस्ता हुंगत हीं
धापा टाकणारीं चाललीं कुतरीं

—चालला चालला लमाणांचा तांडा
घोड्याशेजारून संसारामागून चालले बापई! चालल्या बायका!
असंस्कृत मुद्रा... दीनवाण्या मुद्रा...अगतिक मुद्रा...
कटिखांद्यावरी यांच्याही लादलें 'संसाराचें ओझें.'
पहा पाठीवरी बांधलीं बोचकीं,
पहा काठीवरी आणखीही कांहीं
उरलासुरला बांधला संसार.

चालला चालला लमाणांचा तांडा...
आणि तांड्यांतील, पाहिलीत का ती एक लमाणीण?
ओझ्यानें अगदीं वांकली आहे, थकली आहे.
तिच्या खांद्यावर, तिच्या काठीवर
जड जड सारें गुळाचें गाठोडें, देवाचें गाठोडें बांधलें आहे.
—परी काठीच्या त्या एका टोकाला अन्
राघूचा पिंजरा बांधला आहे...
जीवानें जपल्या मायेनें पोसल्या राघूचा पिंजरा बांधला आहे...
अस्थिर संसारीं विकीर्ण जीवन
त्यांत एकली ही कोमलता-खूण!
—ओझ्यानें वांकल्या लमाणाच्या स्त्रीनें
डोळ्यांपुढें येई अशा रीतीनें हा बांधला पिंजरा.
-तेवढीच तिच्या आत्म्याची ओळख...
मनाचें भोजन
तेवढीच तिच्या लमाणजातीच्या
मानव्याची खूण!!

-चालला चालला लमाणांचा तांडा
एका गांवाहून दुजा गांवाला...

वि. म. कुलकर्णी

## अपशकुनी

[ पद्मावर्तनी मुक्तच्छंद ]

—आणि पुण्याच्या नव्या पुलावर
फिरावयाला पहिल्या प्रहरीं
जातां, बसलों आनंदानें त्या दगडांच्या कठड्यावरती.
नदींत कोणी करितो स्नान,
कुणी टाकुनी बसला जाळें
पकडायाला मासे थोडे.

—मधुर धुक्यामधिं धूर मिसळतो...
निघते गाडी मुंबईकडेऽ उत्साहाची वाजत शीट
जणूं कुणी कन्यका निघाली, घाइघाइनें कॉलेजाला.
'देहू' 'खडकी' मनांत घोळत सायकलीवर डबे निघाले
नरम गरम आंतल्या हवेनें !

—मी बसलेलों नव्या पुलावर—
मन माझें त्या हवेंत न्हात उत्साहानें गाणें गात—

—तितक्यामध्यें धडपड, खुसखुस ऐकूं ये पाठच्या बाजूला
वळून पाहतां कमानीमध्यें धडपडणारें तडफडणारें
घुबडाचें पिलुं दिसलें मजला

—अतां संपला त्याचा 'दिवस'
डोळे त्याचे अतां जायचे !
निराधार निर्वासित पोर—
टकाटकां मजकडे पाहतें
भिडवित डोळ्यालागीं डोळा;
शरणार्थीचा नयनीं भाव
—कपोत जैसा शिबीपुढें त्या—
बावरलेले डोळे त्याचे !!
झटकन् मी पण मान वळविली
अपशकुनी हें नकोच दर्शन...
दिवसच माझा वाइट जाइल...
रामप्रहर हा! रामप्रहर हा !...

—परंतु, त्या, त्या नयनांमधला
भाव निरागस करुण कोवळा
कुणासारखा तरी वाटला

—आणिक चटकन् आठव आला
—रुग्ण, जर्जरित मम बाळाच्या त्या नयनांचा
—करुण, अबल, मृदु त्या नयनांचा
—'कडेवरी घ्या, घ्या' म्हणणाऱ्या त्या नयनांचा...
उठलों...
उठला, वाटत
पिलास घ्यावें कुरवाळाव
कुशींत घ्यावें
पुन्हां आणखी मान वळविली—

—पण तें गेलें होतें तेथुन
बहुधा ऐसें म्हणत मनाशीं,
'अपशकुन्याचें, या पाप्याचें, या जंतूचें
नकोच दंशन, नकोच दर्शन!'

## मा ध व   कृ ष्ण   पा र धी

(१९२०–    )

### तुले पाहून

उन्हाऱ्यांत तडकली माती जसी मिर्गानं
  तुले पाहुन माहा मन गेलं तसं ईरूनं[१]
घमघमाट सुटे तंहि साऱ्या वावरामन्धी
  हिर्यातं[२] माह्याबी तसी भरे गे गुंगी
जोंधऱ्याचे पानं ससंरा वाजति वाऱ्यानं
  जनु माहाच हिर्दं हुरहुरलं तुह्या नखऱ्यानं
  कापल्या गवताचं पान टाकते मान
  आन् गडीभऱ्यानं जाते तसच वारुन
  माहा नोको जिव्हारा टाकू तसा तोडुन

टीप : १ विरून. २ हबक्यांत.

पाहे ह्याच इऱ्यानं[3] हिर्द माह्रा चीरून
तुले पाहुन माह्रा मन गेलं कसं ईरून !

वावरात कनूसं फुलावर आले भरून
माह्या मनचा वार ह्या नोको टाकू झाडून
ये येथं मऱ्यावर बसू गोफनी-दोऱ्या
घेऊन; मजेत ललकारू ' होऱ्या होऽऱ्यॉ[4] '
तहि पडल कानावर पाखराइची किलबील
आपन करत बसू मंग गोष्टी गुलगूल
तू माह्या जिवाची मैना, मी तुह्रा राघू;
पिरमानं गऱ्याले गरा[5] देऊन बघू ;
चोचीले चोच लावून गानं कुजवूजू :
पिरमाचं पाखरू नोको सोडु रानोरान
तुले पाहुन माह्रा मन गेलं सारं ईरून

३ विळ्यानें, कोयत्यानें. ४ पाखरें उडवायला दिलेली विशिष्ट ललकारी.
५ ' गऱ्याले गरा देऊन ' –एकमेकांच्या सुराशीं सूर मिळवून.

## ग णे श दि गं ब र मा ड गू ळ क र

( १९१९– )

### जोगिया

कोऱ्यांत झोपली सतार, सरला रंग,
पसरलीं पैंजणें सैल टाकुनी अंग,
दुमडला गालिचा, तक्के झुकले खालीं
तबकांत राहिले देठ, लवंगा, साली.

झुंबरीं निळ्या दीपांत ताठली वीज
कां तुला कंचनी, अजुनी नाहीं नीज ?
थांबले रसिकजन होते ज्याच्यासाठीं
तें डावलुनी तूं दार दडपिलें पाठीं.

हळुवार नखलिशी पुनः मुलायम पान,
निरखिसी कुसर वर कलती करुनी मान

गुणगुणसि काय तें ?– गौर नितळ तव कंठीं—
स्वरवेल थरथरे, फूल उमलतें ओठीं.

साधतां विड्याचा घाट उमटली तान,
वर लवंग ठसतां होसि कशी बेभान ?
चित्रांत रेखितां चित्र बोललें ऐनें,
" कां नीर लोचनीं आज तुझ्या ग, मैने ? "

त्या अधरफुलांचे ओले मृदुल पराग—
हालले, साधला भावस्वरांचा योग.
घमघमे जोगिया दंवांत भिजुनी गातां
पाण्यांत तरंगे अभंग वेडी गाथा.

" मी देह विकुनियां मागुन घेतें मोल,
जगवितें प्राण हे ओपुनिया ' अनमोल, '
रक्तांत रुजविल्या भांगेच्या मी बागा,
ना पवित्र देहीं तिळाएवढी जागा.

शोधीत एकदां घटकेचा विश्राम
भांगेंत पेरुनी तुळस परतला श्याम,
सांवळा तरुण तो खराच ग वनमाली
लावितें पान…तों निघून गेला खालीं.

अस्पष्ट स्मरे मज वेडा त्याचा भाव.
पुसलेंहि नाहीं मी मंगल त्याचें नांव;
बोलला हळू तो दबकत नवख्यावाणी
' मम प्रीती आहे जडली तुजवर राणी ! '

नीतिचा उघडिला खुला जिथें व्यापार
बावळा तिथें या इष्कां गणितों प्यार ;
हासून म्हणाल्यें, ' दाम वाढवा थोडा…
या पुन्हा, पान घ्या… ', निघून गेला वेडा !

राहिलें चुन्याचें बोट, थांबला हात,
जाणिली नाहिं मी थोर तयाची प्रीत,
पुनःपुन्हा धुंडितें अंतर आतां त्याला
तो कशास येइल भलत्या व्यापाराला ?

तो हाच दिवस हो, हीच तिथी, ही रात,
ही अशीच होतें बसलें परि रतिक्लांत,
वळुनी न पाहतां, कांपित अंधाराला
तो तारा तुटतो-तसा खालतीं गेला.

हा विडा घडवुनी करितें त्याचें ध्यान,
त्या खुळया प्रीतिचा खुळाच हा सन्मान;
ही तिथी पाळितें व्रतस्थ राखुनि अंगें
वर्षांत एकदा असा ' जोगिया ' रंगे. "

## जत्रेच्या रात्रीं

दुणावून लय स्वरांत चढत्या शिरले सुरते गडी,
सुरावट भाषेहुन रांगडी.
डफदिमड्यांचीं गरम जाहलीं कडाडुनी कातडीं,
पुढें ये सोंगाड्या सोंगडी.
शीळ चढवुनी केली त्यानें कल्लोळावर कडी,
उडविली सुरत्यांची वावडी.
झरझरा उतरली वाद्यांची ती लय,
पोचला शिगेला श्रोत्यांचा विस्मय,
वाजले चाळ अन् तालावर थकूथय,
कंवर लचकत येइ छोकरी छेलाटी गुलछडी
अंगलट भुवईसम वाकडी.

झडल्या टाळया, शिट्या, अरोळया; वर चवल्यांच्या झडी ;
स्वीकरी मुजऱ्यासह फाकडी.
हिरवें पात्तळ, हिरवी चोळी, वरी चमकते खडी,
छातिवर मोत्यांच्या दुल्लडी.
नथणीखालीं हलूं लागली अधराची लालडी.
वाहिली रसगंगा दोथडीं.
कुणि गालावरच्या खळींत बसले दडून्
कुणि ओठ चाविले, आपुलेच कडकडून्,
कुणि पदरामागिल करवंदें घे खुडून्,

खमिजावरि तों कुणी ठसविली तिच्या चोळिची खडी
कुणीतरि कातरली काकडी.

स्वप्न समोरी, स्वप्न अंतरीं, रतले, भुलले गडी,
चालली घडीमागुती घडी.
नाहिं उमगलें घुसल्या केव्हां जत्रेच्या झुंबडी,
बाजुची कनात हो ऊघडी.
मधेंच आली मधीं चांदणी शुक्राची चोंबडी,
रेकलीं वेड्यापरि कोंबडीं.
जाहले पुसट तों वेळूवरचे दिवे,
ती इष्कबाजिची ज्योतीही मालवे,
जागींच राहिले बसुन जनांचे थवे,
कशी संपली रात कळेना इतक्यांतच तोकडी,
रिचवितां ताडीच्या कावडी.

# य शवं त द त्ता त्र य भा वे

( १९११- )

## विवस्त्र पांचाली

भव्य गिरणींत—
गिरकी फिरकी लहान मोठ्या
पोलादी चक्रांची.
विजेची शक्ति
मिचकाविते बाजारी नेत्र.
कळ दाबतां बिजली नाचे
धोट्यांवरती;
आणि ते विणती
वस्त्रें गरती
शीग जयांची चुंबिते आढ्याला भव्य गिरणीच्या

पण बाहेर—

य. द. भावे

दांत विचकीत होती हांसत
काळी काळी रात;
काळाकुट्ट पक्षी अणकुचीदार
फाळ खुपशीत
होता उडवीत
रक्ताचें कारंजें...
मानवी मनाच्या जखमेंतून
आर्त आक्रंदन—
" भीष्म द्रोण कृप
अर्थाचे दास
विवस्त्र पांचाली !
विवस्त्र पांचाली ! ! "

## रेशमी मोहोर

सफ्फरचंदी गाल जियेचे,
आणि नाचते नेत्रजलावर
पाड लागल्या आम्रफळांची
सतेजता अन् आतुरता.

ऐशी कोणी सहज पाहिली
आणि लागला मन-आम्राला—
इकडे तिकडे आसुसलेला
घवघवणारा रेशमी मोहोर.

## आर्द्रा

मुखावरची डाळिंबी दीप्ति
उणेपणा देते उषा-संध्या-रंगा
अशी तेजस्विनी
कोमला प्रेमला

उज्ज्वला बाला
सुहासिनी आर्द्रा !

×

जन्मापासून स्थलकालाच्या
विश्वावकाशाची व्योमसागराची
चिरप्रवासिनी
तेजस्विनी आर्द्रा
वल्हवे एकाकी आपली नौका
चकाकणारी शांतरत्नतेजें.
चालली चालली
स्थिर ध्रुवाकडे
हसतमुखी प्रवासिनी आर्द्रा !
प्रवासांत तिच्या
चालूं लागलेला उलटा सुलटा
बुद्धीचा स्वामी
वक्र गतीनें येतां निकट
क्रोधाग्नि पेटतो तिच्या अंतरांत
ती हसतमुखी
कोमला बाला
होते चटकन् वन्हिशिखारूप.
प्रळयकाळची नाचते बिजली
आणि सर्वत्र रक्ताचीं कारंजीं !

×

प्रवासांत तिच्या—
फडफडवीत
डौलानें आपुल्या नौकांचीं शीडें
सृजनतत्त्वाचे रे हाडवैरी
लागती पाठीं
बुडविण्यासाठीं
हिमापरि शुभ्र सृजनतत्त्वाच्या शुभ पित्याला
आणि तो भाकतो अर्धबुडलेला

दीन करुणा रुद्ध कंठानें—
"करि रक्षण ! !"
देते ती आश्रय त्याला दीनाला
आपल्या नौकेंत.
आणि ती कोमला हसतमुखी
होते चामुंडा.
स्वाहा करिते शुभाशुभांना
सृजनतत्त्वाच्या हाडवैऱ्यांना.
मुक्त शुभ पिता हांसतो पुन्हां
कुंदधवल !

×

प्रवासांत तिच्या—
कधीं केव्हां तरी भास होतो तिला
प्रेमला बालेला—
व्योमरंगापरि शांत रम्य शांत
चैतन्यस्वरूपी
श्यामप्रेममूर्ति
वाजवी वीणा…
आल्हादते ती आणि सजविते
अवकाशाला
इंद्रधनुष्यांच्या रंगीबेरंगी मृदु छटांनीं
आणि वर्षते ती
जीवनधारा
कोमला प्रेमला प्रवासिनी आर्द्रा ! !

# श्री नि वा स पा ट ण क र

(१९१५–१९३६)

## विसरलेली ओळख

नयनांच्या तव शांत सागरीं लहर विहरते निळी
खुले मम हृदयीं कोमल कळी
आनंदाचा नाच चालला नाजुक लहरींसवें
कळींतुन कुसुम विकसलें नवें
हृदया लागे कसलीशी मग गोड ओढ अंतरीं
नजर तव जादू कां मंतरी
उन्मादानें कुसुम उडालें देठांपासुन वरी
बुडालें शांत नील सागरीं
आतां तर तें तरतें तुझिया नाजुक नजरेवरी
तयाला तूंच कसें सावरीं
तव नयनांतिल तरल तरंगीं फिरतां फिरतां मला
कशाचें भान नुरे आजला,
चंद्रदर्शनें प्रेमसागरा भरती येईलना
सुखानें घ्याया आंदोलना
खडकावरतीं मला न देई लाटेवर लोटुनी
रमूं दे प्रेमळ आंदोलनीं
प्रेमभरें हृत्कुसुम अर्पितों एक आस अंतरीं
तरावें प्रेमप्रवाहावरी
तरत तरत तें अविरत जावें अनाद्यंत अंतरीं
न लागो तीरच कल्पांतरीं

# सौ. शालिनी सोमण

( १९१५-    )

## पाणी ओढतांना

पाणी ओढतांना आली
वर अर्धीच घागर
दूर देशाहून कोण
येणार का मुशाफीर ?

चुलीमध्यें अवचीत
फुरफुरे जाळ आज
कोण अतिथि येणार
मुळीं येईना अंदाज !

आणि तव्यावर फुगे
भाकरी ही तरारून
पाहुण्यांच्या पावलांची
हिला कळली का खूण ?

वाढतांना आमटींत
पळी पालथी कां येई ?
पाहुण्याचें आगमन
मातें सुचवून देई ?

झाडावर बसुनियां
काक करी कावकाव
आहे माहीत का याला
पाहुण्याचें नांवगांव ?

पाळण्यांत फार वेळ
लागे बाळा गाढ नीज
बघावया बाळराजा
येणार का मामा आज ?

# मनमोहन [मनमोहन नातू]

(१९११-    )

## फरारी

मी आईच्या कुसव्यामाजीं
पडलों होतों निर्भर हांसत
बंदिवान पण—बंदिवान पण—
तेव्हां मजला होतें वाटत.

आणि कोठल्या तरि वटकेला
आलों बाहिर विश्वामध्यें
क्षणभर हसलों—क्षणभर हसलों—
मला वाटलें, अफाट अंगण-
लाभे विश्वाचें नाचाया.

यौवन आलें जाणिव वेडावि
मग मज्जेचा झाला गुंता
गुंता सोडवितांना दुसरा
प्रज्ञेची लड टट्ट टट्ट तुटली.

पाहुं लागलों अफाटांत नी
अक्षांशांना रेखांशांना
स्वरूप आलें होतें भयकर
काटेरी ते तारा झाले.

आणि कैदि मी दुःखीकष्टी
शोधि फरारी झालेला यम
हजार मरणें रोज मनाचीं
कलाक चोविस मिरवी देहीं.

# श र च्चं द्र मु क्ति बो ध

( १९२१-      )

## आज कशानेंशी मला येईनाशी झाली झोप

आज कशानेंशी मला येईनाशी झाली झोप.
मध्यरजनी नितांत शांत झाली,
हळूहळू नदीमधें बडत्या कलशासम;
पावल्या विराम मधु गुजगोष्टी प्रेमिकांच्या;
झोपूनियां गेले सारे भुजबंधनांत सैल
एकमेकांचिया स्वस्थ.

अस्वस्थशा ओल्या उशा तळमळत्या स्तब्ध झाल्या
दुभंगले वेदनेनें प्राण तेही जरा-जरा
पिऊनीयां स्वप्नसुरा जड झाले, मेंगळले...
गस्तवाल्याची ती साद
उमटीत पडसाद—
घेत निरनिराळीं रूपें एकेकाच्या स्वप्नजगीं
तुडवल्या, दुखावल्या सत्यवचासम झाली लुप्त गाढ—
अंधारांत.

आतां तिनाचा सुमार;
आक्रमून रातोरात आकाशविस्तार भव्य
फिकट नी थकलेला प्रवासी उदास चंद्र
हळूहळू रेंगाळतो पहाड-उतारावर
लांबलांब झाल्या छाया,
बिलगली मला क्षीण चंद्रिकेची कृश काया;
आर्त टिटवीची साद—
टी ऽ ऽ अ टी ऽ ऽ अ कण्हणारी
मूक तक्रारीसमान मंद झाली आपोआप;
येत नाहीं मला झोप...

जागें झालें हृदयींचें उध्वस्त नगर आज
भंगल्या कमानीखालीं झाल्या गोळा—
इत्रेत छाया वासनांच्या,
गुदमरून मेलेल्या त्या गोजिरवाण्या आकांक्षांच्या,
कपाळांत पडूनियां नियतीची खोल खोक
कधींकाळीं वारलेल्या निर्दोषशा बालिकांच्या
श्वेत छाया भिंतींतून पुढें आल्या
हरपलें शोधीतशा
धुंडाळीत कायसेंसें
चांचपत जणूं कांहीं कोन्याकोपऱ्यामधून,
रिक्त कोनाड्यामधून,
सभोवतीं माझ्या सर्व गोळा झाल्या,
उशा-पायथ्याशीं उभ्या,
दोनही बाजूंस उभ्या.
थिजल्या उदास किंवा कोपल्या नजरा त्यांच्या
जणूं काय तापलेल्या सळयाच लाल लाल
कापीत कापीत ऊर खोल आरपार गेल्या !
मृतमूर्ती कवळाया हृदयांत खोल खोल आक्रंदन अनिवार
उसळलें, लाचारसें अधीरसें रडें झालें दुर्निवार···
दूरदूर जाणाऱ्या त्या प्रवाशासमान चंद्र
गला नजरेच्या पार,
शांतकाय, स्निग्ध निशा मंद श्वसे गारगार,

वेढलें बाजूंनीं चारी अनंत स्वप्नांनीं मला,
दिवसाच्या मृत्युक्षणीं नगर घेरावें जसें
गिरणींतून निघणाऱ्या धूम-अजगरांनीं तसें···
घेरलें, धरलें मला स्वप्न-अजगरांनीं तसें
···पुष्टसें कोळयाचें जाळें पसरलें विशालसें,
तयांत लोंबती माशा तडफडून, गुरफटून शेवटीं ज्या मृत झाल्या !

जाळयाच्या मागें तें काय ?
रोड, उंच, क्षीणकाय
कंकाल हासतें कोणी, कवटीचे विचकीत दांत

घोगरें विद्रूप गात—
"पेरा रे मुंडकीं, पेरा पेरा रे ऽ
रक्ताच्या पर्जन्यधारा सांडा रे···
नवीन हंगाम आला, आला रे ऽ ऽ······"
विरालें दृश्य तें सारें.

—तुटक्या कड्यासम सताड भकास तोंडें
अंधाऱ्या काजळी अशा नयनगुहेंत त्यांच्या,
रोखून पाहतें कोणी छिन्नभिन्न झालें प्रेत;
तुटून लोंबतो ओठ, त्वेषानें रुपून दांत.
द्वेषानें रागीट किंवा साहुनियां मुका मार
आत्म्याचा आकार हाच विकृत विद्रूप फार?—
विरालें दृश्य तें पार···

दिसतें मृदुल वक्ष जननीचें धवलसें,
सोमकांत स्तन तिचे जखमांनीं नाहलेले,
वक्ष विदीर्ण अन् खालीं गळे काळें घट्ट रक्त,
बाहेर आलेले डोळे, तुटून लोंबती मान,
अस्ताव्यस्त पसरले केस खालीं सांडलेले.
अजूनहि चांचपते बाळमूठ छिन्न स्तन!
छिन्न स्तन?
कीं त्या कंदिलाच्या नळ्या लाल·लाल
तडा गेल्या,
गोंदानें चिकट विलेल्या,
पसरती तांबडी नी मलीन फिकट आभा!
भयाण अंधुक अशा अंधारामधेंच दिसे
गोंडस मरती शोभा सौभाग्यवतीची कुण्या—
गुडघ्यांत घालून मान, विलापमूर्ति तो कुणी बैसला प्रस्तरवत्.

—हास्याचा कुठेंसा पूर अकस्मात् फेसाळत?
···फेसाळे डोंगरलाट
काजळशिळांचें मोठें अफाट धरण—
त्याच्या कड्यांचीं मोडीत हाडें

आपटे, खणते तळ;
कापूस पर्वतराशी पिंजून उडाव्या जशा
आकाशीं उसळे फेन
झुंझार पागल दर्या!
कोठें तें धरण ? दिसे विशाल काजळगड
बुरुजावरतीं काय फड्फड् करतें वरें ?
फडफडे नारंगी आणि धवल हिरवा ध्वज
गर्गर फिरतें संथ नील अशोकाचें चक्र...
...आश्चर्यें कोंदतो जीव
व्यापून आकाश सारें
प्रकट जाहली एक विराट बलिष्ठ छाया
टेकून क्षितिजाचिया वर्तुल-सज्जाच्यावरी
विराट बलिष्ठ असे दोनही आपले बाहू;
भव्यशा चेहऱ्यावरी निकोप मोकळें असें
श्रमिक पुत्राचें साधें मोकळें जिवंत हासें;
गगना-गगनांतून दुमदुमे तयाचा ध्वनि
मूर्च्छना-पाताळांतून प्राण येती उसळूनी...

क्षितिजाखालतीं निंच बुजट श्यामल सूर्य
कोंदट अंधुक अशा खुजट महाला-आंत
स्थूलकाय नारी-नर
बैसलेले विवसन
लालिमा जळते ओठीं...
वासना-कमळें लाल घेतलीं हातांत त्यांनीं;
आत्ममुग्ध बैसलेले सांवळ्या दर्पणापुढें
उत्सुकसे न्याहाळीत कसें त्यांचें दिसे 'प्रेम'!!
कुबट दमट श्याम वायु श्वसे जराजरा,
अवचेतन-पाताळांत चाले कारभार सारा;
अहंकार–द्वेष-निंदा नागिणी फिरती स्वैर,
डसतात खुपसून आपले विषारी दांत
निवळ गुलाबी अशा जीवनाच्या कपोलांत...
पाताळ देशाच्या त्याच पुरातन माझ्या छाया

गोंडस विकृती आल्या, मांडती हळवी माया—
साहिले अनंत मृत्यू,
घेतले तितके जन्म;
परंतु राहिलों सदा विकासमार्गाच्यावर,
अहंता सोडून सदा, जीवन विशालतर —
आकर्षूं शकलें मला···

× × ×

जुनाट थडग्यावरी नको गाऊं विलापिका.
नको ढाळूं आसूं ऊन मेलग्या जगावरी फुका
फोडून थडगें येई बाहेर डहाळ नवी
मांसल पल्लव लाल गोंडसशी टवटवी
ग्रहणाच्या चांदण्यांत नको रमूं भेसूरशा,
नको जोडूं स्नेह, अरे, क्षयी भावनांशीं अशा ;
जंगलाच्या डहाळयांत लाल रक्त सळसळे,
शाखांना फोडून येतीं लाख लाख-लाल फुलें;
समष्टीचें रक्त तुझ्या धमन्यांत प्रवाहित,
समष्टीच्या चैतन्यानें तुझे प्राण प्रकाशित.
उन्मत्त उद्दाम वेगें वेगवती नदीसम
चैतन्यसागराकडे धांव द्याया आलिंगन;
असत्य मेलें जें जग, असत्य त्या इतरेत छाया,
पुरून टाक त्या सर्व जीवन पोखरणाऱ्या ;
पसरा, पसरा वरी सिमेंटाचे नवे थर,
भक्कम बसवा पाया, बांधायाचें नवें घर ;
नष्ट करा, आतां तरी हळव्या विकृती गोड,
ठार करा आत्ममुग्धतेची कटु तीव्र ओढ ;
नष्ट करा बंधनें जीं जखडतीं जीवनाला,
व्यक्तींतील चैतन्याच्या सागराचा काढा आळा;
फोडा ते घुमट निळे निंच खुज्या क्षितिजाचे,
राख करा श्याम सूर्य गेलग्या जुन्या जमान्याचे ;
पेटवा, पेटवा सारी उरांतली अडगळ,
चेतवा, चेतवा उरीं जीवनाची तळमळ···

हळूहळू विराला तो उरींचा विखार सारा,
नांदे भव्य शांतीमधें प्राणाचा प्रसार सारा ;
उघडलें वातायन,
त्रिलगला परिचित दिगंतींचा उल्लसित
उन्मद पहांटवारा.
फुलून निघाला माझ्या तनूचा कणनूकण
पहाटशांतींत भव्य तन्मय जाहले प्राण !
समोर—
विराट अशा प्राचीच्या मैदानावरी
दिगंत व्यापीत सारें उडाली गुलावी धूळ;
प्रदीप्त आदित्याचा बाहेर उसळे रथ ;
महान् देदीप्यमान
गर्गर फिराया लागे लखलख जळतें असें
रथाचें सुवर्णचक्र
आक्रमूं लागलें वेगें दिशांचा प्रदीर्घ मार्ग—
—आरंभ जाहला आहे विजययात्रेचा आतां…

## व सं त बा प ट

( १९२२–   )

### सोनापुरच्या भिंतीवरतीं

सोनापुरच्या भिंतीवरतीं
सृष्टि रुपेरी करिते झगमग
स्वप्नांच्या या माला लहरत
कुजबुज करिती सुंदर हें जग

तरल तरंगासम वसनांतुन
तरळत उठती वर्तुळ रेषा
सोनापुरच्या भिंतीवर ही
मदनाची सांकेतिक भाषा

रंगसंगती-विसंगतींतुन
अर्धप्रस्फुट विलसे यौवन
सोनापुरच्या भिंतीवरची
नकली दौलत खिळवित लोचन

खळी गुलाबी गालावरची
ओतत राही कोठें मदिरा
निम्नोन्नत उच्छृंखल आकृति
सांवरतांना ढळवित पदरा

कामक्रीडा गोपसख्याची,
खय्यामाची रम्य रुबाई
रंगेलांची प्रणययाचना
दावित रोज नवी नवलाई

नामा-तुकया-जयदेवासह
पंगत करुनी शबूनम् बसली
एस्थेरचिं अन् अंगोपांगें
प्रभुरामाच्या निकट विलसलीं

नाचत नाचत भुंवया उडवित
परस्परांचे गुंफुनियां कर
फेर धरति सोनापुरभंवतीं
या लीलारति या चिरसुंदर

मरणाची झांकाया धास्ती
मानवतेची धडपड का ही ?
काय वेदनाविश्वावर नर
पटल धुक्यांचें ओढुन घेई ?

सोनापुरच्या भिंतीमागें
राख घालितो माथां लिंब
रात्ररात्रभर रडुनी रडुनी
रानफुलें तर ओलींचिंब

कपालकुंडल घालुनि मिरवे
खुरट्या तृणपात्यांची सेना
बाळपणांतच करपुन गेल्या
दूर्वांच्या मृदु रम्य भावना

कुठें कुणाच्या संसाराची
अंकुरणारी आशा जळते
कुठें कुणाच्या पोशिंद्याचें
अग्निरथांतुन प्रयाण होतें

रुद्ररूप जणुं सत्यावरतीं
माया घालित आवरणाला
मानवमनिंची ही विजिगीषा
झांकुनि जिंकुं बघे मरणाला

ओढुनताणुन आणी येथें
दुर्बळ मानव चंद्रबळाला
मरणाच्या दारांतहि मानव
अनंगरंगीं रंगुन गेला

विकट सत्य झांकायासाठीं
सोनापुरचा उभा असे तट
बोलति तेथिल अवघ्या आकृति
जय जीवनपट जय शाश्वत नट

# विंदा करंदीकर [गो. वि. करंदीकर]

(१९१८-    )

## साक्षात्कार

जळता कडक उन्हाळा होता डागित त्रिभुवन सारें.
वृक्षलताही फेंकुनि देती पानांचीं प्रावरणें.
अंगाची मम होते लाही लाही;
घामानें तर सचैल स्नानच होई;
नग्न होउनी वाटे जाउन नदींत त्या डुंबावें.
कोंदटलेल्या खोलीच्या मज वाटे,
वाऱ्यासाठीं भिंती उडवुन द्याव्या.
झोंप न येई म्हणुनी
खिडकीजवळी बसुनी
'स्त्री' चीं चाळित-काव्यें वगळुन-पानें
ऐकत होतों बर्फविक्याचें दुःसह कर्कश गाणें!

सहज पाहिलें भिंतीच्या भोंकांतुन-
मळका मुकटा नेसुन,
हातामध्यें पळिपंचपात्री घेउन,
थुलथुलत्या धोंदांतच लपवित खोचण,
-धोंदांतच त्या लुप्त जाहली वेंबी श्रीसीतेसम;-
देत डरारा ढेकर
वीर परत तो प्रयोजनाहुन दुर्धर
वामकुक्षि करण्याला देण्या ताणुन;
पळिपंचपात्री ताल धरितसे वाजुन कणकणकणकण.
आकाशांतुन भास्कर अग्नी ओके;
त्या तेजानें डोक्यावरचें टक्कल गोल चकाके.

तप्त तव्यासम जळत्या त्या रस्त्यावर
झरझर तोडित अंतर, जरि अनवाणी,
अर्ध वयाची निसर्गकन्या वडारमाता कोणी
'पाटावरवंटा घ्या आई' ऐसें घोषित जाई.

तुकतुकीत अन् तुफान मांड्यांवरतीं
वस्त्र फाटकें भिडलें कमरेभंवतीं;
शाळिग्रामासम तकतकती सतेज काळी कांती.
उभारलेल्या मुक्त स्तनांवर रूळते काळी माळा;
गळ्यांतल्या झोळींतिल बालक करितें तिजशीं चाळा.
झोळीखालीं सहजच दृष्टी जाई :
नव्या जीवनाच्या ओझ्याची उदर देतसे ग्वाही.
कृत्रिम आभासांना भेदुन सत्य विश्व पहाणारी
नजर पुढारी निश्चित आणि करारी.
काळ्या दगडाचा पाटा अन् वरवंटा डोक्यावर
घाम निथळतो डोक्यापासुन भूवर :
सह्याद्रीच्या कृष्ण कड्यांतुन कृष्णा वाहत का ही ?
भालावरच्या आंठ्या अथवा दऱ्याच भिजवित जाई.
शरिरांतिल अन् बाहेरिल ओझ्यानें
दिसतें उग्र मुखावर
स्नायूंचें आकसणें आणिक ताठण,
नाकपुड्यांचें श्वासाकरितां आकुंचन नी प्रसरण.
'पाटावरवंटा व्याहो' येती स्वर,
एक हात त्या पाट्यावरवंट्यावर
आणिक दुसरा झोळीच्या खोलीवर.
ऊर उडे झोळीसह आणिक बालक झुलतें त्यावर.

विचार गेले मनांत नाना येउन;
दृश्य पाहतां गळली 'स्त्री' हातांतुन,
विसरून गेलों थिल्लर नटवें मीपण;
सुखदुःखाच्या कृत्रिम आभासा पण.
दिव्य दृश्य जें माझ्यापुढतीं थाटे
पाहुनि तें मज श्रमदेवीचा साक्षात्कारच वाटे.

## वागुलबोवा

रात्र पसरते जेव्हां भंवतीं
समोरच्या त्या अंब्यावरतीं

येउन बसतो बागुलबोवा
कुणा न कळतो त्याचा कावा !
मी तर या डोळ्यांनीं पाहें
भीषण त्याचें रूप असें हें :

पिकलेली डोक्यावर शेंडी
—तागाची तकतकती पेंढी !
गरगर फिरती हिरवे डोळे
—गारेचे चकमकते गोळे !
आणिक खालीं नाक फदाडें
—पडक्या भिंतींतिल कोनाडे !
जीभ फिरे दांतांतुन पाही
—सुसर जशी खडकांतुन येई.
दांत वाटती दगडच काळे
कान सुपाच्याहुन मोठाले.

—बागुलबोवा पण म्हातारा
उमर तयाची काय विचारा :
"सात कमी वय सात हजारा !"
कांहीं न त्याला दुसरें पचतें,
पोर शेंबडें रडवें रुचतें !
घेउन जातो असलीं बाळें
आणिक भरतो अपुलें ढोलें !
पसरुनि पानें नंतर त्यावर
आपण बसतो त्या पानांवर;
आणिक जेव्हां पिकते आडी
एक हळू मग खाण्या काढी !

झाड पहा तें पुढचें हाले
बागुलबोवा तिकडे गेले !

## माझ्या मना बन दगड !

हा रस्ता अटळ आहे.
अन्नाशिवाय, कपड्याशिवाय,
ज्ञानाशिवाय, मानाशिवाय,
कुडकुडणारे हे जीव
पाहूं नको ! डोळे शीव !
नको पाहूं जिणें भकास;
ऐन रात्रीं होतील भास;
छातीमध्यें अडेल श्वास.
विसर यांना ! दाव कढ.
माझ्या मना बन दगड !

हा रस्ता अटळ आहे.
ऐकूं नको हा आक्रोश;
तुझ्या गळ्याला पडेल शोष;
कानावरतीं हात धर;
त्यांतूनही येतील स्वर !
म्हणून म्हणतों ओत शिसें;
संभाळ, संभाळ, लागेल पिसें.
रडणाऱ्या ! रडशील किती ?
झुरणाऱ्या ! झुरशील किती ?
पिचणाऱ्या ! पिचशील किती ?
ऐकूं नको असला टाहो;
माझ्या मना दगड हो !

हा रस्ता अटळ आहे.
येथेंच असतात निशाचर
जागोजाग रस्त्यावर;
असतात नाचत काळोखांत,
हसतात विचकून काळे दांत;
आणि म्हणतात, " कर हिंमत;
आत्मा वीक; उचल किंमत !

माणूस मिथ्या; सोनें सत्य;
स्मरा त्याला, स्मरा नित्य ! "
भिशील ऐकून असले वेद.
बन दगड; नको खेद.

बन दगड आजपासून;
काय अडेल तुझ्यावाचून ?
गालावरचें खारें पाणी
पिऊन काय जगेल कोणी ?
काय तुझे हे निःश्वास
मरणाऱ्यांना देतील श्वास ?
आणिक दुःख छातीफोडें
देईल त्यांना सूख थोडें ?
आहे दुःख तेंच फार.
माझ्या मना कर विचार;
कर विचार; हस रगड;
माझ्या मना बन दगड !

हा रस्ता अटळ आहे;
अटळ आहे घाण सारी;
अटळ आहे ही शिसारी.
एक वेळ अशी येईल
वाणीचेंच खत होईल !
अन्यायाचीं सारीं शितें
उठतील पुन्हां होतील भुतें !
या सोन्याचे बनतील सूळ !
सुळीं जाईल सारें कूळ.
ऐक टापा ! ऐक आवाज !
लाल धूळ दिसते आज;
याच्या मागून येईल स्वार;
या दगडावर लावील धार.
—इतकें यश तुला रगड;
माझ्या मना बन दगड !

## प्रफुल्ल-दत्त [दत्तात्रय विष्णु तेंडुलकर]

(१९१४-    )

### तुझें विशाल जीवन

तुझ्या हृदयीं अंबरा
कोटि तारकांचें तेज
महाकवीच्या कवनीं
जेंवि कल्पनांचा साज

तप्त सागराच्या ऊर्मि
येतां तुज आलिंगाया
वनरूपें प्रेषिसी त्यां
विश्वा जीवन द्यावया

तुझ्या निळ्या महालांत
चंडोलाची रागदारी
प्याया कुंभ पीयूषाचे
घेइ गरुड भरारी

उंचावती चुंबावया
तुज तुंग शैल-शृंग
अनंताचें नित्य परी
असे मानस निस्संग

रवी-शशी दीसरातीं
तुझ्या हृदीं प्रकाशती
तेजांत त्या भूतलींचे
चराचर विकासती

कधीं परी पाचोळाही
उधळीतो झंझावात
ब्रह्मानंदीं काष्ठमाला
संत मिरवी गळ्यांत

तुझ्या दर्शनें फुलती
मानवाच्या स्वप्न-कळया
अंथरिती शेजेसाठीं
ज्यांच्या देवही पाकळया

ब्रह्मांडाचा विरंगुळा
ध्येय-शांतीचें निधान
असें निळें निष्कलंक
तुझें विशाल जीवन

## र घु वे ल लु क स जो शी

(१८७५– )

### माझी रांगडी आई

तुझा गांवठी गे बोल
मधु शाहळींचा मळा
शीण जीवाचा फेडाया
सदा कदा फुललेला
क्षणें रुसे, तंडे, झुंजे
क्षणें फुलवी हास्याला
विसरावें कसें वेगें
हेंचि शिकवी जगाला
पहुडतां तुझ्या अंकीं
गोंजारिशी मज माते
आणि धरितां पोटाशीं
येई प्रेमाचें भरतें
चाळवितां पोटीं डोई
फुले प्रेमाचा फुलोरा
पान्हावली माझी माय
ओपी अमृताच्या धारा
नितळली दृष्टि माझी
तिचें पाही रूप नव
उचंबळे आपुलका
उसळला प्रेमभाव
तार गुंजे अंतरींची
जाय जीव हुरळोनी
किति किति वाटे गावीं
माझ्या रांगडीला गाणीं
युगायुगांच्या कोलांट्या
चालल्या या सभोंवार
सुन्न मति हो बघुनी
भराऱ्यांचा बडिवार
सरबत्ती अत्युक्तींची
स्वैर कल्पनाविलास
मज नको हा जंजाळ
तुझा मात्र आई, ध्यास !

# द त्ता त्र य चिं ता म ण सो म ण

( १९१२- )

## झिमझिम पडे

झिमझिम पडे पाऊस सकाळीं
थरथरतात अंगणांत वेली

दारांत तूं उभी होत रोमांचित
पाऊस लोचनीं तुझिया दिसत

सांगतें मुखींचें परी मज स्मित
आनंदाश्रु तुझ्या लोचनीं दाटत

आठवतो का तो तेव्हांचा दिवस-
जव्हां होती दोघां प्रीतीचीच आस

असेच तेधवां होत रोमांचित
आनंदाश्रु आणि लोचनीं बघत

कथिलें हृदींचें गूज परस्परां
जुळवीत आणि एकांतीं अधरां ?

# ना रा य ण ग जा न न जो शी

( १९११- )

## तीन अभंग

मंद पहाटेस कांबडसाद ये
त्यांतूनी ये सये तुझी हांक
बैलरहाटाची चाले कुरकूर
मनीं हुरहूर सुरू होई
अंधाराचें करी दूर पांघरूण
जागी झोपेंतून होई बाग
सागरतीरींची शीतल लहरी

पवनाच्या सूरीं  देते साद
झुळझुळा वाहे  पाटांतून पाणी
वसे खिळखूनी  पाऊलांस
आज, सखे, बाग भासते जिवंत
तुझ्या चाहुलींत  शक्ती ऐसी

×

दोनपार झाली,  कवडा घुमतो
आगरीं विरतो  शब्द त्याचा
गंभीर नाद हो  दरीयाच्या जळीं
पहाडांच्या तळीं  पडसादे
सळळ सरके  मुंगूस वाडींत
आणि स्तब्धतेंत  घाली भर
केतकीच्या बनीं  डोलते नागीण
स्वभावाचें भान  विसरली
मध्यान्हीं गे ऐशा कुणाचें पाऊल
दारांत मागलि  मंद वाजे ?
वाटलें–सखये,  येशी न कळत
परी तो अव्यक्त  भास तुझा

×

सह्याद्रीचा हात  कोकणीं पसरे
सागरांत शिरे  करंगळी
नागमोडी चढे  तयावरी वाट
चालें झटझट  प्रवासी मी
भोंवतीं पसरे  अरण्य भयाण
श्वापदें भीषण  फीरकती
वाटीच्या पायथीं  खाडींत डोलती
नौका, खुणावीती शीड-हातें
नारळींचे पंजे दूर हालताती
मज बोलावीती  परतून
तयांच्या आडून  कोण डोकावे ती
मनोमय मूर्ति  तुझी भासे

# मंगेश पाडगांवकर

(१९२९-    )

## मीलनरात

आज सखि अपुली मीलनरात
गंधित मधुरस ओघळला बघ छायांच्या स्वप्नांत

कुरळ कुंतलीं सुरंगिचा सर
सखि, हंसला स्पर्शतांच हा कर
अंगलगींतुन सप्तरंग बघ मोहरले निमिषांत
आज सखि अपुली मीलनरात

मधांत सखि तव भिजली कुजबुज
कधिं न देखिलें स्वप्न दिसे मज
परिमळले सखि सुगंध त्यांतुन जे अपुल्या हृदयांत
आज सखि अपुली मीलनरात

कणांकणांतुन गंधर्वांनीं
स्पर्शसुखाचीं म्हटलीं गाणीं
सखि, स्वरकोमल स्वप्नफुलांची शिरिं अपुल्या बरसात
आज सखि अपुली मीलनरात

स्तिमित चकित गे भंवतींचें जग
युगायुगांची विरली तगमग
नवल ! तृषेला मुक्ति मिळे गे तृप्तीच्या स्वर्गात
आज सखि अपुली मीलनरात

श्वास रोधुनी दोघें आपण
उरीं अनावर अपुल्या स्पंदन
युगायुगांचें संचित सखये सुफलित याच क्षणांत
आज सखि अपुली मीलनरात

उद्यां गडे या दिशा उजळतिल
हंसेल उजळुन नील सरोवर
दिसशिल तूं मज प्राची उज्ज्वल घेउन रवि गर्भात
आज सखि अपुली मीलनरात

# मं गे श  भ ग वं त  प द् की

( १९२३-   )

## रूळ !

हे काळेकाभिन्न लोखंडी रूळ,
आसमन्त व्यापून उरे ज्यांचें तालबद्ध भेसूर संगीत,
पोलादी भाल्यांसम नित्य खुपतात
व्यथित अंतरीं आणि निस्तेज डोळ्यांत ;
—पडलेले पृथ्वीच्या धडकत्या वक्षाभवतीं
यंत्रराक्षसाचे हे निर्दय पाश,
माउली धरित्रीच्या संवेदनार्त शरीरावर
विज्ञानवंतांनीं ओढलेल्या आसुडांचे वळ !
आठवण देती हे नग्न अप्रिय वास्तवाची,
रोजच घडणाऱ्या
देहाच्या आणि बुद्धीच्या
अभिमानांच्या, अभिलाषांच्या
नादान विक्रयाची :
सत्त्वासाठीं नव्हेच—
स्वतःच निर्मिलेल्या
कोवळ्या अस्थिपंजरांना जगविण्यासाठीं,
किंवा जगाच्या आणि स्वतःच्या सूडास्तव
त्यांना हळूहळू जगवून क्षणाकणानें मारण्यासाठीं
स्वतःला विकतों आम्ही, सत्त्वधीर हरिश्चंद्रासारखे.
तेव्हांचा जीवंत परमेश्वर
गोड हंसत ऐटींत मिरवितो आज,
चकचकीत चारचाकी स्वयंगर्तीतून…
असेच, रूळासारखेच.
लांबत जातात, दुबळ्या, भंगलेल्या मनांतील
हे संतप्त विचार, ह्या विवर्ण कल्पना !

अचानक आणि दृष्टीस पडतात
रुळांच्या राक्षसी मिठींत

चुकार लहरींगत सळसळणारे
नाजूक हिरवे मखमली तृणांकूर !
—ही आकाशाच्या आसवांची किमया
चिरंतन मांगल्याची ही साकार भित्री प्रतिमा! —
छेः !
यांत्रिक जीवनाच्या पोलादी चाकोरींतून
बेडरपणें हंसणारी आणि हंसविणारी
ही जीवनाची दुर्दम्य आशा;
जीवनांतील ही अमाप श्रद्धा !

आणि वाटतें, येताहेत
तृणाच्या हलक्या कुजबुजींतून
विश्वासाचे, धीराचे गंभीर साद,
" संभवामि.........! "

## शंकर रामाणी

(१९२२— )

### तुझ्याकडे

तुझ्याकडे, तुझ्याकडे
जीव माझा आज ओढे;
अस्पष्टलें अंधाराचें
गाढ भोंवर्तींचें कडें.

नागिणीच्या वळणांची
वाट माझी चढणांची;
खोल अंतरांत तुला
तळमळ भेटण्याची.

पथदीप विझलेले...
माझा ' वर्तमान ' चाले;
जीवनाच्या अंधारांत
झालें ' भविष्य ' आंधळें.

परि तुझ्या आठवानें
स्फुरे आज गोड गाणें,
शिणलेलें मन माझें
न्हालें नव्या चैतन्यानें.

तुझ्याकडे, तुझ्याकडे
जीव माझा आज ओढे;
अस्पष्टलें अंधाराचें
गाढ भोंवतींचें कडें.

## अनंत आटले

(१९२३-     )

### मला वाटतें

मला वाटतें, वेलीवरलें व्हावें सुंदर फूल
सुगंध उधळित ज्याला त्याला पाडावी मी भूल !

मला वाटतें केव्हां व्हावें पर्जन्याची धार
हिरव्या हिरव्या नवांकुरांनीं फुलवावा संसार !

कणखर आणिक कठिणकठिणशा खडकादगडांतून
झऱ्यासारखें सरघसरावें मंजुळ गीत म्हणून !

मला वाटतें, अनंत गगनीं नीलमेघ मी व्हावें
हिंडत हिंडत ब्रह्मांडाचें तेथुन दर्शन घ्यावें !

मला वाटतें, वृक्षाची घनशीतळ छाया व्हावें
शिणलेल्यांना आरामाचें सौख्य जरासें द्यावें !

प्रगतीस्तव नी उत्कर्षास्तव जे जे धडपडतात
मला वाटतें, व्हावें त्यांच्या पायाखालील वाट !

अंधाऱ्या रात्रींत कुणाच्या हातीं दीपक व्हावें
उजळुन त्याची वाट, सुखानें हांसत विझुनी जावें !

# सूर्यकांत खांडेकर

(१९२६-      )

## माझ्या घरट्यांत

नाहीं माझ्या घरट्यांत    रास हिऱ्या-माणकांची
भावमय किमया ही    हृदयींच्या दौलतीची !

नाहीं माझ्या घरट्यांत,    कल्पफुलांचा संभार
पारिजातकाचा गंध    मंद झरे सभोंवार !

नाहीं माझ्या घरट्यांत    चांदरातीचें मोहळ
बालरवि-किरणांची    नाचे इथें प्रभावळ !

नाहीं माझ्या घरट्यांत    सातसूरांचा झंकार
मंद्र सप्तकांत गाते    एकतारी एकस्वर !

नाहीं माझ्या घरट्यांत    प्रणयाचा मधुमास
क्षणभर इथें या हो    वत्सलता चाखण्यास !

नाहीं माझ्या घरट्यांत    कधीं कपाळाला आठी
खुलें हंसणें दिसेल    माझ्या चिमण्यांच्या ओंठीं !

# प रि च य

**भास्कर रामचंद्र तांबे** : ( १८७४–१९४१ ). व्यवसाय–अध्यापन, संस्थान कारभारी, शिक्षणाधिकारी इ. वास्तव्य–इंदूर, देवास, अजमेर, प्रतापगढ, ग्वाल्हेर इत्यादि स्थळीं. काव्यरचनाकाल–१८९० ते १९४१. प्रकाशन : प्रथम संग्रह 'तांबे यांची कविता,' संपादक वा. गो. मायदेव, १९२०; तांबे—भाग २, संग्राहक दि. गं. केळकर, १९२७; तांबे यांची समग्र कविता, संपादक माधव त्रिंबक पटवर्धन, १९३६.

**जयकृष्ण केशव उपाध्ये** : (१८८३–१९३५). व्यवसाय–लेखन. वास्तव्य–नागपूर. प्रकाशन : लोकमान्यचरितामृत, प्रथम खंड, १९२४; पोपटपंची, १९२९; उमर खय्याम–'रुबाया' व 'घटचर्चा,' १९३२.

**आनंदराव कृष्णाजी टेकाडे** : (१८८८– ). व्यवसाय–शेती. वास्तव्य–नागपूर. रचनाकाल–१९१० पासून पुढें. प्रकाशन : आनंदगीत, भाग १, १९२०; आनंदगीत, भाग २, १९२४; आनंदगीत, भाग ३, १९२८; आनंदगीत, भाग ४.

**दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी** : (१८८७–१९३९). व्यवसाय–प्राथमिक शिक्षक. वास्तव्य–जळगांव, खानदेश. रचनाकाल–१९१५ ते १९३९. प्रकाशन : काव्यकुसुमांजली, १९१६; काव्यरत्नमाला, १९२०; मराठ्यांचीं संग्रामगीतें, १९२०; प्रसन्नराधा, १९२०; मनोहर-लीला, १९२०; काव्यतुषार, १९२३; अभंगमाला, १९२५; झांशीची संग्रामदेवता, १९२५; राधामाधव, १९२६; मान्यांची यमुना, १९२६; कुमुद्वती, १९२६; महाराणा प्रतापसिंह, १९२६; चंडीशतक, १९२७; शिवप्रताप, १९२८; नंदिनी, १९३०; मराठी शिवराज-भूषण, १९३१. इत्यादि.

**माधव [माधव केशव काटदरे]** : (१८९२– ). व्यवसाय–सेवानिवृत्त सरकारी नोकर; हल्लीं अध्यापन. वास्तव्य–नोकरीच्या काळांत मुंबई; हल्लीं चिपळूण (रत्नागिरी). रचनाकाल–१९१० पासून. प्रकाशन : ध्रुवावरील फुलें, १९१५; फेंकलेलीं फुलें, १९२१; कवि माधव यांची कविता, १९३५.

**माधव जूलियन् [माधव त्रिंबक पटवर्धन]** : (१८९४–१९३९). एम्. ए., डी. लिट्. व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–मुख्यतः बडोदें, पुणें, कोल्हापूर. रचनाकाल–१९११–१९३९. प्रकाशन : विरहतरंग, १९२६; सुधारक, १९२८; उमर खय्यामच्या रुबाया ( भाषांतर ), १९२९; द्राक्षकन्या, ( उमर खय्यामच्या

रुबायांच्या फिट्झ्जेरल्डकृत भाषांतराचें भाषांतर), १९३१; गज्जलांजली १९३३; स्वप्नरंजन, १९३४; तुटलेले दुवे, १९३८; नकुलालंकार, १९३९; मधुलहरी, १९४०; छंदोरचना, १९३७.

**मनोरमा [सौ. मनोरमा श्रीधर रानडे] :** (१८९६–१९२६). बी. ए. १९२६. रचनाकाल–१९१२ ते १९३९. प्रकाशन : 'श्री–मनोरमा' संग्रहांत समाविष्ट.

**श्रीधर बाळकृष्ण रानडे :** (१८९२– ). बी. ए., एम्. एस्सी. व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–हल्लीं मुंबई. रचनाकाल–१९१२ पासून पुढें. प्रकाशन : 'श्री–मनोरमा' संग्रहांत, १९३९.

**विठ्ठल दत्तात्रेय घाटे :** (१८९५– ) एम्. ए., बी. टी., टी. डी. (लंडन). व्यवसाय–अध्यापन व शिक्षण खात्यांत अधिकारी. वास्तव्य–हल्लीं पुणें. रचना–रविकिरणमंडळाच्या पहिल्या चारपांच प्रकाशनांतून प्रसिद्ध.

**दत्तात्रेय लक्ष्मण गोखले :** (१८९८– ) एम्. ए., व्यवसाय–सांगली संस्थानांत अधिकारी. वास्तव्य–सांगली. रचना–रविकिरणमंडळाच्या पहिल्या चारपांच प्रकाशनांतून प्रसिद्ध.

**गजानन त्र्यंबक माडखोलकर :** (१९००– ), व्यवसाय–लेखन व वृत्तव्यवसाय. वास्तव्य–मुंबई, पुणें, व हल्लीं नागपूर. रचना–रविकिरणमंडळाच्या आरंभींच्या प्रकाशनांतून.

**गिरीश [शंकर केशव कानेटकर] :** (१८९३– ). एम्. ए. व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–पुणें, फलटण, व हल्लीं सांगली. रचनाकाल–१९१८ पासून पुढें. प्रकाशन : वीणाझंकार, १९२२; अभागी कमल, १९२३; कला, १९२६; आंबराई, १९२८; कांचनगंगा, १९३०; फलभार, १९३४; मानसमेघ, १९४३.

**यशवंत [यशवंत दिनकर पेंढरकर]** (१८९९– ). व्यवसाय–सेवानिवृत्त सरकारी नोकर, लेखन. वास्तव्य–पुणें. रचनाकाल–१९२० पासून पुढें. प्रकाशन : मित्र-प्रेमरहस्य, १९१९; यशवंती, १९२१; वीणाझंकार, १९२२; इंदुकला, १९२३; यशोधन, १९२९; भावमंथन, १९३०; जयमंगला, १९३१; बंदिशाळा, १९३२; यशोगंध, १९३४; काव्यकिरीट, १९४०; यशोनिधि, १९४१; मोतीबाग, १९४२; यशोगिरि, १९४४.

**वासुदेव गोविंद मायदेव :** (१८९४– ). एम्. ए. व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–पुणें, मुंबई. रचनाकाल–१९१० पासून पुढें. प्रकाशन : भावतरंग, १९२९; गरिबांची गोष्ट, १९३१; भावनिर्झर, १९३८; सुधा, १९४०;

अभिनय-गीत ( मुलांसाठीं ), १९३२; शिशुगीत, १९३६; बालविहार, १९४१.

**काव्यविहारी [ धोंडो वासुदेव गद्रे ]** : (१८९४-     ) बी. ए., एल्‌एल्. बी. व्यवसाय–प्रारंभीं अध्यापन व नंतर संस्थानी नोकरी. वास्तव्य–सांगली. रचनाकाल–१९१५ पासून पुढें. प्रकाशन : काव्यविहार, १९२३; स्फूर्तिलहरी, १९३६.

**हरि सखाराम गोखले** : (१८९४-     ). बी. ए., बी. टी. व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–पुणें. रचनाकाल–१९१५ पासून पुढें. प्रकाशन : कांहींतरी, १९२५.

**केशवकुमार [ प्रल्हाद केशव अत्रे ]** : (१८९८-     ). बी. ए., बी. टी., टी. डी. ( लंडन ). व्यवसाय–अध्यापन; हल्लीं वृत्तव्यवसाय व चित्रपट-व्यवसाय. वास्तव्य–आरंभीं पुणें व हल्लीं मुंबई. रचनाकाल–१९१५ पासून पुढें. प्रकाशन : झेंडूचीं फुलें, १९२५; गीतगंगा, १९३५.

**अज्ञातवासी [ दिनकर गंगाधर केळकर ]** : (१८९६-     ). व्यवसाय–व्यापार. वास्तव्य–पुणें. रचनाकाल–१९१५ पासून पुढें. प्रकाशन : अज्ञातनाद, १९२४; अज्ञातवासींची कविता, १९३३.

**सदाशिव अनंत शुक्ल** : (१९०२-     ) व्यवसाय–लेखन. वास्तव्य–मुंबई. प्रकाशन : सुनीतावलि; रुपेरी रसधारा.

**गुणवंत हणमंत देशपांडे** : (१८९७-     ). वास्तव्य–वाटखेड, (यवतमाळ) वऱ्हाड. रचनाकाळ–१९१५ पासून पुढें. प्रकाशन : निवेदन, १९३५.

**श्रीनिवास रामचंद्र बोवडे** : (१८८९–१९३४). बी. ए., एल्‌एल्. बी. व्यवसाय–वकिली. वास्तव्य–नागपूर. प्रकाशन : बोबडे यांची कविता, १९३७.

**अनिल [ आत्माराम रावजी देशपांडे ]** : (१९०१-     ) बी. ए., एल्‌एल्. बी. व्यवसाय–Deputy Director, Social Education, मध्यप्रांत-वऱ्हाड: वास्तव्य-नागपूर. रचनाकाल–१९२२ पासून पुढें. प्रकाशन : फुलवात, १९३३; प्रेम आणि जीवन, १९३५; भग्नमूर्ति, १९४०; निर्वासित चिनी मुलास, १९४३; पेर्तेव्हा, १९४७.

**रघुनाथ दत्तात्रेय सरंजामे** : (१८९५-     ) बी. ए., एल्‌एल्. बी. व्यवसाय–वकिली. वास्तव्य–उमरावती व हल्लीं नागपूर. रचना–स्फुट.

**वामन नारायण देशपांडे** : (१९०३-     ). व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–यवतमाळ, वऱ्हाड. रचनाकाल–१९२४ पासून पुढें. प्रकाशन : आराधना, १९३८.

**आनंद [ विनायक लक्ष्मण बरवे ]** : ( १८९६-१९४७ ). बी. ए., एल्‌एल्. बी. व्यवसाय-वकिली. वास्तव्य-चिपळूण.

**निशिगंध ( रामचंद्र श्रीपाद जोग )** : (१९०३- ) एम्. ए. व्यवसाय-अध्यापन. वास्तव्य-पुणें. प्रकाशन : ज्योत्स्नागीत, १९२६; निशागीत, १९२८.

**नारायण घनश्याम देशपांडे** : ( १९०९- ). बी. ए., एल्‌एल्. बी. व्यवसाय-वकिली. वास्तव्य-मेहेकर (वऱ्हाड). संग्रह प्रकाशनाच्या मार्गावर.

**वामन भार्गव पाठक** : (१९०५- ). एम्. ए., पीएच्. डी. व्यवसाय-अध्यापन. वास्तव्य-पुणें. रचनाकाल-१९२२ पासून पुढें. प्रकाशन : आशागीत, १९३३; प्रवासी, १९३४; मानवता, १९३९.

**विष्णु भिकाजी कोलते** : (१९०५- ). एम्. ए., पीएच्. डी., एल्‌एल्. बी. व्यवसाय-अध्यापन. वास्तव्य-नागपूर. प्रकाशन : लऱ्हाळीं, १९३३.

**नारायण नागोराव हूड** : ( १९०३- ) : बी. ए., एल्‌एल्. बी., व्यवसाय-वकिली. वास्तव्य-यवतमाळ ( वऱ्हाड ). प्रकाशन : पराग, १९४१.

**केशव नारायण काळे** : (१९०४- ). बी. ए., एल्‌एल्. बी. व्यवसाय-लेखन, नाटक-व-चित्रपट-दिग्दर्शन. वास्तव्य-मुंबई व हल्लीं पुणें. प्रकाशन : सहकारमंजरी, १९३२.

**अनंत काणेकर** : ( १९०५- ). बी. ए., एल्‌एल्. बी., व्यवसाय-अध्यापन व लेखन. वास्तव्य-मुंबई. रचनाकाल-१९२२ पासून पुढें. प्रकाशन : चांदरात आणि इतर कविता, १९३३.

**भवानीशंकर श्रीधर पंडित** : (१९०५- ). एम्. ए., एल्‌एल्. बी. व्यवसाय-अध्यापन. वास्तव्य-नागपूर. प्रकाशन : पिचलेला पांवा, १९३३.

**गोपीनाथ [ गोपीनाथ गणेश तळवलकर ]** : ( १९०७- ) व्यवसाय-संपादक. वास्तव्य-पुणें. प्रकाशन : दूर्वांकुर, १९२९.

**गणेश हरि पाटील** : (१९०६- ). बी. ए., बी. टी. व्यवसाय-अध्यापन. वास्तव्य-हल्लीं बोर्डी ( ठाणें ). प्रकाशन : रानजाई, १९३४.

**गजानन लक्ष्मण ठोकळ** : ( १९०९- ) बी. ए., बी. टी. व्यवसाय-अध्यापन. वास्तव्य-पुणें. प्रकाशन : मीठभाकर, १९३८.

**सोपानदेव चौधरी** : ( १९०७- ). व्यवसाय-लेखन. वास्तव्य-नाशिक. प्रकाशन : काव्यकेतकी, १९३२; अनुपमा, १९५०.

**दामोदर अच्युत कारे** : (१९०९-     ). मुद्रणव्यवसाय, वास्तव्य-मडगांव ( गोवें ). प्रकाशन : नंदादीप.

**बाळकृष्ण भगवंत बोरकर** : (१९१०-     ). व्यवसाय-अध्यापन व लेखन. वास्तव्य-हल्लीं पुणें. प्रकाशन : प्रतिभा, १९३०; जीवनसंगीत, १९३७; दूधसागर, १९४७.

**गोविंद झोकरकर** : ( १९१२-     ) व्यवसाय-अध्यापन. वास्तव्य-देवास-सीनियर ( मध्यभारत ).

**पंडित सप्रे** : ( १९१२-     ). एम्. ए. व्यवसाय-अध्यापन. वास्तव्य-कऱ्हाड. प्रकाशन : अर्धचंद्र.

**रामचंद्र अनंत काळेले** : ( १९०७-     ). बी. ए., एल्‌एल्. बी., काव्यतीर्थ. व्यवसाय-पोलिस खात्यांत प्रॉसिक्यूटिंग सुपरिंटेंडेंट. वास्तव्य-इंदूर. रचनाकाल-१९२४ पासून पुढें. प्रकाशन : वाग्वसंत, १९३४; ओळखीचे सूर, १९४१; भावपूर्णा, १९४३; गीतनिर्वाण, १९५०.

**भालचंद्र रा. लोवलेकर** : (१९११-१९४५). बी. ए., एल्‌एल्. बी. व्यवसाय-संस्थानी नोकरी. वास्तव्य-इंदूर.

**दत्तप्रसन्न कारखानीस** : (१९०८-     ). बी. ए., बी. टी. व्यवसाय-अध्यापन. वास्तव्य-मुंबई. प्रकाशन : क्षितिजावर, १९३५.

**नारायण माधव संत** : (१९०९-१९४६). बी. ए., बी. टी. व्यवसाय-अध्यापन. वास्तव्य-बेळगांव. प्रकाशन : सहवास, १९४०.

**वामन रावजी ढवळे** : (१९०८-     ). बी. ए. व्यवसाय-सरकारी नोकरी. वास्तव्य-मुंबई. संग्रह प्रकाशनाच्या मार्गावर.

**कुसुमाग्रज [ वि. वा. शिरवाडकर ]** : ( १९१२-     ). बी. ए. व्यवसाय-लेखन. वास्तव्य-नाशिक. प्रकाशन : जीवनलहरी, १९३३; विशाखा, १९४२.

**अशोक [ दत्तात्रय केशव भट ]** : ( १९१०-     ). व्यवसाय-अध्यापन. वास्तव्य-नाशिक. संग्रह प्रकाशनाच्या मार्गावर.

**वसंतराव चिंधडे** : ( १९१६-     ). बी. ए., एल्‌एल्. बी. व्यवसाय-वकील. वास्तव्य-मालेगांव. प्रकाशन : वसंतवैभव, १९३९.

**संजीवनी [ सौ. संजीवनी मराठे ]** : ( १९१६-     ). जी. ए. वास्तव्य-खानापूर ( बेळगांव ). प्रकाशन : संजीवनी, १९३२; राका, १९३८; संसार, १९४३; छाया, १९४९.

**पद्मा [ सौ. पद्मावती गोळे ]** : ( १९१३–      ). जी. ए. वास्तव्य–पुणें. प्रकाशन : प्रीतिपथावर.

**इंदिरा [ इंदिरा संत ]** : ( १९१४–      ). बी. ए., बी. टी. व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–बेळगांव. प्रकाशन : सहवास, १९४०.

**राजा बढे** : ( १९१२–      ). बी. ए. व्यवसाय–लेखन. वास्तव्य–मुंबई. प्रकाशन : माझिया माहेरा जा, १९४९.

**वसंत रामकृष्ण वैद्य** : ( १९११–      ). बी. ए. व्यवसाय–नोकरी. वास्तव्य–ठाणें. रचनाकाल–१९३२ पासून पुढें. प्रकाशन : बहर, १९३६.

**पांडुरंग श्रावण गोऱ्हे** : ( १९०५–      ). व्यवसाय–नोकरी. वास्तव्य–यवतमाळ.

**वा. रा. कान्त** : ( १९१३–      ). बी. एजी. व्यवसाय–सरकारी रेडियो खात्यांत नोकरी. वास्तव्य–औरंगाबाद. रचनाकाल–१९२९ पासून पुढें. प्रकाशन : पहांटतारा; फटत्कार; रुद्रवीणा, १९४७.

**पुरुषोत्तम शिवराम रेगे** ( १९१०–      ). बी. ए., ( मुंबई ) बी. एस्‌सी. (लंडन). व्यवसाय–अध्यापन, वास्तव्य–मुंबई. प्रकाशन : साधना आणि इतर कविता, १९३१; फुलोरा, १९३७; हिमसेक, १९४३; दोला, १९५०.

**बाळ सीताराम मर्ढेकर** : ( १९०९–      ) बी. ए. व्यवसाय–रेडियो खात्यांत नोकरी. वास्तव्य–हल्लीं दिल्ली. प्रकाशन : शिशिरागम, १९३९. कांहीं कविता, १९४७.

**कृष्ण बलवंत निकुंब** : (१९२०–      ). एम्. ए. व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–नाशिक व हल्लीं धारवाड. प्रकाशन : उज्ज्वला, १९४५.

**शांता ज. शेळके** : ( १९२१–      ). एम्. ए. व्यवसाय–लेखन. वास्तव्य–पुणें, हल्लीं मुंबई. प्रकाशन : वर्षा, १९४७.

**श्रीकृष्ण पोवळे** : ( १९२१–      ). व्यवसाय–लेखन व प्रकाशन. वास्तव्य–मुंबई. प्रकाशन : अग्निपराग, १९४५; जळमाती, १९४९.

**विनायक महादेव कुळकर्णी** : ( १९१७–      ). एम्. ए., व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–बेळगांव. प्रकाशन : पहांटवारा, विसर्जन; १९४९.

**माधव कृष्ण पारधी** : ( १९२०–      ). एम्. ए. व्यवसाय–रेडियो खात्यांत नोकरी. वास्तव्य–हल्लीं दिल्ली.

७४७७

**गणेश दिगंबर माडगूळकर** : (१९१९– ). व्यवसाय–चित्रकथा-लेखन. वास्तव्य–पुणें. प्रकाशन : सुगंधी वीणा, १९५०.

**यशवंत दत्तात्रय भावे** : (१९११– ). एम्. ए. व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–बेळगांव. प्रकाशन : आर्द्रा, १९४९.

**श्रीनिवास पाटणकर** : (१९१५–१९३६) बी. ए. व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–पुणें. प्रकाशन : प्राजक्ताचीं फुलें.

**सौ. शालिनी सोमण** : (१९१५– ). वास्तव्य–बेळगांव.

**मनमोहन [ मनमोहन नातू ]** : (१९११– ) व्यवसाय–लेखन. वास्तव्य–पुणें. प्रकाशन : युगायुगांचे सहप्रवासी, ११४८.

**शरच्चंद्र मुक्तिबोध** : (१९२१– ). एम्. ए., एल्एल्. बी. व्यवसाय–नोकरी. वास्तव्य–नागपूर. प्रकाशन : नवी मळवाट, १९५०.

**वसंत बापट** : (१९२२– ). एम्. ए. व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–मुंबई.

**विंदा करंदीकर [ गोविंद वि. करंदीकर ]** : (१९१८– ). एम्.ए. व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–रत्नागिरी. प्रकाशन : स्वेदगंगा, १९४९.

**प्रफुल्ल-दत्त [ दत्तात्रय विष्णु तेंडुलकर ]** : (१९१४– ) एम्.ए., बी. टी. व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–मुंबई. प्रकाशन : सप्तपदी; सुभाषिणी.

**रघुवेल लुकस जोशी** : (१८७५– ). सेवानिवृत्त पोस्टमास्तर. वास्तव्य–विकाराबाद ( हैद्राबाद दक्षिण ).

**दत्तात्रय चिंतामण सोमण** : (१९१२– ) वास्तव्य–वाशीम.

**नारायण गजानन जोशी** : (१९११– ) एम्. ए. व्यवसाय–अध्यापन. वास्तव्य–बडोदें. प्रकाशन : जीवनयोग ; कविता, १९५०.

**मंगेश पाडगांवकर** : (१९२९– ). वास्तव्य–मुंबई.

**मंगेश भगवंत पदकी** : (१९२४– ). एम्. कॉम्. वास्तव्य–मुंबई.

**शंकर रामाणी** : ( १९२२– ). व्यवसाय–सरकारी नोकरी. वास्तव्य–नवें गोवें. प्रकाशन : सूर्यफुलें, १९५०

**अनंत आठले** : (१९२३– ). बी. ए. वास्तव्य–इंदूर.

**सूर्यकांत खांडेकर** : (१९२६– ). बी. ए. वास्तव्य–कोल्हापूर.

REFBK-0007477

REFBK-0007477